(१)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १३/०४/२००५

**अभिनंदन ठराव क्र. ०१ :-**

नवी मुंबई सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मा. पालकमंत्री ना. श्री. गणेश नाईक यांच्या देखरेखीखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस या पक्षास बहुमत मिळालेबाबत तसेच नालासोपारा व नवघर-माणिकपुर नगरपालिकांमध्ये श्री. हितेंद्र ठाकूर प्रणीत वसई विकास आघाडीस बहुमत मिळालेबाबत ही सभा त्या सर्वांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

" अभिनंदन ठराव " क्र. ०२

मा. हिन्दूहृदयसम्राट - श्रीमान शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरें साहेब ह्यांच्या प्रेरणेनं, मा. उध्दवजीं ठाकरें, कार्याध्यक्षसाहेब ह्यांच्या अथक प्रयत्नानं संभाजीनगर येथील महानगर पालीका जिंकून, बदलापूर, अंबरनाथ नगरपालिका आपुन्हां शिवसेना भाजपानें आपल्याच ताब्यात पूर्ण ताकदीनिशी विजय मिळवला आहे.

त्याबद्दल अभिनंदन करणारा ठराव मांडत आहे.

सूचक - श्री रतन पाटील- गरनेलें

अनुमोदन - श्री अनिल पाटील

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १३/०४/२००५.**

**प्रकरण क्र. ०१ :-** **दि. १८/०२/२००५ व दि. २८/०२/२००५ रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र.** 03 **:-**

दि. १८/०२/२००५ व दि. २८/०२/२००५ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व मा. महापौर यांच्या मान्यतेने इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :-** श्री. आसिफ शेख **अनुमोदन :-** श्री. प्रेमनाथ पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(४)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ चे १ ( ज ) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्र. :- ०२

महासभा दि. :- २३।४।०५

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीच्या आवारामधील उद्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक उभारणेबाबत.

## ठराव - ४

ठाणे महानगरपालिका व कल्याण डोंबिवली महानगरपालिका आवारात स्वातंत्र्य सैनिकांची नावे फलकावर कोरुन स्मारक उभारले आहे. तसेच स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक ( स्वातंत्र्य सैनिकाचा हातात मशाल घेतलेला पुतळा ) स्थानिक स्वातंत्र्य सैनिकांची नावे फलकावर कोरुन मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या आवारात उभारण्यात यावे.

तसेच दि. १४/०४/२००५ रोजी भाररतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचे औचित्य साधून महानगरपालिकेच्या आवारातील प्रवेशद्वाराजवळील मोकळ्या जागेत/ उद्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा शासनमान्य शिल्पकाराकडून तयार करुन उभारण्यात यावा. व तशा प्रकारची मागणी सन्मानिय नगरसेविका सौ. सुरेखा गायकवाड व इतर नगरसेवकांनी वेळोवेळी केली आहे. तसेच मा. आयुक्तांनी सुध्दा हा विषय महासभेपुढे घेण्यास तत्कालिन महापौरांकडे पाठविला होता. दुर्दैवाने हा विषय सभेपुढे न आणल्याने मी १(ज) खालिल प्रस्ताव आणला आहे. त्याअनुषंगाने विषय पटलावर आणल्याबद्दल मी नव्या महापौरांचे अभिनंदन करीत आहे.

आधुनिक भाराताचे थोर नेते. भारतीय घटनेचे शिल्पकार, दलित-शोषित पिडीतांच्या उन्नतीसाठी आयुष्य वेचून त्यांच्याठायी आत्मभान निर्माण करणारे, क्रांतिकारक विचारवंत, प्रॉब्लेम ऑफ रुपी , कास्ट्स इन इंडिया , थॉट्स ऑन पाकिस्तान , हू वेअर द शूद्राज , बुध्द ॲंड हिज धम्म इत्यादी ग्रंथाचे लेखक, मूलनायक , जनता , बहिष्कृत भारत , आणि प्रबुध्द भारत या वृत्तपत्रांचे संस्थापक, संपादक, भारतरत्न ही सर्वोच्च सन्मान उपाधि प्राप्त, स्वातंत्र, समता, मानवता या मूल्यांचा पुरस्कार, तर्कशुध्द विचार व परखड भाषाशैली हे त्यांचे लेखनविशेष दूरगर्शीपणा दाखविते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अगदी साधी मागणी होती ती म्हणजे आम्हाला पानी पिऊ द्या. २ मार्च १९३० रोजी नाशिकच्या काळाराम मंदिरात दलितांना प्रवेश द्या, तुमचा देव तसा आमचाही देव आहे, मग तुम्हाला प्रवेश आणि आम्हाला मनाई कां ?

ही चळवळ कुणाच्याही विरोधात मव्हती साडेपाच वर्षे सत्याग्रह करून ही दलितांना काळाराम मंदिरात प्रवेश मिळाला नाही.

या देशातील समाज समान पातळीवर असणे हा या संघर्षा मागील हेतू होता ते राष्ट्रीय कार्यच होते.

त्यांनी इंग्लंड, अमेरीका या देशात जावून अर्थशास्त्रावर मोठ्या पदव्या मिळविल्या बॅरिस्टर झाले, एम., पी.एच.डी., डी.एस.सी., डी. लिट. आणि बॅरिस्टर या पदव्या त्यांनी मिळवल्या, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, कायदाशास्त्र, विधिशास्त्र, इतिहास, तर्कशास्त्र, आणि धर्मशास्त्र या सर्व विषयाचा त्यांनी अभ्यास केला आणि आपल्या कार्याला सुरुवात केली.

डॉ. आंबेडकर यांनी आपल्या आयुष्यात १० टक्के काम दलितांचे केले व राहिलेले ९० टक्के काम भारतीय समाज व देश या करिता केले.

१९३० ला लंडनयेथे गोलमेज परिषद इंग्रजानी भरविली सर्व देशांतील प्रतिनिधी तेथे होते त्यावेळी हिंदुस्थानला पहिल्यांदा तुम्ही स्वातंत्र्य द्या असे इंग्रजांना ठणकावून डॉ.आंबेडकरांनीच सांगितले.

१९३२ला इंग्रजानी जातीय निवाडा जाहिर केला, त्याला विरोध म्हणून महात्मा गांधीजीं नी येरवडा जेल मध्ये उपोषण सुरु केले. सर्व देश एकाबाजूली आणि एकटे डॉ. आंबेडकर दुसऱ्या  बाजुला, महात्माजी आंबेडकर म्हणाले माझे जीवन तुमच्या हातात आहे. मला जीवंत ठेवणे अथवा मारणे याचा निर्णय तुमच्या हातात आहे. शेवटी दोघामध्ये करार झाला हा करार आम्हाला मान्य आहे. म्हणून डॉ.आंबेडकरानी सही केली. त्या नंतर महात्मांनी उपवास सोडला आणि त्यांना जीवनदान मिळाले ते केवळ डॉ.आंबेडकरां मुळे. सिही करतांना आंबेडकर म्हणाले । महात्माजी या देशाला तुमची आवश्यकता आहे म्हणून हे मान्य केले । एवढ्या मोठ्या मनाचे डॉ. आंबेडकर होते.

१९४२ ते१९४६ या काळात इंग्रजांचे राज्य होते त्यावेळी डॉ. आंबेडकर कामगारमंत्री होते त्यावेळी त्यांनी केलेले राष्ट्र कार्य महान होते.

१. सरकारी नोकरी करनाऱ्या महिलांना गरोदरपणात व नंतर बाळंत झाल्यावर तीन महिन्यांची भरपगारी रजा मंजूर करण्याचा कायदा करणारे या देशातील महामानव म्हणजे डॉ.आंबेडकर होय.

२. कामगारांन ८ तासांचा दिवस मंजूर करणारे डॉ. आंबेडकरच.

३. ओवर टाईम चा मोबदला दीडपट दिला पाहिजे हे डॉ.आंबेडकरानीच केले.

४. खाणीमध्ये जे कामगार काम करतात त्यांचे जीवन नेहमी धोक्याचे असते म्हणून त्यांच्या कुटुंबाना भरपाई मिळाली पाहिजे हा कायदा डॉ आंबेडकरानीच केला.

५. पावसाचे पडणारे पाणी वाहून जाण्यापेक्षा ते अडविले तरी या देशाची अन्न धान्याची परिस्थिति सुधारेल. म्हणून पंजाब मध्ये भाक्रा नांगल या प्रचंड धरणा ची निर्मिती करणारे डॉ.आंबेडकर हे एकमेव नेते होते. त्या काळात कामहार आणि देशासाठी डॉ. आंबेडकर यांनी अनेक सुधारणा केल्या भारताला १५ ऑगस्ट, १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले, देश स्वातंत्र

झाला. प्रत्येक देशाला राज्य घटना किंवा संविधान असते. घटना शास्त्र आणि कायदाशास्त्र ह्या विषयांचे प्रकांड पंडित म्हणून डॉ.आंबेडकरांवर ते काम सोपवीले. प्रकृती बरी नसतां नाही अहोरात्र खपून २ वर्षे ११ महिने १४ दिवसात घटनेच काम पूर्ण करुन राष्ट्राच्या स्वाधीन केले. आदर्श घटना म्हणून जगाने या घटनेला मान्यता दिलेली आहे. ।भारतीय घटनेचे शिल्पकार हा मान डॉ.आंबेडकरांना पटविला.

कन्याकुमारी पासून हिमालयापर्यत सर्व हिंदू समाजाचा अकच कायदा पाहिजे, हजारो वर्षापूर्वी तयार केलेले काही नियम कालबाह्या झालेल आहेत, त्यांचा त्याग करायला पाहिजे शिवाय या देशातील महिलांवर हजारो वर्ष सतत अन्याय होत आला आहे, त्यांना पुरुषां प्रमाणे समान तेच अधिकार मिळावेत म्हणून लोकसभेत त्यांनी हिंदू कोडबिल मांडले, त्यात का होते? तर पुरषांना पत्नीपासून घटस्फोट घेण्याचा अधिकार असून कितीही बायका करु शकत होते पण स्त्रीला नवऱ्या पासून घटस्फोट घेण्याचा अधिकार असून कितीही बायका करु शकता होते, पण स्त्रीला नवऱ्या पासून घटस्फोट घेण्याचा अधिकार नव्हता. डॉ. आंबेडकरांनी सांगितले की स्त्रीला देखील दारुड्या, सतत मारझोड करणारा, नपुंसक असलेल्या नवऱ्या पासून घटस्फोट मिळावा, शिवाय स्त्रीला माहेरच्या इस्टेटीवर, त्याच प्रमाणे सासरच्या इस्टेटीवर, हक्क मिळाला पाहिजे, मुला एवढाच अधिकार कुटुंबात मुलीलाही मिळाला पाहिजे , हा प्रयत्न या देशामध्ये प्रथम डॉ. आंबेडकराने हिंन्दू कोडबिलाद्वारे मांडल्या होत्या.

महिलांचा उध्दार व्हावा, त्यांना सन्मानाने जगता यावे ही बाजू घेणारा या देशातील पहिला महापुरुष म्हणजे डॉ. आंबेडकर.

जास्त लोकसंख्येमुळे देशाचा उध्दार खुंटतो म्हणून १९३७ साली विधानसभेत संतती नियमनाचे बिल डॉ आंबेडकरानीच प्रथम आणले त्यावेळी सरकारने विरोध केला परंतु नंतर तोच विचार या देशाला लागू करावा लागला.

या देशात दलितांना सन्मानाने जगता येत नाही, कारण चार वर्णामुळे आणि जाती भेदामुळे हा देश पोखरला आहे. म्हणून या संस्कृतीचा त्याग करावा असे डॉ आंबेडकरानी ठरविले परंतु तेथेही त्यानी राष्ट्रीय दृष्टीकोन ठेवून या मातीतच निर्माण झालेला आणि

भारतीय संस्कृतीला मिळता-जुळता असा बुध्द धर्म स्विकारला. राष्ट्रीय अस्मिता जाज्वल्य होती म्हणूनच त्यांनी बुध्द धर्म स्वीकारायचा निर्यण घेतला.

गरीब मुलांना शिक्षण घेत असतांना नोकरी करता आली पाहीजे असा विचार डॉ. आंबेडकरांचा होता. संपूर्ण भारतात त्याकाळी सकाळचे कॉलेज नव्हते सिध्दार्थ महाविद्यालय हे देशातील पहिले सकाळचे ( मॉर्निग कॉलेज ) कॉलेज १९४५ साली सुरु केले. अनेक मान्यवर त्या कॉलेज मध्ये शिक्षण घेऊन नोकरी करु लागले.

विद्यार्थ्यांकरीता, कामगारांकरीता आणि महिलांकरीता अनेक सुधारणा त्यांनी केल्या आणि देशाचा विकास घडविला.

डॉ. आंबेडकर हे फक्त दलीतांचे पुढारी असे म्हणून त्यांच्या राष्ट्रीय कार्याच्या अपमान करु नका. त्यांच्या बद्दल जनमानसांत त्याच्या विविध कार्याची ओळख पटविणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे.

त्यांच्या बद्दलचे चांगले विचार जनमानसा समोर आले पाहिजेत म्हणजे त्यांच्या बद्दलचा गैरसमज दूर होऊन एक राष्ट्रभक्त, एक विचारवंत, स्त्रियांचा कैवारी, एक घटना पंडित म्हणून त्याच्या गौरव होणे उचित होईल.

डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वाचा हा धावता आढावा मी आपल्या समोर मांडण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे. सविस्तर चर्चा करण्याची ही वेळ नाही.

माझ्या या थोडक्यात सांगितलेल्या विचारांमुळे डॉ. आबेडकरांच्या संबंधीचे गैरसमज दूर होऊन एक निखळ देशभक्त म्हणून जरी त्याची प्रतिमा उभी राहिली तरी माझ्या प्रयत्नांचे सार्थक झाले असे मी समजेन.

तसेच आज मी सभागृहात विनंती करते कि महड येथे चवदार तळयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य दिव्य असा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात आलेला आहे, तसाच पूर्णाकृती पुतळा मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या आवारात बसविण्यात यावा.

धन्यवाद !

s.y. Gaikwad

~~सुचक~~ अनुमोदक :- श्री. मिलन म्हात्रे

नगरसेवक, मि.भा.म.न. पा.

~~अनुमोदक~~ :- सौ. सरेखा यशवंत गायकवाड

नगरसेविका, मि.भा.म.न.पा.

ठरावाचे वाचन करून कायम करण्यात आला व पुढील कारवाई करिता मा. आयुक्तांकडे सादर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(C)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १३/०४/२००५**

**प्रकरण क्र. ०२ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीच्या *आवारातील उद्यानात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर* यांचा पुतळा बसविणे कामाबाबत विचार करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ०५ :-**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्यदिव्य पुतळा उभारावा असे या शहरातील सर्व नागरिक, पदाधिकारी यांची भावना होती. ती भावना प्रत्यक्षात कृतीत उतरविण्यासाठी या सभागृहात ठराव पारित करण्यांत आनंद वाटतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती व अर्धपुतळा उभारण्यांस ही सभा मंजुरी देत आहे. या कामी अर्थसंकल्पात ४० लक्ष रुपयांची तरतुद केलेली आहे. या कामासाठी सुयोग्य असे संकल्पचित्र मान्यताप्राप्त स्थापत्यकाराकडून तयार करण्यांत यावे. सदर कामी राष्ट्रीय पुरुषाचे पुतळे उभारण्याकामी शासनाने जी संहिता ठरविलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी महानगरपालिका प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या बाजुला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा उभारण्यांत यावा. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवरील फाटकाकडीलचा भाग आता प्रशस्त मोकळा झाला आहे. त्या जागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा तसेच पुतळ्याच्या बाजुला मिरा भाईंदर शहरातील जे स्वातंत्र्य सैनिक आहेत. त्यांचे नामफलक लावण्यांस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

S.Y. Gaikwad

**सुचक :- सौ. सुरेखा गायकवाड.** **अनुमोदक :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(९)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. 13/08/2005

**प्रकरण क्र. 3 :- मागासवर्गीय विशेष भरती मोहिमे अंतर्गत मुलाखतीनुसार निवड झालेल्या उमेदवारांना महानगरपालिका सेवेत नियुक्ती देणे बाबत**

**ठराव क्र.** 08

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मागासवर्गीय अनुशेषांतर्गत खालील रिक्त असलेल्या खालिल पदाकरीता दि. २३/१२/२००४ रोजी मुलाखती घेण्यात आल्या.

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रवर्ग | | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | अ. जाती | अ. जमाती | विजा/भज | |
| १. | लिपिक | - | ५ | २ | ७ |
| २. | पंपचालक | - | - | १ | १ |
| ३. | मिस्त्री | १ | - | - | १ |
| ४. | वॉल्व्हमन | - | १ | - | १ |
| ५. | गंवडी | १ | - | - | १ |
| ६. | पंपमदतनीस | - | - | १ | १ |
| | **एकूण** | **२** | **६** | **४** | **१२** |

वरील पदाकरीता दि. २३/१२/२००४ रोजी मुलाखती घेऊन महानगरपालिका निवड समितीने गुनानुक्रमे खालिल उमेदवारांची निवड केलेली आहे, व प्रतिक्षा यादी तयार केलेली आहे.

| अ. क्र. | निवड झालेल्या उमेदवाराचे नाव | पदाचे नाव |
|---|---|---|
| १. | श्री. रमेश अ. भगत | लिपिक |
| २. | श्री. काशिनाथ रामु भोये | लिपिक |
| ३. | श्री. भोये धिरज यादव | लिपिक |
| ४. | श्रीम. माधुरी नारायण शेंडे | लिपिक |
| ५. | श्रीम. कविता रघुनाथ गारे | लिपिक |
| ६. | श्री. इरकर बापू रामा | लिपिक |
| ७. | श्री. रणजित तुकाराम गावडे | लिपिक |
| ८. | श्री. विठ्ठल पी. चव्हाण | पंपचालक |
| ९. | श्री. प्रविण मिलिंद जाधव | मिस्त्री |
| १०. | श्री. राजेंद्र सदाशिव गवारी | वॉल्व्हमन |
| ११. | श्री. सुहास बी. बागुल | गवंडी |
| १२. | श्री. सतिश काशीनाथ राख | पंपमदतनीस |

**प्रतिक्षा यादीतील उमेदवार**

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्रीम. सुनिता लहानू कोंडर | लिपिक |
| २. | श्रीम. शितल बाबा धनगर | लिपिक |
| ३. | श्री. गजानन एन. इंगळे | मिस्त्री |
| ४. | श्री. उत्तम डी. कांबळे | गवंडी |

निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती पूर्वी जाती प्रमाणपत्र पडताळणी समिति कडील जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच या उमेदवारांना महानगरपालिका सेवेत नियुक्ती देता येईल.

निवड झालेल्या उमेदवारांची जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त होतील त्याप्रमाणे त्यांना महानगरपालिका सेवेत नियुक्ती देण्यास व प्रतिक्षा यादीतील उमेदवारास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :-** ~~[illegible]~~ ~~[illegible]~~ ज्युडी थॉमस डिसोझा

**अनुमोदन :-** एस ए खान

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १३/०४/२००५.

**प्रकरण क्र. ०४ :-** **महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-४ चे शिपाई व सफाई कामगार संवर्गातील कर्मचाऱ्यांना वर्ग-३ च्या पदावर देण्यांत आलेल्या पदोननतीस मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ०७ :-**

मिरा भाइंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील लिपीक संवर्गाची १८९ पदे मंजुर असून पैकी १५० पदे भरलेली आहेत. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग आरडीआर/१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/तेरा, दि. १५ एप्रिल १९९१ नुसार मंजूर १८९ पदांपैकी सरळसेवा भरतीने ७५% पदे व २५% पदे पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने पदोन्नतीसाठी एकूण पदांच्या २५% या प्रमाणात एकूण ४७ पदे निश्चित होतात. यापैकी १९ पदे ही दि. २०/०९/२००३ च्या आदेशान्वये भरण्यांत आली असून आता पदोन्नतीसाठी एकूण २८ पदे शिल्लक आहेत.

सध्या महानगरपालिका आस्थापनेवर लिपीक या पदांच्या २८ जागा रिक्त असून सदर पदोन्नतीचा अनुशेष पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | अनुशेष | पात्र / उपलब्ध |
|---|---|---|---|
| १. | अ. जाती | ३ | १ |
| २. | अ. जाती | ४ | -- |
| ३. | वि.जा. / भ.ज. | ५ | १ |
| | एकूण | १२ | २ |

त्या अनुषंगाने महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांना वर्ग-३ मधील पदावर पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता. त्यानुसार वर्ग-४ मधील शिपाई / कामगार संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती दि. १०/०८/२००४ रोजीच्या पदोन्नती निवड समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यांत आले. सदर बैठकीत संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रता इ. बाबी विचारात घेवून त्यातील पुढील पात्र कर्मचाऱ्यांना वर्ग-३ च्या पदावर पदोन्नती देण्याबाबत निवड समितीने शिफारस केली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव पदनाम | जातीचा संवर्ग | पदोन्नतीचे पद |
|---|---|---|---|
| १ | श्री. रमण त्रिभुवन सोलंकी (शिपाई) | अनु. जाती | लिपीक |
| २ | श्री. वसंत शंकर पेंढारे (स.का.) | वि.जा./अ.ज. (धनगर) | लिपीक |
| ३ | श्री. पंढरीनाथ अंतु भासे (शिपाई) | खुला | लिपीक |
| ४ | श्री. मारुती रा. आहेर (स.का.) | खुला | लिपीक |
| ५ | श्री. शरद फकीरराव पाटील (स.का.) | खुला | लिपीक |
| ६ | श्री. मोहन रामचंद्र पेडवी (स.का.) | खुला | लिपीक |
| ७ | श्री. अशोक दत्तुजी टोपले (स.का.) | खुला | लिपीक |

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव पदनाम | जातीचा संवर्ग | पदोन्नतीचे पद |
|---|---|---|---|
| ८ | श्री. सुरेश सेमा किणी (स.का.) | खुला | लिपीक |
| ९ | श्री. रामकृष्ण नारायण गावडे | खुला | लिपीक |
| १० | श्री. भरत यशवंत राऊत (स.का.) | खुला | लिपीक |
| ११ | श्री. धनराज रघुनाथ ठाकूर (स.का.) | खुला | लिपीक |
| १२ | श्री. श्याम केशवराव चौगुले (स.का.) | खुला | लिपीक |
| १३ | श्री. प्रविण हरिश्चंद्र तांडेल (स.का.) | खुला | लिपीक |
| १४ | श्री. प्रविण एकनाथ पाटील (स.का.) | खुला | लिपीक |
| १५ | श्री. विकास एकनाथ सावंत (स.का.) | खुला | लिपीक |

वरीलप्रमाणे क्रमांक १ ते १५ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच चतुर्थ श्रेणीतून तृतीय श्रेणीत पदोन्नतीसाठी शैक्षणिक पात्रता दिनांक १०/०८/२००४ ते दिनांक १३/०४/२००५ पर्यंत शैक्षणिक पात्रता पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना जेष्ठता यादीनुसार पदोन्नती देण्यांत यावी अशी सुचना मांडत आहे. तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'वायरमन' हे पद मंजूर असून सदर पद सरळसेवेने भरावयाचे आहे. परंतु, सध्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. रविंद्र चितांमण पाटील, सफाई कामगार या पदावर असून ते 'वायरमन' या पदावर पदोन्नती देण्याकरिता पात्र आहेत. दि. १०/०८/२००४ रोजीच्या पदोन्नती निवड समितीपुढे त्यांचा विचार झालेला असल्याने 'वायरमन' हे पद सरळसेवेने ऐवजी पदोन्नतीने भरण्याबाबत बदल करुन श्री. रविंद्र चिंतामण पाटील, यांना सदर पदावर पदोन्नती देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

महानगरपालिकेच्या इतर अधिकाऱ्यांना वर्ग-१ व वर्ग-२ मध्ये पदोन्नती देण्याकरिता ही *सभा मंजुरी देत आहे.*

सुचक :- श्री. मिलन गो. पाटील.

अनुमोदन :- श्री. जयंत पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**

***मिरा भाईंदर महानगरपालिका***

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा, दिनांक १३ एप्रिल, २००५
## प्रकरण क्र. ५

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मिरा भाईंदर मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करणे बाबत.**

ठराव क्र. ८

उपरोक्त प्रकरण क्र. ५ नुसार विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६२ अन्वये व राष्ट्रीय बांधकाम संहिता पर्यावरण कायदा, १९८४ व त्यामधील कोस्टल रिजनल झोनच्या (Coastal Regional Zone) तरतूदी व केंद्र सरकार राजपत्र, महाराष्ट्र शासन राजपत्र, निर्णय, परिपत्रक मधील प्रस्तूत केलेली कार्यवाही व तरतूदीस अधीन राहून मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी नवीन बदलासह सादर केलेल्या संपुर्ण विकास नियंत्रण नियमावलीस ही सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे. (पान क्रं. १ ते २०५)

सुचक : प्रफुल्ल पाटील

अनुमोदक : लिना पाटील

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१४)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १३/०४/२००५

**प्रकरण क्र. ६ :- जेसल पार्क मलनिःसारण केंद्राच्या देखभाल दुरुस्तीच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत ....**

**ठराव क्र. ०९**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पुर्व येथील जेसल पार्क घरकुल प्रकल्पात महानगरपालिकेच्या मालकीचे मलनिःसारण केंद्र आहे. या मलनिःसारण केंद्रात जेसल पार्क प्रकल्पातील इमारतींचे सांडपाणी व मल हे पृथ्थकरणासाठी जमा केले जाते. या व्यतिरिक्त मशीनरी व पंपाची देखभाल/दुरुस्ती, क्लेंरीप्लॅक्युलेटरमधून सांडपाणी व गाळ वेगळा करणे व सांडपाणी तपासणीस पाठविणे ही कामे मलनिःसारण केंद्रात केली जातात.

सदर मलनिःसारण केंद्र देखभाल/दुरुस्तीचे काम कंत्राटी पध्दतीने सुरु आहे. सध्या सुरु असलेल्या कंत्राटाची मुदत दि. ३१.०३.२००५ रोजी पुर्ण होत आहे. याकरीता पुढील वर्षासाठी नवीन निविदा मागवून कंत्राट देणे आवश्यक आहे. सदर कामाचे प्राकलन तयार करणेत आले असून अंदाजीत खर्च रु.१३,९५७४०/- इतका आहे. महानगरपालिकेच्या सन २००५-०६ च्या अंदाजपत्रकात **मलनिःसारण केंद्र देखभाल/दुरुस्ती** या लेखाशिर्षा अंतर्गत सदर खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे. सबब उपरोक्त काम करणेस व तसेच मिरा रोड विभागातील शांती नगर, सृष्टी कॉम्पलेक्स, शांती पार्क व आर. एन. अे. ब्रॉडवे येथील खाजगी मलनिःसारण केंद्रे महानगरपालिकेने हस्तांतरीत करुन घेऊन चालविण्यास ही महासभा मंजूरी देत आहे. तसेच अस्मिता पार्क, मिरा एम.आय.डी.सी. व डोंगरी/पाली पंपिंग स्टेशन वार्षिक ठेका पध्दतीने चालविण्यास येणा-या खर्चास ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक : - सौ. शानू गोहिल

अनुमोदक :- श्री मोहन पाटील

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**ठराव सर्वानुमते मंजूर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/०५/२००५
## (दि. १३/०४/२००५ रोजीची तहकुब सभा)

**ठराव क्र. १० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रभाग समितीची निवडणुक नुकतीच पार पडली. त्या निवडणुकीत प्रभाग समिती क्र. १ मध्ये सन्मा. सदस्य आसिफ शेख, प्रभाग समिती क्र. २ मध्ये सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स, प्रभाग समिती क्र. ३ मध्ये सन्मा. सदस्य नरेन्द्र मेहता आणि प्रभाग समिती क्र. ४ मध्ये सन्मा. सदस्य आसिफ पटेल ह्या चार अध्यक्षांची काल निवडणुक झाली. ते अध्यक्ष म्हणून निवडुन आले त्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५.०५.२००५

प्रकरण क्रमांक ०७ :- विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

ठराव क्रमांक :- (११)

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विविध विकास कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. सदर अंदाजपकांकरीता सन २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) न्यू साई कृपा कॉम्पलेक्स ते गोल्डन नेस्ट डी.पी.रोड पर्यत सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.१२,७५,२१५/- |
| २ | भाईंदर (पूर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग वरील दिपक हॉस्पीटल ते नवराज अपार्टमेंट पर्यत सी..सी. नाला बांधुन स्लॅब टाकणे. | रू.३९,०५,१००/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र.२५ मधिल रोजवुड बिल्डींग ते कनकिया रोडला जोडणारा रस्ता तयार करणे. | रू.२१,४४,४५०/- |
| ४ | भाईंदर (पूव) उड्डाणपूल जंक्शन ते साईबाबा मंदिर रस्ता तयार करणे. | रू.९२,४६,१५५/- |
| ५ | मुख्य कार्यालय इमारतीच्या तळ मजल्यावर मुख्य दरवाजा ते जीना व लिफ्ट पर्यत लॅडस्केपींग व सुशोभिकरण करणे व अद्ययावत टाईल्स बसविणे. | रू.१४,४८,५००/- |
| ६ | भाईंदर पूर्व चिंतामणी अपार्टमेंट ते खाडी कडे नाला नुतनीकरण करणे. | रू.२०,५०,०००/- |
| ७ | भाईंदर (पूर्व) एस.व्ही.रोड रस्ता पृष्ठीकरण करणे. | रू.११,६४,७००/- |
| ८ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र.२४ औद्योगिक विभागातील नविन रस्ते व गटार दुरूस्ती करणे. | रू.१५,००,५००/- |
| ९ | भाईंदर (पूर्व) एस.एन.कॉलेज पासून खाडी पर्यत नाला पूर्नबांधणी करणे. (भाग-२) | रू.१,५५,००,०००/- |
| १० | रा.म.क्र.८ वरील श्री.महाविष्णू मंदिर ते नविन गावठण पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूस सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतून) | रू.४५,७०,५८१/- |
| ११ | माशाचा पाडा रस्ता ब्रिज ते तलावापर्यत सोलिंगसह, खडीकरण व डांबरी करण करणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतून) | रू.४१,३७,८३२/- |
| १२ | भाईंदर पूर्व मांडवी पाडा येथे सेंट झेवियर्स हायस्कुल ते शनिवार हिंगे यांच्या घरापर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतून) | रू.३१,२८,७५८/- |
| १३ | मिरा रोड आरक्षण क्र.१९२, १९३ मध्ये नागरीकांकरीता रक्तपेढी, वातानुकुलीत शवागृह, दवाखाना व वाचनालय इ. करीता इमारत बांधणे (आमदार निधीतून) | रू.१,३१,४७,६७५/- |
| १४ | चेना गांव येथे हॉटेल हिल व्ह्यू ते शाळेपर्यत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | रू.१२,००,०००/- |
| १५ | चेणागांव येथे नविन शाळागृह इमारत बांधणे. | रू.२८,००,०००/- |
| १६ | प्रभाग क्र.१० मध्ये घोडबंदर रोडवर वर्सोवा जंक्शन व प्रेमसन्स कॉटेज जवळ कलवर्ट बांधणे. | रू.२०,००,०००/- |
| १७ | काशिमिरा येथे पोलिस स्टेशन जवळील स्मशानभूमी सुशोभित करणे. | रू.२०,००,०००/- |
| १८ | रा.म.क्र.८ वर जनतानगर येथे सी.सी.पाथवे व चॅनल टाकणे. | रू.१३,००,०००/- |
| १९ | रा.म.क्र.८ वर पेणकरपाडा येथे गावंड चाळ, वर्तक अळी, प्राथमिक शाळेचा परिसर, किसननगरी अंतर्गत सी.सी.पाथवे व लादी व पेव्हर ब्लॉक बसविणे. | रू.१९,९०,०००/- |
| २० | मिरागांव येथे मार्केट, कर व आरोग्य कार्यालय बनविणे | रू.१३,५०,०००/- |
| २१ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या डाव्या बाजुस ते सिल्व्हर पार्क रस्त्या पर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.७१,५२,७१०/- |

| | | |
|---|---|---|
| २२ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या उजव्या बाजूस जेम्मू काश्मीर बँक ते शांतीपार्क नाल्यापर्यंत गटार व स्लॅब टाकणे. | रू.४०,९०,५४०/- |
| २३ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या उजव्या बाजूस निलसागर हॉटेल ते शांती पार्क नाला पर्यत गटार व स्लॅब टाकणे. | रू.५०,०६,८२०/- |
| २४ | मिरारोड रेल्वे उड्डाणपूल लोढा पार्क ते नरेंद्र पार्क पर्यत रस्त्याच्या डाव्या बाजूस गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.७५,०३,९००/- |
| २५ | मिरा रोड चंद्रेश रिसोर्ट ते लोढा पार्क ते नरेंद्रपार्क पर्यत रस्त्याच्या उजव्या बाजूस गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.६१,१२,४८०/- |
| २६ | मिरारोड नरेंद्र पार्क ते शांती नगर से-१ रस्त्यापर्यत डाव्या बाजूस नाला बांधून स्लॅब टाकणे. | रू.३५,०४,१६०/- |
| २७ | मिरारोड येथे शांतीनगर शॉपींग सेंटर ते मच्छीमार्केट पर्यत नाल्याची पूर्नबांधणी करून स्लॅब टाकणे. | रू.८७,०१,१५०/- |
| २८ | मिरारोड येथे शगुन हॉटेल ते सृष्टी नविन पोलिस चौकी पर्यत रस्त्याच्या डाव्या बाजूस आर.सी.सी. नाला बांधणे व स्लॅब टाकणे. | रू.१,३५,६२,४९०/- |
| २९ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (काशिमिरा रोड) उड्डाणपूल ते राष्ट्रीय महामार्ग क्र.८ पर्यत रस्ता रूंदीकरण, डांबरीकरण करणे व रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर.सी.सी. नाल्यासह फुटपाथ बांधणे. मुळ अंदाजपत्रक<br>सुधारित अंदाजपत्रक | रू.२७,४८,५४,९४१/-<br>रू.३८,७७,८२,६३४/- |
| ३० | भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे वरील उड्डाणपूल व जोडरस्ते बांधणे. मुळ अंदाजपत्रक<br>सुधारित अंदाजपत्रक | रू.१६,५२,५१,५००/-<br>रू.२१,०७,००,०००/- |
| ३१ | मिरारोड शांतीनगर से.४ पासून स्टेशन कडे जाणा-या रस्त्यावर डाव्या बाजूस नाला बनविणे. | रू.४०,१२,३००/- |
| ३२ | मिरारोड शांतीनगर से.४ पासून सृष्टी जूनाब्रिज पर्यत गटार बांधणे. (दोन्हीबाजुस) | रू.१,००,१८,४५०/- |
| ३३ | मिरारोड शिवपूजा इमा. ते जांगीड इस्टेट (हेरलपार्क) पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रू.४४,२५,२७०/- |
| ३४ | मिरारोड गौरव गॅलक्सी ते शगून हॉटेल पर्यत आर.सी.सी.नाला बनविणे. | रू.६२,९१,३७०/- |
| ३५ | मिरारोड शांती नगर सर्कल ते एस.टी.पी. पर्यत डाव्या बाजूस सी.सी. नाला बांधणे व स्लॅब टाकणे. | रू.४८,४२,५००/- |
| ३६ | मिरारोड ग्रीन व्हयू इमारत ते गौरव गॅलक्सी मध्ये रस्ता बनविणे व एका बाजुस गटार बनविणणे. | रू.३६,७९,४००/- |
| ३७ | मिरारोड विजय पार्क येथे शिवपूजा इमारत ते रश्मी उत्सव पर्यत रस्ता उंच करून मजबूतीकरण करणे. | रू.४७,२१,७५०/- |
| ३८ | मिरारोड लोढा पार्क ते रेल्वे ओव्हर ब्रिज जंक्शन पर्यत रस्ता मजबुतीकरण करणे. | रू.४८,५६,६८०/- |
| ३९ | मिरारोड येथे गितानगर ते सोनाली हॉटेल रोड पर्यत गटार बांधणे. | रू.२२,५७,७२५/- |
| ४० | मिरारोड येथे जांगीड सर्कल ते सृष्टी कडे जाणा-या रोडवर आर.सी.सी. डिव्हायडर बसविणे. | रू.२७,९२,१२०/- |
| ४१ | मिरारोड येथे स्टेशन सर्कल ते साईल फराझ व शितलनगर जंक्शन ते सिंगापूर प्लाझा आर.सी.सी.डीव्हायडर बसविणे. | रू.१५,७०,५७०/- |
| ४२ | मिरारोड साईबाबा नगर येथे अरिहंत टॉवर ते वैभव दर्शन ते एम.टी.एन.एल. रस्त्यावर गटार दुरूस्ती करणे तसेच नविन गटार बांधणे. | रू.१२,७४,९००/- |
| ४३ | मिरा रोड पार्श्वनगर ते एन.एच.हायस्कूल रोड पर्यत गटार बांधणे. | रू.१४,०७,३५०/- |
| ४४ | मिरा रोड तुंगा हॉस्पीटल ते नर्मदा पॅराडाईज पर्यत रस्ता रूंदीकरण व गटार बांधणे. | रू.१२,५१,१५०/- |
| ४५ | मिरा रोड चंद्रेश अभिषेक ते चंद्रेश महल रस्ता रूंदीकरण व मजबूतीकरण करणे. | रू.१४,९६,४९०/- |

| | | |
|---|---|---|
| ४६ | मिरा रोड येथे एस.के.स्टोन ते उघाडीपर्यत नाला बांधणे व रस्ता दुरूस्ती करणे. | रू.१३,७७,०६०/- |
| ४७ | शांतीनगर सेक्टर ११ पासून ते सिंगापूर प्लाझा पर्यत रस्ता रूंद करणे व डीव्हायडर बसविणे. | रू.५२,३६,९१०/- |
| ४८ | भाईंदर पूर्व जय अंबे इंडस्ट्रीयल इस्टेट मधिल अंतर्गत सी.सी. गटार व सी.सी.रस्ते करणे. | रू.१५,00,000/- |
| ४९ | चौक धक्का येथे रॅम्प बनविणे. | रू.३0,00,000/- |
| ५0 | उत्तन पातान बंदर पॉलची वाडी, येथिल अंतर्गत रस्ते सी.सी.बनविणे. | रू.१५,00,000/- |
| ५१ | पाली येथे मराठी शाळेपासून सुर्या निकेतन हॉस्पीटल पर्यत रस्ता पूर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.२५,५0,000/- |
| ५२ | मुर्धा येथिल स्मशानभूमी जवळील गार्डन विकसित करणे. | रू.१२,३0,000/- |
| ५३ | मुर्धा खाडी येथे राम यादव यांच्या घराच्या बाजूला शौचालय बांधणे. | रू.२,५0,000/- |
| ५४ | डोंगरी येथे घन कचरा प्रकल्पासाठी कंपाउंड वॉल बांधणे. | रू.९0,२0,000/- |
| ५५ | भाईंदर (प) बुरहानी नगर ते चिंतामणी पर्यत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.१८,२८,७00/- |
| ५६ | भाईंदर (प) क्रांतीनगर येथिल हनुमान मंदिर ते आरोग्य केंद्रापर्यत नाला बांधणे. | रू.५१,८६,७00/- |
| ५७ | भाईंदर (प) गितानगर येथिल भवानीपार्क ते कपोलवाडी पर्यत सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.११,६८,१00/- |
| ५८ | भाईंदर (प) मांडली तलाव ते टेंभा हॉस्पीटल पर्यतचा उर्वरीत डी.पी.रस्ता खडीकरण करून डांबरीकरण करणे. | रू.२७,८४,७00/- |
| ५९ | भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल ते रेल्वे उड्डाणपूल क्रॉस रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू.१६,३९,५00/- |
| ६0 | फाउंटन हॉटेल जंक्शन ते ठाणे जकात नाका येथिल रस्त्याच्या दुभाजक येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रू.७८,00,000/- |

वरील सर्व कामांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यात येत आहे. अ.क्र.१0, ११ व १२ ची कामे महानगरपालिका निधितून करण्यात यावीत व दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी प्राप्त झाल्यावर महानगरपालिका निधीत जमा करण्यात यावा. अ.क्र.१३ च्या कामी आमदार निधीतून निधी उपलब्ध होणार आहे. परंतू निधी उपलब्ध न झाल्यास उर्वरीत खर्च महानगरपालिकेच्या निधितून करण्यात यावा. अ.क्र.२९ व ३0 चे काम वगळता इतर सर्व कामे मा.स्थायी समिती सभेपुढे ठेऊन प्राधान्य यादी ठरवून अर्थसंकल्पीय तरतूदीनूसार निविदा मागविण्यात याव्यात. तसेच या पुढे रू.५0.00 लक्ष पर्यतच्या कामांना मा.स्थायी समिती सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात यावी. तसेच वरील कामांव्यतिरिक्त नगरसेवकांच्या प्रभागातील इतर कामांची अंदाजपत्रके तयार करून मा.स्थायी समितीपुढे सादर करावीत असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

सुचक :- श्री महेंद्रसिंह चौहान

अनुमोदन :- श्री एस.ए.खान

ठराव बहुमताने मंजूर

पिठासन अधिकारी

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा . महासभा दि . १३.४.२००५

प्रकरण क्र . ६ :- पाणी पुरवठा विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रभागात बिडाच्या जलवाहिन्या टाकणे .

ठराव क्र . ७२

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात स्टेम प्राधिकरणाकडून प्रतिदिन ८१ दललि मंजुर कोटयातून पाणी पुरवठा होत आहे . महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार ५० दललि पाणी पुरवठा योजनेअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजनेतील उपांगांची कामे चालू आहेत . सदरच्या उपांगास पुरक व नागरीकांना पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा करणेसाठी सक्षम वितरण व्यवस्था असणे आवश्यक आहे . तसेच ग्रामपंचायत काळात शहरामध्ये त्यावेळच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार विविध व्यासाच्या सिमेंटच्या जलवाहिन्या टाकणेत आल्या होत्या . सदरच्या सिमेंटच्या जलवाहिन्या नवीन पाणी पुरवठा योजना अंशत: कार्यान्वित झाल्यावर पाण्याच्या दाबास टिकत नसल्याने वारंवार गळती होत आहेत . परिणामी नागरीकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे . म्हणून सदरच्या जलवाहिन्या आताच्या लोकसंख्येच्या मानाने व सद्यस्थितीतील पाण्याचा दाब विचारात घेऊन बदलणे आवश्यक आहे . करिता महानगरपालिका क्षेत्रात आवश्यक ठिकाणी जलवाहिन्या टाकणेसाठी व अस्तित्वातील सिमेंटच्या जलवाहिन्या बदलणेसाठी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन ०४-०५ सालातील चालू दरसूचीनुसार अंदाजपत्रके तयार करणेत आली आहेत . सदर अंदाजपत्रकामध्ये आवश्यकतेनुसार झडपा, जोड साहित्य (मेकॅनिकल फिटींग), खोदाई, पाईप पुरवठा करून अंथरणे, जोडणे व यशस्वी दाबचाचणी देणे इ . बाबींचा समावेश करणेत आला आहे . तसेच पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील विविध जलवाहिनीतील पाण्याचा दाब समान राहण्यासाठी अस्तित्वातील जलवाहिन्यांना क्रॉस कनेक्शन करणेचाही प्रामुख्याने समावेश केला आहे .

| अ.क्र. | कामाचे नाव | व्यास (मी.मी) | लांबी (मी) | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | भाईदर पश्चिम राई शिवनेरी येथे वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिनी अंथरणे | १००<br>१५०<br>२०० | १३७५<br>४००<br>२० | २८२१२००.०० |
| २ | भाईदर पश्चिम उत्तन पाली गाव येथे वितरण व्यवस्थेसाठी वाढीव जलवाहिनी अंथरणे. | १००<br>१५० | १०००<br>५० | १४०९१००.०० |
| ३ | भाईदर पश्चिम उत्तन गाव येथे वितरण वितरण व्यवस्थेसाठी वाढीव जलवाहिनी अंथरणे. | १०० | १००० | ११८४०००.०० |
| ४ | भाईदर पश्चिम येथील गीता नगर ते गणेश मंदीर येथे जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलून नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | १५० | ७०० | ११५००००.०० |
| ५ | भाईदर पश्चिम येथील टेंभा रोड ते रेल्वे ओव्हर ब्रिज पर्यंत नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | १५०<br>२०० | ४५०<br>९०० | २५३४१६०.०० |
| ६ | भाईदर पश्चिम येथे गणेश देवल नगर येथे नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | ८०<br>१००<br>१५० | १०००<br>५००<br>२५० | १८५००००.०० |
| ७ | मिरा रोड येथे विजय पार्क परिसरात बिडाची जलवाहिनी अंथरणे | २००<br>२५० | २००<br>३०० | १२०५४२५.०० |
| ८ | मिरा रोड हटकेश परिसरात बिडाची जलवाहिनी अंथरणे | २५०<br>२०० | ८२०<br>२५० | ३१३८४००.०० |
| ९ | मिरा रोड (काशी) नित्यानंद नगर मध्ये बिडाची जलवाहिनी अंथरणे | २०० | ९०० | १६९२७३८.०० |
| १० | मिरा रोड परिसरात मिरा पंपींग स्टेशन ते एम.आय.डी.सी.सम्प पर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे | ३०० | ५५० | १८७८३३१ |
| ११ | भाईदर पुर्व परिसरात गोडदेव टाकी साईकृपा कॉम्पलेक्स ते गोडदेव स्मशान भुमी रोड पर्यंत बिडाची जलवाहिन्या अंथरणे. | ४००(M.S.)<br>४००<br>३५० | १२०<br>२३०<br>२५० | ३०९००५०.०० |
| १२ | मिरा रोड विभागात शितल नगरपरिसरात बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | १००<br>१५०<br>२५० | ५००<br>५००<br>१५० | १६३५९५०.०० |
| १३ | मिरा रोड शांती विद्या नगरी परिसराकरीता विभागात बिडाची जलवाहिनी अंथरणे. | ३००<br>२५० | ७५०<br>८२० | ४५७१७००.०० |
| १४ | काशी गावामध्ये जुन्या सिमेंटच्या जलवाहिन्या बदलून नवीन बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | १००<br>१५०<br>३०० | १०००<br>३००<br>२०० | २१५८७३५.०० |

२८



| अ.क्र. | कामाचे नाव | व्यास (मी.मी) | लांबी (मी) | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १५ | मिरा रोड येथे शांती पार्क विभागात बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | २०० | २०० | |
| | | २५० | ५५० | |
| | | ३०० | ४०० | ३०९०७१५.०० |

वरील विकास कामे अत्यावश्यक सेवेतील असून सदर विकास कामांना ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देऊन पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे. तसेच यापुढे रू.५०.०० लक्ष रकमेपर्यंतची कामे प्रशासकीय व आर्थिक मान्यतेकरीता मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात यावीत व मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसारच पुढील कार्यवाही करणेत यावी. असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

सुचक
श्री. केशव घरत

अनुमोदक
श्री चंद्रकांत मोदी

ठराव ~~सर्वानुमते~~ बहुमताने मंजुर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/०५/२००५
## (दि. १३/०४/२००५ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ०९ :- सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे दिनांक ११/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

प्रशासकीय ठराव क्र. ७१, दि. २९/०४/२००२ रद्द करुन नव्याने पदनिर्मिती करुन शासनाची मंजुरी घेणेबाबत. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ६८)

ठराव क्र. १३ :-

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/०५/२००५
## (दि. १३/०४/२००५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. १०:-** **सन्मा. सदस्या श्रीम. रिटा शाह यांचे दिनांक ११/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.**

**संत गाडगेबाबा अभियाना अंतर्गत प्रभागाप्रमाणे नालेसफाई, गटारसफाई बाबत सादर केलेल्या अहवालावर महासभेत चर्चा करुन निर्णय घेणे. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ६९)**

**ठराव क्र. १४ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(36)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/०५/२००५
## (दि. १३/०४/२००५ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. ११ :- सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे दिनांक ११/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा स्मारकासह सुशोभित करणे व स्थानिक स्वातंत्र्य सैनिकांची नावे फलकावर कोरुन स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक सुशोभित करणेबाबत. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७०)

ठराव क्र. १५ :-

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(३८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/०५/२००५
## (दि. १३/०४/२००५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. १२ :-** **सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल (गाडोदिया) यांचे दिनांक ११/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. स्थायी समिती सभा दिनांक ०६/११/२००३ प्रकरण १५७, ठराव क्र. १३७, मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरातील इमारती, स्वतंत्र बंगले, स्वतंत्र मालकीची घरे यांना ज्या वर्षी नगरपालिका/महानगरपालिका यांनी सर्वात प्रथम कर आकारणी करुन घरपट्टी वसुल केली आहे त्या वर्षीचा निकष पकडून घरपट्टी लावणेबाबत. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७१)**

**ठराव क्र. १५(अ) :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/०५/२००५
## (दि. १३/०४/२००५ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. १३ :- सन्मा. सदस्य श्री. केशव घरत यांचे दिनांक १३/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

घोडबंदर किल्ला पुरातत्व विभागाकडून महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७२)

ठराव क्र. १५(ब) :-

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००५

**प्रकरण क्र. १४ :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीवर नउ महिला सदस्यांची ठरावाद्वारे निवड करणे**

**ठराव क्र. १६ :-**

प्रकरण पाहता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महापालिका सदस्यांमधून ९ पालिका सदस्यांची नेमणूक ठरावाद्वारे करण्यात येत आहे.

**महिला व बालकल्याण समिती**

१) सन्माननीय नगरसेविका :- सौ. जयाबाई यशवंत भोईर

२) सन्माननीय नगरसेविका :- सौ. जिवी हिरा वाडे

३) सन्माननीय नगरसेविका :- सौ. उर्मिला कोमल भामरे

४) सन्माननीय नगरसेविका :- सौ. हेलन जॉर्जी गोविंद

५) सन्माननीय नगरसेविका :- सौ. सुरेखा यशवंत गायकवाड

६) सन्माननीय नगरसेविका :- सौ. मुक्ता प्रविण रांजणकर

७) सन्माननीय नगरसेविका :- सौ. गीता भरत जैन

८) सन्माननीय नगरसेविका :- सौ. शुभांगी सिताराम नाईक

९) सन्माननीय नगरसेविका :- सौ. नयना गजानन म्हात्रे

वरीलप्रमाणे महिला व बालकल्याण समिती (विशेष) सदस्यांची मुदत एक (१) वर्षाची राहिल. असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी अल्मेडा**

**ठराव बहुमताने मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००५

**अभिनंदन ठराव क्र. १६(अ) :-**

मा. पालकमंत्री, आदरणीय गणेश नाईकसाहेब यांनी मिरा भाईंदर हा माझ्या अखत्यारित असलेला भाग असल्यामुळे त्या मतदार संघामध्ये पाण्याची पूर्तता करण्यात यावी अशी माझीसुध्दा धारणा आहे. त्याकरिता आदरणीय गणेश नाईकसाहेबांनी संपूर्ण प्रयत्न करुन आपल्याला त्यावेळेला आश्वासन दिलेले होते. प्रशासनाने त्यांच्याशी जो संपर्क साधला त्यावेळी आपल्याला १०० एम.एल.डी.पाणी दयावे किंवा देण्यात यावे असे उत्तर आपल्याला दिलेले आहे आणि आपल्याला असे उत्तर नवी मुंबईकडून आलेले आहे. त्याबद्दल आदरणीय गणेश नाईकसाहेब यांच्या अभिनंदनाचा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. २०/०६/२००५

**प्रकरण क्र. १५ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेस नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून पाणी उपलब्ध होणेबाबत.**

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई शेजारी असून औद्योगिकरणामुळे शहरामध्ये रोजगारानिमित्त येणाऱ्या लोकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सन १९९१ साली शहराची लोकसंख्या १.७५ लक्ष वरुन ती सन २००१ साली ५.२७ लक्ष इतकी झाली. यावरुन लोकसंख्या वाढीचा दर सुमारे २०० टक्के एका दशकात झाला आहे. देशातील इतर शहरांच्या तुलनेने लोकसंख्या वाढीचा सरासरी दर केवळ २० टक्के अपेक्षित आहे. आजमितीस शहराची लोकसंख्या ७.५० लाखापेक्षा जास्त असून शहराचे झपाट्याने नागरीकीकरण होत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात येऊन तीन वर्षे झाली असून नागरीकांना मुलभूत नागरी सुविधा पुरविणेसाठी महानगरपालिका प्रयत्नशिल आहे.

मिरा भाईंदर शहराला स्वतःचा जलस्त्रोत उपलब्ध नाही व निर्माण होणेही नजिकच्या काळात शक्य वाटत नाही. सध्या स्टेम प्राधिकरणामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ८१ द.ल.लि. प्रतिदिन पाणी आरक्षण असून, स्टेम प्राधिकरणाकडून मिळणाऱ्या ८१ द.ल.लि. पाण्याचे कौशल्याने व चोख व्यवस्थापन करुन नागरिकांना वितरीत करणेंत येत आहे.

सध्या स्टेम प्राधिकरणाकडून मिळणारे ८१ द.ल.लि. पाणी सद्य स्थितीत नागरिकांना पुरेसे होत असले तरी प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या विचारात घेता, येत्या एक-दोन वर्षात नक्कीच पाणी पुरवठा कमी पडणार असून शहराच्या दृष्टीने ही चिंताजनक बाब आहे. सध्या मिळणारे ८१ द.ल.लि. पाणी आजच्या ७.५० लक्ष नागरिकांना पुरेसे होत असले तरी सन २०११ मध्ये वाढीव लोकसंख्येसह सुमारे २०० द.ल.लि. व सन २०२६ मध्ये सुमारे २०.०० लक्ष लोकसंख्येसाठी २५६.०० द.ल.लि. पाण्याची आवश्यकता आहे. म्हणून वाढीव लोकसंख्येबरोबर जास्तीच्या पाण्याची आवश्यकता असल्याने स्टेम प्राधिकरणाकडे तातडीने अतिरिक्त २५ द.ल.लि. वाढीव पाण्याची मागणी करणेंत आली होती. परंतु, स्टेम प्राधिकरणाकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे. तसेच नजीकच्या मुंबई महानगरपालिकेला प्रतिदिन ४००० द.ल.लि. पाण्याची आवश्यकत असतांना सध्या ३००० द.ल.लि. पाणी त्यांचेकडे उपलब्ध असल्याने त्यांचेकडूनही पाणी उपलब्ध होईल असे वाटत नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेने नुकतेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून ४५० द.ल.लि. क्षमतेचे मोरबे धरण मालकी तत्वावर स्वतःकडे घेतले आहे. सदर बाबत सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील व सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर ह्यांनी सुचविले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेला अतिरिक्त १०० द.ल.लि. पाणी पुरवठा होण्यासाठी नविन पाणी पुरवठा योजना हाती घेण्यांत यावी.

सदर योजनेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेचे स्वतःच्या मालकीच्या मोरबे येथील धरणामध्ये जास्त प्रमाणात असलेल्या साठ्यामधून मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी १०० द.ल.लि. पाण्याचा कोटा आरक्षित करण्यांत यावा व तसा मागणी प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेकडे त्यांचे पत्र क्र. नमुंमपा/राअ/काअ(मो/नि)९९२/२००५, दि. ०९/०६/२००५ च्या अनुषंगाने पाठविण्यांत यावा.

सदर कामांची तांत्रिक अनुषांगिक कामे पार पाडणेसाठी सल्लागार नेमण्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सदर ठरावास महासभा मंजुरी देत असतांना आदरणीय पालकमंत्री मा. ना. श्री. गणेशजी नाईक साहेब यांचे सदर कामी अत्यंत मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे त्यांना ही महासभा खास धन्यवाद देऊन अत्यंत मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे त्यांना ही महासभा खास धन्यवाद देऊन त्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा करीत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. जयंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(४३)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि.०४/०७/२००५

प्रकरण क्र. १६ मा. महापौर व मा. पदाधिकारी यांच्या अभ्यास दौऱ्याबाबत..

ठराव क्र. - १८ **IHS. India ( Institiue of Housing and urban Development Studies of India)**यांचेकडील दि. ७ मे २००५ च्या पत्रान्वये दि. ३१ जुलै ते दि. ११ ऑगस्ट २००५ या कालावधी मध्ये ऑस्ट्रेलिया व न्युझिलंड या देशामध्ये आभ्यास दौऱ्यासाठी मा. महापौर व पदाधिकारी यांना आमंत्रित केलेले आहे. सदर आभ्यास दौऱ्याचा विषय हा **Good Governance-Focus Public Sector Reform** असून, आभ्यास दौऱ्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिके तर्फे मा. महापौर, उपमहापौर, मा. आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधि यांना महानगरपालिकेची आर्थिक स्थिती व अर्थसंकल्पीय तरतुद पहाता ही सभा ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड या देशात अभ्यास दौऱ्या करिता आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे. तसेच या व्यतिरिक्त जे नगरसेवक स्वखर्चाने वरील अभ्यास दौऱ्यासाठी जाण्यास इच्छुक आहेत त्यांना देखिल ही सभा मंजूरी देत आहे.

(श्री. आसिफ पटेल) — सुचक

( शुभांगी नाईक ) — अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ४/७/२००५

प्रकरण क्रमांक १७ :- भाईदर उत्तन हा सार्वजनिक बांधकाम खात्याचा रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत.

ठराव क्रमांक - ७९

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील भाईदर उत्तन हा रस्ता सध्या सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचे मालकीचा आहे. सदर रस्ता महानगरपालिकेने ताब्यात घ्यावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी व अन्य नागरीक यांनी मागणी केली आहे. मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भाईदर उत्तन रस्त्याची लांबी १०.०० कि.मी व सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याची रूंदी ७.०० मी एवढी आहे. डी.पी. नुसार रस्त्याची रूंदी ३०.०० मी एवढी आहे.

तरी सदर राज्य मार्ग क्र ४२ CH ५/६०० ते १३/९०० (सुभाष चंद्र बोस मैदान ते रामरत्न हायस्कूल गोराई)

CH ०/० ते १/७०० भूत बंगला ते उत्तन बस स्टॉप

हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मिरा-भाईदर महानगरपालिके कडे हस्तांतर करून घेण्यास, हस्तांतर करणे कामी येणा-या खर्चास, व आवश्यक तो पत्रव्यवहार व कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. विकास करते वेळी बाधित झालेल्यांना FSI/TDR नविन प्लॅन करतेवेळी देण्यात यावा

सूचक - मोहन म. पाटील

अनुमोदन - मिलन पाटील

ठराव ~~सर्वानुमते~~ बहुमताने मंजूर

पिठासन अधिकारी
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ४/ ६ /२००५.

**प्रकरण क्र. ९८ :- महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांकरिता गणवेश खरेदीबाबत.**

**ठराव क्र. २० :-**

वरील संदर्भिय विषयान्वये सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षाकरिता महानगरपालिकेतर्फे मुलांना मोफत गणवेश वाटप करण्याबाबत मा. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ यांचेकडून मागणी करण्यांत आली आहे. सदरच्या मागणीनुसार खालीलप्रमाणे मुले / मुलींची संख्या पटानुसार दर्शविली आहे.

| वयोगट | ६ ते ८ | | ६ ते ८ | | ८ ते १० | | ८ ते १० | | १० ते १२ | | १० ते १२ | | १२ ते १४ | | एकुण पटसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | पहिली | | दुसरी | | तिसरी | | चौथी | | पाचवी | | सहावी | | सातवी | | |
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | |
| पटसंख्या | ८६५ | ८४५ | ७६७ | ७२७ | ७५८ | ८०२ | ७०० | ७३९ | ६२६ | ६३२ | ६०९ | ६४२ | ५८२ | ५९१ | ९८८६ |

तसेच मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र स्टेट पावरलूम्स कॉर्पोरेशन लि. यांनी दिलेल्या पत्र क्र. ३२२, दि. १८/०५/२००५ नुसार वयोगटानुसार प्रती ड्रेसची रक्कम दर्शविलेली आहे.

| अ.क्र. | तपशिल | | मुलांसाठी प्रति ड्रेस | मुलींसाठी प्रति ड्रेस |
|---|---|---|---|---|
| १. | वयोगट - ६ ते ८ | (पहिली) | १००.८३ | १२४.८३ |
| २. | वयोगट - ८ ते ९ | (दुसरी, तिसरी) | ११२.८३ | १४५.०३ |
| ३. | वयोगट - १० ते १२ | (चौथी, पाचवी) | १२४.८३ | १६३.२३ |
| ४. | वयोगट - १२ ते १४ | (सहावी, सातवी) | १३६.८३ | १८२.४३ |

प्रत्येक विद्यार्थ्याकरिता दोन याप्रमाणे खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| मुले | | | | मुली | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **इयत्ता** | **एकूण गणवेश** | **दर** | **एकूण रक्कम** | **इयत्ता** | **एकूण गणवेश** | **दर** | **एकूण रक्कम** |
| १ ली | १७३० | १००.८३ | १,७४,४३५.९० | १ ली | १६९० | १२४.८३ | २,१०,९६२.७० |
| २ री, ३ री | ३०५० | ११२.८३ | ३,४४,१३१.५० | २ री, ३ री | ३०५८ | १४५.०३ | ४,४०,४४३.७४ |
| ४ थी, ५ वी | २६५२ | १२४.८३ | ३,३१,०४९.१६ | ४ थी, ५ वी | २७४२ | १६३.२३ | ४,४७,५७६.६६ |
| ६ वी, ७ वी | २३८२ | १३६.८३ | ३,२५,९२९.०६ | ६ वी, ७ वी | २४६६ | १८२.४३ | ४,४९,८७२.३८ |

सन २००५-०६ या अर्थसंकल्पात ''ड'' प्राथमिक / माध्यमिक शिक्षण (४) शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश, बॅच मोफत वाटप या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रु. २५,००,०००/- इतकी तरतुद करण्यांत आली आहे.

सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापेक्षा विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. एकूण ९८८६ विद्यार्थ्यांकरिता दोन ड्रेस याप्रमाणे वाटप केल्यास एकुण २७,२४,२९१.१० इतका खर्च अपेक्षित आहे.

ऐवजी स्वतः महापालिकेतर्फे गणवेश खरेदी करावेत; सदर प्रमाणे

त्यामुळे सदरचे गणवेश मे. महाराष्ट्र स्टेट पावरलूम्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याकडून खरेदी करणेंस व वाढीव येणारी रक्कम शिक्षण विभागातील लेखाशिर्षक ड शिक्षण - प्राथमिक / माध्यमिक शिक्षण (२) शाळा इमारत दुरुस्ती मधील रक्कम रु. २५० लाख पुर्वविनियोजन करुन येणाऱ्या आर्थिक खर्चास ही सभा आर्थिक प्रशासकीय मंजूरी देत आहे. व स्थायी समितीचे अधिकार असल्याने त्याची अंमलबजावणी स्थायी समितीने करावी तसेच आर्थिक प्रशासकीय मंजूरीची रु. ५० लक्ष पर्यंतची प्रकरणे स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावीत.

सुचक :-

अनुमोदन :-

**ठराव सर्वानुमते मंजुर**

शशीकांत शर्मा

मिलन पाटील

महापौर तथा
पिठासन अधिकारी
मिरा - भाईंदर महानगरपालिका

# मिरा--भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

मा. महासभा दि. २०/०६/२००५ तहकुब दि. १/७/०५

प्रकरण क्रमांक : ११ महानगरपालिका बालवाडयामधील विद्यार्थ्यांना सन २००५-२००६ पर्यंत सकस आहार पुरवठा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्रमांक : २७

मिरा--भाईदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण २६ बालवाडया आहेत. सदर बालवाडयामध्ये १८५० मुले--मुली पूर्व प्राथमिक शिक्षण घेत आहे. सदर बालवाडयांमध्ये सकस आहार पुरवठा करणेकामी आकांक्षा कॅटरर्स यांच्या मार्फत चालू आहे परंतु त्याची मुदत दि. १५/०७/२००५ पर्यंत आहे. तसेच सदरची मुले--मुली झोपडपट्टी व आर्थिकदृष्टया कमकुवत वर्गातील आहे. त्यामुळे बालवाडयातील मुला--मुलींना सकस आहार देणे गरजेचे आहे. व त्यांना शाळेमध्ये जाण्याची गोडी निर्माण होईल व त्यांची उपस्थिती सुध्दा वाढेल.

बालवाडयामधील मुलांना आठवडयांनी सहा दिवस (रजा वगळता) मोड आलेली कडधान्य (मसाल्यामध्यें तयार केलेले) शेंगदाणे, गुळ, फुटाणे, अंडी, बिस्कीट (नाचणी युक्त व सोयायुक्त बिस्किट) केळी इत्यादी प्रकारचा आहार दयावयाचा आहे. जेणे करुन मुलांची मानसिक व शारिरीक तंदुरुस्ती वाढेल.

महिला व बालकल्याण समिती सन २००५ व २००६ या वर्षासाठी ५५ लाख ऐवढी तरतुद आहे. सकस आहार पुरवठा करण्यास अंदाजित १२ लाख एवढा खर्च अपेक्षित आहे. सकस आहार बाबत निविदा मागविण्यांत याव्यात व येणा--या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

Pmali | Shanu Gohil

सुचक :- श्री रविंद्र माळी | अनुमोदन :- सौ. शानु गोहिल

ठराव सर्वानुमते मंजूर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/०७/२००५
## (दि. २०/०६/२००५ रोजीची तहकुब सभा)

**दुःखवटा ठराव क्र. :- 22**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील कै. सुरेंद्र भंडारी यांचे निधन झाले असून तसेच भाईंदर (पूर्व) नवघर येथील कै. मोरेश्वर पाटील ह्यांच्या वहिनी कै. काशिबाई भाऊराव पाटील यांचे दि. ०५/०६/२००५ रोजी निधन झालेले आहे व भाईंदर (पश्चिम) येथील माजी नगरसेवक श्री. बाळकृष्ण तेंडुलकर यांच्या मातोश्री कै. सुमती शिवराम तेंडुलकर यांचे दि. ०५/०६/२००५ रोजी निधन झालेले आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील.** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २१/०६/२००५

**प्रकरण क्र. २० :-** **स्थायी समितीच्या दोन सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त *झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम* १९४९ मधील प्रकरण २ कलम २३ च्या तरतुदीनुसार नेमणुक करणे.**

**ठराव क्र. २३ :-** **दिनांक :- २१/०६/२००५.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ चे कलम २३ अन्वये स्थायी समिती सभासद दोन रिक्त पदांवर नेमणुक करणेसाठी निश्चित केलेल्या तारखेला व वेळेला नामनिर्देशन पत्र मागविली असता, एकुण ३ सदस्यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केली. नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत तसेच निवडणुक प्रक्रिया सुरु करण्यांच्या आधी ३ सदस्यांपैकी कोणीही नामनिर्देशन पत्र मागे न घेतल्याने निवडणुकीसाठी ३ उमेदवार आहेत.

स्थायी समिती सभासद पद दोनच रिक्त असल्याने व उमेदवार ३ असल्याने गुप्त पद्धतीने मतदान घेतले असता (१) श्री./श्रीम. अनिता ज. पाटील ह्यांना ५२ इतकी, (२) श्री./श्रीम. मिलन व. म्हात्रे ह्यांना ३६ इतकी व (३) श्री./श्रीम. रोहिदास आ. पाटील ह्यांना ४५ इतकी मते मिळाली.

वरील ३ उमेदवारांपैकी (१) श्री./श्रीम. अनिता ज. पाटील व (२) श्री./श्रीम. रोहिदास आ. पाटील. ह्यांना जास्त मते मिळाल्याने हे दोन्ही उमेदवार निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २३ मधील तरतुदीनुसार निवडून आलेल्या उमेदवारांची मुदत दि. ३१/०७/२००५ पर्यंतच राहिल.

N. B. [signature]

**पिठासिन अधिकारी / महापौर**
***मिरा भाईंदर महानगरपालिका***

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०४/०७/२००५

प्रकरण क्र. २१ :- सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल (गाडोदिया) यांचे दिनांक १६/०६/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - स्थायी समिती सभा दिनांक ०६/११/२००३ प्रकरण १५७, ठराव क्र. १३७, मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरातील इमारती, स्वतंत्र बंगले, स्वतंत्र मालकीची घरे यांना ज्यावर्षी नगरपालिका/महानगरपालिका यांनी सर्वात प्रथम कर आकारणी करुन घरपट्टी वसुल केली आहे त्यावर्षीचा निकष पकडून घरपट्टी लावणेबाबत.

सदर विषय पुढील सभेत घेण्याचे ठरले.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण सभा दि. २०/०७/२००५

**प्रकरण क्र. २२ :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी नवीन (आठ) सदस्यांची नेमणुक करणे.**

**ठराव क्र. २४ :-** **दिनांक :- २०/०७/२००५**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(३) अन्वये स्थायी समितीचे ०८ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत :-

१) श्री. मॉरस जे. रॉड्रीक्स

२) श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस

३) श्रीम. रिटा सुभाष शाह

४) श्री. अशोक बळवंत पाटील

५) श्री. अनंत रामचंद्र पाटील

६) श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस

७) श्रीम. अनिता जयवंत पाटील

८) रोहिदास आत्माराम पाटील

वरील निवृत्त होणारे सदस्यांच्या जागी नवीन आठ सदस्यांची नेमणुक करावयाची आहे. त्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम २०(५) अन्वये निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस सदस्यांची नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण १६ सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती.

नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस कोणीही सदस्यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे न घेतल्यामुळे निवडणुक लढविणारे १६ सदस्य शिल्लक राहिले. परंतु निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर (१) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी, (२) श्री. कुरेशी याकुब इस्माईल, (३) श्रीम. गोयनका सुधा लक्ष्मीकांत, (४) श्रीम. जैन गिता भरत, (५) श्री. मिलन वसंत म्हात्रे, (६) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर व (७) श्री. शहा शशिकांत रतिलाल या ०७ सदस्यांनी माघार घेतल्यामुळे ०९ उमेदवार बाकी राहीले व स्थायी समिती सदस्य पदी ०८ (आठ) सदस्यांची निवड करणे असल्याने गुप्त मतदान घेण्यांत आले. गुप्त मतदान घेतले असता खालीलप्रमाणे प्रत्येक सदस्यास मते मिळाली.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १ | अशोक बळवंत पाटील | ५० |
| २ | जयंत महादेव पाटील | ६८ |
| ३ | जैन रमेश धरमचंद्र | ७८ |
| ४ | डिसोजा ज्युडी थॉमस | ६४ |

| | | |
|---|---|---|
| ५ | तुळशीदास दत्तु म्हात्रे | ७६ |
| ६ | ध्रुवकिशोर मंन्साराम पाटील | ७४ |
| ७ | पाटील रतन कृष्णा | ७२ |
| ८ | फॅरो ग्रिटा स्टिफन | ७२ |
| ९ | शफिक अहमद खान | ७० |

वरीलपैकी ज्या उमेदवारांना जास्त मते मिळाली आहेत त्या आठ उमेदवारांची नावे अशी आहेत :-

१) जयंत महादेव पाटीळ
२) जैन रमेश धलमचंद
३) डिसोझा ज्युडी थॉमस
४) तुळशीदास द. म्हात्रे
५) ध्रुवकिशोर म. पाटील
६) पाटील रतन कृष्णा
७) फॅरो ग्रीटा स्टिफन
८) शफिक अहमद खान

**यापमाणे स्थायी समिती सदस्य पदावर ०८ (आठ) सदस्य बहुमताने निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.**

**महापौर/पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(५२)

मि. भा. म. न. पा.

महासभा दि.१६.८.२००५
(१२-८-२००५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. २४.**

**विषय :-** दि. १३.०४.२००५ व दि. ०५.०५.२००५ (दि. १३.४.२००५ रोजीची तहकुब सभा ) रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :-**२८ मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभा ज्या दि. १३.४.२००५ व दि. ०५.०५.२००५ रोजी झाल्या होत्या. त्या सभांची जी सभावृत्ते आता मा. महासभेपुढे कायम करण्यासाठी ठेवण्यात आली ~~होती~~ आहे. त्यांचे पृष्ठनिहाय वाचन झाले असून सदरच्या दोन्ही सभावृत्तांत उपस्थित सदस्यांनी सूचविलेल्या दुरुस्तीसह दि. १३.०४.२००५ व दि. ०५.०५.२००५ ह्या सभांची सभावृत्ते कायम करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक ____________ अनुमोदक ____________

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०७/२००५

**प्रकरण क्र. २३ :-** **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदरस्य पदासाठी नियुक्ती करणे.**

**ठराव क्र. २५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे (संरक्षण व जतन) (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये १२ सदस्य व ३(३) अन्वये ०३ नामनिर्देशित सदस्य खालीलप्रमाणे एकूण १५ सदस्यांची नियुक्ती ही सर्वसाधारण सभा करीत आहे.

### वृक्षप्राधिकरण समिती सदस्य

१) श्री. आयुक्त सो. - अध्यक्ष
२) श्री. महेंद्रसिंग चौहाण
३) श्री. टेरी पॉल परेरा
४) श्रीम. जेन्वी युस्टस अल्मेडा
५) श्री. ओमप्रकाश अग्रवाल
६) श्रीम. भंवरीकुवर नरावत
७) श्रीम. रक्षाबेन शहा
८) श्रीम. प्रियांका करंबळे
९) श्रीम. सुधा गोयंका
१०) श्रीम. मुक्ता रांजणकर
११) श्रीम. उमा सपार
१२) श्री. मिलन वसंत म्हात्रे

### नामनिर्देशित सदस्य

१) श्री. एडवीन घोन्सावलीस
२) श्री. दौलतसिंग भाटी
३) श्री. शरद देहरकर

वरील समितीवरील सदस्यांची मुदत एक वर्ष राहील व याबाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(५४)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/०८/२००५

(दि. १२/०८/२००५ ची तहकुब सभा)

**अभिनंदन ठराव क्र.** २६३-

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख साहेब व उपमुख्यमंत्रीजी श्री. आर. आर. पाटील साहेब यांनी जो पुढाकार घेतला आणि लेडीज डान्स बार जे बंद केले त्याच्याबद्दल आम्ही जनता दलातर्फे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. नयना म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/०८/२००५
## (दि. १२/०८/२००५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. २५ :-** **श्रीम. गिता भरत जैन ह्यांनी महिला बालकल्याण समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या एका जागेवर पोटनियम २ अन्वये एका महिला सदस्याची या रिक्त जागी ठरावाद्वारे नेमणुक करणे.**

**ठराव क्र. २७ :-**

आपल्या महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सन्मा. सदस्या सौ. गिता भरत जैन ह्यांनी समितीचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर पोटनियम २ अन्वये सन्मा. सदस्या सौ. सुनिता कैलास पाटील ह्यांची नेमणुक करण्यांत येत आहे. त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

५६

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/०८/२००५
## (दि. १२/०८/२००५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. २६ :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत.**

**ठराव क्र. २८ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १०/०८/२००५ (५८)

(दि. १२/०८/२००५ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. २७ :-** **सेवाप्रवेश नियमांना मंजुरी देणे. (मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण.)**

**ठराव क्र. २९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर यापुर्वी प्रशासकिय ठराव क्र. ७१, दि. २९/०४/२००२ ने पदनिर्मिती प्रस्तावास मंजुरी दिली असून त्यानुसार नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. MBMC/२००२/१७७३/प्र.क्र.१६३/नवि-२५, दि. ३१/१०/२००२ अन्वये वर्ग-१ ची ११, वर्ग-२ ची २९ पदे मंजुर झालेली आहेत. त्या मंजुर पदांपैकी काही तांत्रिक व ज्या पदांची शैक्षणिक पात्रता यापुर्वी शासनाकडून ठरवून दिलेली होती ती पदे आस्थापनेवर सरळसेवा व प्रतिनियुक्तीने भरण्यांत आलेली आहेत. उर्वरीत पदे **''मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)''** तयार नसल्यामुळे अद्यापपर्यंत पदे भरण्याची कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून कार्यक्षमरित्या व सचोटिने प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासुन वंचीत रहावे लागत आहे. तसेच पदोन्नती देतांना कर्मचारी थेट भरती सेवेतून आला आहे की, बढती घेऊन आला आहे याचा विचार न करता सेवाजेष्ठतेचा निकष लावावा असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलब्ध असलेल्या अधिकारी, कर्मचारी वर्गामधून वर्ग-१ ची ४ पदे व वर्ग-२ ची २३ पदे ही कर्मचाऱ्यांमधूनच भरण्यात यावीत. त्यानुसार सोबत जोडलेल्या यादीनुसार **''मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)''** तयार करुन प्रत्येक पदास संवर्ग निहाय शैक्षणिक पात्रता, अनुभव, सेवाजेष्ठता निश्चित केली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५, ४५(३), ५३(१), ४५७(३), ४६५(१)(अ) कलमानुसार **''मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)''** तयार केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचे जवळ प्रशासकीय कामकाजाचा असलेला अनुभव, प्रदिर्घ काळापासून करत असलेली सेवा, कर्मचाऱ्यांचा सेवाकाळ याचा विचार करता अशा कर्मचाऱ्यांना देखील पदोन्नती देणे आवश्यक आहे. शासनस्तरावर देखील कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता, सेवाकाळ ध्यानी घेवून (जरी पदवीधर नसला तरीही) पदोन्नती दिली जाते. तसेच पदोन्नती देतांना थेट भरतीतून बढती घेऊन आला आहे किंवा कसे याचा विचार न करता सेवाजेष्ठता व अर्हता परिक्षा प्रथम उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिशिष्ठ 'अ' व 'ब' प्रमाणे निकष लावावा. सेवाजेष्ठता यामध्ये कामगार न्यायालय व औद्योगिक न्यायालय यामध्ये कोणतेही वाद निर्माण होऊ नये. याकरिता सेवाप्रवेश मंजुर करतांना अनुभवी सेवाजेष्ठता व पात्रता कर्मचाऱ्यांचाच प्राधान्याने विचार करावा. या सर्व बाबींचा विचार करुन मा. स्थायी समिती सभा दि. २६/०७/२००५, ठराव क्र. ७१ अन्वये शिफारस करण्यांत आलेल्या **''मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)''** ह्यास सोबतच्या दुरुस्तीनुसार मान्यता देण्यांत येत आहे. कलम ४५(४) अन्वये सदरचे सेवानियम शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावे. मा. महासभेने मंजुर केलेले नियमांचे अधिन राहून सेवाजेष्ठता निकष पाहून प्रशासनाने

तात्काळ लायक उमेदवारांना पदोन्नती द्यावी व त्या पदांची नियमानुसार वेतनश्रेणी (अनुज्ञेय) तात्काळ देण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर ठरावाची त्वरील अंमलबजावणी करुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी वर्गात पदोन्नती देण्यांत यावी अशी मा. महासभा मंजुरी देत आहे.

मिरा भाईंदर शहराचा विकास झपाट्याने होत असून महानगरपालिकेचा कारभार मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे व भविष्यात देखील वाढणार आहे. प्रशासकीय कामकाज परिणामकारक होण्यासाठी सध्या असलेला कर्मचारी वर्ग अपुरा पडत आहे. प्रशासकीय काम गतिमान व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने महापालिकेसाठी अधिक अधिकारी व कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. महापालिकेचे कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने खालील पदनिर्मिती करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | वर्ग | प्रस्तावित पदे मंजुरीकरिता |
|---|---|---|---|
| १) | उपायुक्त | वर्ग-१ | ०१ |
| २) | सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी | वर्ग-२ | ०२ |
| ३) | सर्व्हेअर | वर्ग-३ | ०१ |
| ४) | उद्यान विद्या सहाय्यक | वर्ग-३ | ०१ |
| ५) | अन्न निरिक्षक | वर्ग-२ | ०१ |
| ६) | वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक | वर्ग-३ | ०१ |
| ७) | वरीष्ठ सर्व्हेअर | वर्ग-३ | ०१ |
| ८) | मुख्य सर्व्हेअर | वर्ग-२ | ०१ |
| | **एकूण** | | **०९** |

तसेच प्रशासकिय कालावधीत प्रशासकिय ठराव क्र. ७१ दि. २६/०७/२००५ ने मंजुर केलेल्या पदनिर्मिती प्रस्तावास सदर प्रस्तावात नमुद केलेल्या पदांपैकी खालील पदांची अत्यंत आवश्यकता असून ती तातडीने मंजूर करणेसाठी शासनाला विनंती करावी.

| अ.क्र. | पदाचे नांव | वर्ग | प्रस्तावित पदे मंजुरीकरिता |
|---|---|---|---|
| १) | सहाय्यक आयुक्त | वर्ग-२ | ०२ |
| २) | क्रिडा अधिकारी | वर्ग-२ | ०१ |
| ३) | हेडक्लार्क | वर्ग-२ | ०५ |
| ४) | पर्चेस ऑफीसर (पाणी पुरवठा) | वर्ग-२ | ०१ |
| ५) | सादरकर्ता अधिकारी | वर्ग-२ | ०१ |
| | **एकूण** | | **१०** |

यासाठी होणाऱ्या वित्तीय खर्चाला मंजुरी देण्यांत येत आहे.

S. Y. Gaikwad

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. सुरेखा गायकवाड.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(५८)

मि. भा. म. न. पा.

महासभा दि. १७.८.२००५ (दि. १२/०८/२००५ रोजीची तहकूब सभा)

प्रकरण क्र. २८.

विषय :- मिरा-भाईंदर शहरातील मंजूर विकास योजना अंतर्गत देण्यात येणाऱ्या झोन दाखल्यासाठी शुल्क आकारणे बाबत.

ठराव :- ३० आपल्या मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार नागरिकांना लागणारे झोन दाखले घेण्यासाठी यापूर्वी प्रति प्रकरण रू. १०००/- झोन दाखला फी घेण्यात येत होती. त्याबाबत झोन दाखला फी जास्त असल्याचे व्यक्त झाल्याने ही फी आता कमी करून प्रति प्रकरण रू. ~~२००/-~~ ५००/- ठेवण्यात यावी. त्यास हे सभागृह मंजूरी देत आहे.

Narendra 23/8/05

23/8/05

सूचक ~~तुळशीदास म्हात्रे~~ नरेन्द्र मेहता  अनुमोदक ~~[illegible]~~ जेन्वी आल्मेडा

Narendra 23/8/05

23/8/05

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २३/०८/२००५

60

**प्रकरण क्र. २९ :- प्रभाग समित्यांच्या कामकाजांचे कार्यक्षेत्र ठरविणेबाबत.**

**ठराव क्र.** :- 39

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या चारही प्रभाग समित्यांची स्थापना ~~ठराव~~ प्रकरण क्र. ५८, दि. १९/१२/२००३ ने झाली असून प्रभाग सभापतींची निवड दि. ०४/०५/२००५ रोजी झाली आहे. या दरम्यान प्रभाग समितीस सक्षमपणे व प्रभावीपणे कार्य करणेसाठी अद्यापही अधिकार प्राप्त झालेले नाहीत. तसेच महानगरपालिका अर्थसंकल्पात प्रभाग समितीस अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध नसल्याने विकास कामे करता येत नाहीत.

माजी पंतप्रधान भारतरत्न श्री. राजीवजी गांधी यांनी ७४व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार बहाल करुन स्थानिक स्तरावर नागरिकांच्या अडीअडचणी त्वरीत सोडविणे करिता अधिकारांचे विकेंद्रीकरण केले आहे. प्रभाग समित्यांना वैधानिक दर्जा प्राप्त असुन वैधानिक तरतुदीप्रमाणे व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ नुसार प्रभाग समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रांतील रुपये पाच लाख खर्चापर्यंतचे कामकाज अंदाजपत्रकीय तरतुदींच्या अधिन राहून प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेचे अधिकार आहेत.

अंदाजपत्रकातील अखर्चित रक्कम व जकात करापोटी अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा जादा वसुल होणारी रु. २० कोटीची रक्कम असे एकूण रुपये २४ कोटी प्रभाग समितीस अनुदान वाटप करणेस उपलबध होऊ शकतील. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ अन्वये अशा अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करणे व अतिरिक्त अनुदान मंजुर करणेचे व प्रभाग समित्यांना उक्त अधिनियमांतील कलम २९(८) अन्वये अधिकार प्रदान करणेचे मा. महासभेस अधिकार आहेत.

मुख्य कार्यालयावरील दिवसेंदिवस वाढत जाणारा कामांचा ताण कमी व्हावा व नागरिकांची दैनंदिन विकास कामे प्रभाग स्तरावर सक्षम व प्रभाविपणे होऊन नागरिकांची होणारी गैरसोय दूर व्हावी तसेच विकेंद्रीकरण करण्याचा हेतु खऱ्या अर्थाने फलद्रुप व सार्थक करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ अन्वये अंदाजपत्रकातील अखर्चित रक्कम व जकात करापोटी अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा जादा वसुल होणारी रु. २० कोटीची रक्कम असे एकुण रुपये २४ कोटी पैकी प्रभाग समिती क्र. १, २, ३ व ४ या चारही प्रभाग समितीस प्रत्येकी रुपये दोन कोटी प्रदान करणेस व कलम २९ अन्वये प्रभाग अंतर्गत करावयाच्या सर्व कामांना तसेच साहित्य वस्तु खरेदी करणेकामी पाच लाखापर्यंतच्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरीस व प्रभागातील नवीन कर आकारणी करणेंस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

(प्रेमनाथ पाटील)

सुचक :- ~~श्री. हॅरल्ड बोर्जीस~~

अनुमोदन :- ~~श्री. दिनेश नलावडे~~ (सूर्यकांत मोरे)

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २३/८/२००४

**प्रकरण क्र. ३० :-** **महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन साफसफाई ३ वर्षाचे कालावधीसाठी खाजगीकरणातून करुन घेणेस मंजूरी मिळणे बाबत.**

**ठराव क्र. :-** 32

मा. आयुक्त सो., यांचेकडील वरील विषयाच्या संदर्भातील टिपणीचे वाचन करण्यात आले.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र ७९ चौ. कि.मी. पसरले असून शहराची वस्ती दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिका क्षेत्राची लोकसंख्या सन २००१ चे जनगणनेनुसार ५,२०,००० इतकी आहे. या शहराचा विकास झपाट्याने होत असून लोकसंख्येमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. आजमितीस या शहराची अंदाजीत लोकसंख्या ७,५०,००० च्या आसपास आहे. शहरामध्ये मोठ्याप्रमाणात लहान मोठे औद्योगिक क्षेत्र या क्षेत्रात सतत मोठमोठ्या इमारती, गृहनिर्माण संकुलने व संस्था निर्माण होत असून भविष्यकाळात देखील शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढणार आहे. शहरामध्ये उघड्यावर मोठ्याप्रमाणावर बाजारपेठा असून, त्याच बरोबर शहरामध्ये असलेल्या मनपाच्या मंडईमध्ये देखील मोठ्याप्रमाणावर बाजार भरत असून त्यातून मोठ्या प्रमाणावर कचरा निघत आहे. मनपाकडे असलेले सफाई कामगार शहर सफाई करण्यास अपूरे पडत असल्याने मनपाने सन २००३-०४ पासून शहरातील दैनंदिन साफसफाई खाजगी ठेकेदारांमार्फत प्रभाग सफाई करून घेतली जात आहे. खाजगी ठेकेदारामार्फत शहरातील होत असलेली साफसफाई परिणामकारक होत असल्याचे दिसून येत आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या दैनंदिन निघणारा कचरा व कारखान्यातील टाकाउ माल हो देखील मोठ्याप्रमाणावर असल्याकारणाने वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत कच-याचे प्रमाण देखील वाढत आहेत व भविष्यकाळात देखील वाढणार आहे. वाढत्या वस्त्यांमधून निर्माण होणारा कचरा, शहरातील रस्त्यांची व गटारांची लांबी शहराचे वाढते क्षेत्र याचा विचार करता मनपा क्षेत्रात वाढीव कामगारांची आवश्यकता आहे.

वाढीव कामगारांची आवश्यकता विचारात घेउन प्रस्तावामध्ये प्रभाग निहाय प्रस्तावीत केलेले कामगार बरोबर आहेत. साफसफाई दैनंदिन करणे आवश्यक असल्याने वर्षाचे ३६५ दिवस प्रस्तवित केलेले कामगार उपलब्ध करणे आवश्यक आहे. मनपाकडे स्वतःचे कामगार पुरेसे उपलब्ध नसल्याने व असलेले कामगार अन्य आवश्यक ठिकाणी असल्याने खाजगी करणातून प्रभाग सफाई

करुन घेतली जात आहे. खाजगीकरणातून प्रभाग सफाई समाधानकारकरित्या होत असल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तावामध्ये प्रभाग निहाय रस्ते, गटार व वाहनावरील कामगार व वाहने प्रभाग निहाय प्रस्तावीत केली आहेत. सदरहू कामगार वर्षाचे ३६५ दिवस सफाईसाठी उपलब्ध करण्यास व येणा-या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. मनपा क्षेत्राची सर्व प्रभागातील दैनंदिन साफसफाईची कामे खाजगी करणामार्फत एक वर्षे मुदतीसाठी करून घेणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. सदरहू कामी होणारा खर्च अर्थसंकल्पीय तरतूदीतील वॉर्ड साफसफाई च्या लेखाशिर्षाखाली करून घेणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर कामी निविदा जादा दराच्या आल्यास अथवा टेंडर पुन्हा मागविण्यात आल्यास निविदा प्रक्रियेस उशिर होण्याची शक्यता आहे. सदर कामाची मुदत दि. ३१/८/२००५ रोजी संपत आहे. येत्या महिन्यामध्ये सार्वजनीक गणपती उत्सव तसेच नवरात्रौत्सव साजरा होणार आहे. सदर उत्सव मनपा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. सदर कामी साफसफाई कामाची मोठ्याप्रमाणावर गरज असते. मात्र निविदा मागविण्यात किंवा निविदा प्रक्रियेस उशिर झाल्यास सध्या चालू असलेल्या प्रभाग सफाई कामास पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मुदत वाढ देण्यात ही सभा मंजूरी देत असून सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेली तरतूद अपूरी पडल्यास या कामी येणारा वाढीव खर्च घनकचरा व्यवस्थापन या लेखाशिर्षातील तरतूदीमधून वर्ग करण्यास पुर्नविनियोजनास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- ॲड. श्री. शफीक अहमद सादत खान** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(८3)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा बुधवार दि. १७/८/२००५

23/8/2005

प्रकरण क्र. : ३१- अग्निशमन दलातील कर्मचा-यांनी सार्वजनिक व शासकीय सुट्टीच्या दिवशी काम केलेल्या कामाचा मोबदला अदा करणेबाबत.
(मा.स्थायी समिती सभेने शिफारस केलेला ठराव क्र.५८ दि.१०/६/२००५)

ठराव क्र. : 33

अग्निशमन दल हे अत्यावश्यक सेवा असून २४ तास कार्यरत राहणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे अग्निशमन दल २४ तास कार्यरत असते. परंतु सदर विभागातील कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे सार्वजनिक व शासकीय सुट्टीच्या दिवशीही कर्मचा-यांना कामकाज करावे लागते. ह्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला कर्मचा-यांना मिळत नाही. अग्निशमन दलात फक्त ११ पदे मंजूर आहेत. उर्वरीत कामगार हे सफाई कामगार व मजुर ह्या पदावर काम करीत आहेत. मुख्य कार्यालयात काम करणा-या सफाई कामगार किंवा मजुर ह्या कर्मचा-यांना सर्व शासकीय व सार्वजनिक रजा उपभोगता येतात. परंतु अग्निशमन दल अत्यावश्यक सेवा असल्याने २४ तास कार्यरत राहणेसाठी अग्निशमन दलातील कर्मचा-यांना आपले काम चोखपणे पार पाडावे ह्याकरीता प्रशासनातील अधिकारी व नगरसेवक अपेक्षा बाळगून असतात. अग्निशमन दलातील कर्मचा-यांना काम करण्यास स्फुर्ती मिळावी म्हणून आपण त्यांना शासकीय व सार्वजनिक रजेच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला दिल्यास इतर विभागातील कर्मचारी सुध्दा अग्निशमन दलात काम करण्यास पुढे येतील.

तरी अग्निशमन दलातील कर्मचा-यांनी सार्वजनिक व शासकीय सुट्टीच्या दिवशी काम केलेल्या कामाचा मोबदला म्हणून (सन १९९५ ते डिसेंबर २००३) पर्यंतची रक्कम रुपये १५,९१,२०३/- एवढी अदा करणेस व अग्निशमन दलातील शासन निर्णयानुसार देण्यांत येणारे इतर भत्ते देण्यांस ही महासभा मंजूरी देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे यापुढे अग्निशमन दलातील कर्मचारी यांनी वेळोवेळी सार्वजनिक व शासकीय दिवशी केलेल्या कामाचा अतिरीक्त मोबदला त्यांना देण्यांस ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक : (signature)

अनुमोदक : (signature)
श्री शशिकांत ज. भोईर

ठराव सर्वानुमते मंजूर

(signature)
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

32

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १०/८/२००५

ठराव क्र. :- ३४

प्रकरण क्र. :- 32 **सिल्व्हर पार्क येथे पाण्याच्या टाकीच्या आवारात नव्याने अग्निशमन स्थानक उभारणे व फायर टेंडर रेस्क्यू वाहन व इतर आवश्यक साहित्य खरेदी करणे बाबत.**

ठराव क्र. ३४ अग्निशमन दल अत्यावश्यक सेवा आहे. सदरचे दल आगीपासून व नैसर्गीक आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी २४ तास कार्यरत असते व ते सुसज्ज ठेवणे आवश्यक आहे. सध्या मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात फक्त एकच अग्निशमन स्थानक असून ते ६० फुट रोड, भाईंदर (प.) येथे आहे. स्टँडींग ॲडव्हायझरी कॉन्सिल यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक १० चौ. किमी ला १ अग्निशमन स्थानक असणे आवश्यक आहे. तथापी आपल्याकडे एकच अग्निशमन स्थानक कार्यरत आहे.

भाईंदर (पू.) कडे नव्याने अग्निशमन स्थानक उभारणेसाठी अनेक नागरीकांची व मा. नगरसेवकांची मागणी होत आहे. त्यासाठी सिल्व्हर पार्क, पाण्याची टाकी (मिरारोड) येथील जागा अग्निशमन स्थानकासाठी सर्व बाबींचा विचार केला असता सदरच्या जागी पाण्याची उपलब्धता, लोकसंख्या, रस्ता इ. सोयीस्कर आहे. सदर ठिकाणी अग्निशमन स्थानक उभारण्यासाठी २० X १५ मिटर इतकी जागा उपलब्ध असून त्या जागेवर तळमजला + २ मजले (अग्निशमन तळ + कर्मचारी निवासस्थान) बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदरच्या जागेवर अग्निशमन स्थानक उभारणे साठी पाणीपुरवठा विभागाने ना हरकत दाखला दिलेला आहे. नगररचना विभागाने सदर ठिकाणी अग्निशमन स्थानक उभारण्याकरीता हरकत नाही असे अभिप्राय दिलेले आहेत.

अग्निशमन स्थानक उभारणेसाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात 'अग्निशमन इमारत बांधकाम करणे' या शिर्षकाखाली चालू वर्षा ३०.०० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर ठिकाणी अग्निशमन स्थानक उभारण्यास पूर्णपणे येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळावी.

साधन सामुग्री व भांडारे यांची खरेदी करणेसाठी सन २००५-२००६ आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात ५०.०० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नवीन फायर फायटर खरेदी करणेसाठी अंदाजपत्रकात १०० लांखांची तरतूद करणेत आली. नियोजित ठिकाणी अद्यावत अग्निशमन स्थानक उभारणेस तसेच १ फायर फायटर, १ रेस्क्यू वाहन व इतर आवश्यक साहित्य खरेदी करणेस ही मा. महासभा मंजूरी देत आहे.

सुचक :-

अनुमोदन :- अ. जे. टावरे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०८/२००५

## (दि. १७/०८/२००५ रोजीची तहकुब सभा)

ठराव क्र. ३५ :-

प्रकरण क्र. ३३ ते ३७ हे सदरचे ज प्रस्ताव प्रशासनामार्फत रितसर गोषवाऱ्यासह विषय पत्रिकेवर घेण्यात यावे.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०८/२००५
## (दि. १७/०८/२००५ रोजीची तहकुब सभा)

**अभिनंदन ठराव क्र. ३६ व ३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाढत्या विकास कामांमध्ये आज या ठिकाणी एक नवीन उपक्रम सुरु होत आहे. सन्मा. महापौर, सन्मा. पदाधिकारी, सन्मा. नगरसेवक तसेच आदरणीय पालकमंत्री श्री. गणेश नाईक साहेब, आदरणीय आमदार श्री. मुझफ्फर हुसेनजी, आदरणीय प्रथम महापौर श्रीम. मायरा मेंन्डोंसा मॅडम तसेच आदरणीय श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा साहेब यांनी आपल्या शहरामध्ये हा उपक्रम सुरु करावा असा मनोदय व्यक्त केला होता. आज त्या मनोदयाने परिवहन समिती स्थापन होऊन लवकरच बससेवा सुरु होत आहे याबाबत ही सभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. नितीन ठाकूर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. २३/०८/२००५

**प्रकरण क्र. ३८ :-** **तज्ञ अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन परिवहन सेवेवरील भाडे आकारणी निश्चिती बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत खाजगी सहभागातून भाडेतत्त्वावरील बसेसचा वापर करुन परिवहन सेवा सुरु केली जाणार आहे. त्याकरिता परिवहन समितीने ठराव क्र. २१ दि. ०२/०८/२००५ अन्वये भाडे सारणी बाबत निर्णय घेतलेला आहे. मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या बसेसवर खालीलप्रमाणे भाडे आकारणी सारणी निश्चित करण्यांत येत आहे.

| अंतर कि.मी. | साधी सेवा | | मर्यादित सेवा | |
|---|---|---|---|---|
| | प्रौढ भाडे (रुपये) (पोषण अधिभारासहित) | सवलतीचे भाडे (रुपये) (पोषण अधिभारासहित) | प्रौढ भाडे (रुपये) | सवलतीचे भाडे (रुपये) |
| ३ | ४ | २ | ४.५ | २ |
| ५ | ४.५० | २ | ५ | ३ |
| ७ | ५ | ३ | ६ | ३ |
| १० | ७ | ३ | ८ | ४ |
| १५ | ९ | ४ | १० | ५ |
| २० | ११ | ५ | १२ | ६ |
| २५ | १३ | ६ | १५ | ७ |
| ३० | १४ | ७ | १६ | ८ |
| ३५ | १५ | ७ (कमाल) | १८ | ९ (कमाल) |
| | ३५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरासाठी प्रत्येक अतिरिक्त ५ कि.मी. किंवा त्याच्या अंशभागाकरिता २०० पैसे जादा. | | ३५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरासाठी प्रत्येक अतिरिक्त ५ कि.मी. किंवा त्याच्या अंशभागाकरिता २०० पैसे जादा. | |

१) भाडे आकारणी गर्व्हनमेन्ट नोटीफिकेशन, गृह विभाग, संदर्भ क्र. एमव्हीए-०६९२/१८३१/ सी.आर.५७/टीआरए-२, दि. १४ जुलै १९९४ च्या परिपत्रकाला अधिन राहून तयार करण्यांत आलेले आहे.

सदर परिपत्रा अन्वये प्रवाशांची गाडीत चढण्याची जागा / बस थांबा किंवा उतरण्याची जागा ही प्रादेशिक परिवहन प्राधिकरण ह्यांनी भाडे टप्पा म्हणून मान्यता दिल्याप्रमाणे सदर प्रवासाचे अंतर भाडे आकारणेकरिता तत्पुर्वीच्या भाडे टप्प्यापासून किंवा तद्‌नंतरच्या भाडे टप्प्यापर्यंत संमत करण्यांत आलेले आहे. याचाच अर्थ उपक्रमाच्या बसगाड्यांवरील प्रवासभाडे एका थांब्यापासून दुसऱ्या थांब्यापर्यंतच्या अंतरासाठी न आकारता एका भाडे टप्प्यापासून दुसऱ्या भाडेटप्प्यापर्यंतच्या अंतराच्या आधारे आकारण्यांत येईल.

२) महाराष्ट्र शासनाकडून आकारण्यांत येणारा पोषण अधिभार रु. २/- किंमतीच्या तिकिटापर्यंत १० पैसे व रु. २/- पेक्षा अधिक किंमतींच्या तिकिटावर १५ पैसे यात समाविष्ट आहे.

३) १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना बसभाडे तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे सवलतीचे भाडे आकारण्यांत येईल.

४) प्रौढ भाडे देणाऱ्या प्रवाशाला ३ वर्षे वयाखालील एक मूल आसनावर न बसविता विना-आकार स्वतःबरोबर नेता येईल.

५) अंधांसाठी असलेल्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेच्या संपूर्णतः अंध असल्यासंबंधिच्या प्रमाणपत्र धारक अंध व्यक्तींना सवलतीचे भाडे आकारण्यांत येईल.

६) इयत्ता १० पर्यंत शिकणाऱ्या व १८ वर्षे वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांना बसभाड्यात सवलत देण्यांत येईल. ही सवलत घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी व परत येण्यासाठीच्या प्रवासापुरतीच उपलब्ध असेल.

७) ६० टक्के किंवा अधिक कायम विकलांगता असलेल्या मान्यताप्राप्त संस्थेच्या प्रमाणपत्रधारक अस्थिव्यंग अपंगांना सवलतीचे बसभाडे आकारण्यांत येईल.

८) मान्यताप्राप्त संस्थेच्या प्रमाणपत्रधारक जेष्ठ नागरिकांना (Senior Citizen) सवलतीचे बसभाडे आकारण्यांत येईल.

९) **सामान (लगेज) :**

(अ) हातात धरण्यासारख्या (४० X २५ X १५ से.मी. पर्यंतच्या आकाराच्या) सामानाखेरीज अन्य आकाराचे अथवा प्रकारचे सामान की, ज्यामुळे इतर प्रवाशांना अडचण, उपद्रव किंवा गैरसोय होण्याची शक्यता आहे, अशा प्रकारचे सामान उपक्रमाच्या कोणत्याही वाहनामध्ये कोणाही व्यक्तीने आणू नये.

या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या कोणाही व्यक्तीने, वाहकाने विनंती केल्यास वाहन सोडले पाहिजे. आणि कोणत्याही व्यक्तीने अशा प्रकारची विनंती तात्काळ मान्य न केल्यास, त्यास वाहक अथवा चालकाकडून बसगाडीभाडे बळजबरीने वसुल करण्यांत येईल आणि त्या व्यक्तीवर कायदेशिर कारवाई करण्यांत येईल.

(ब) प्रवाशांना स्वतःच्या जबाबदारीवर पुढील आकारमानाचे केवळ व्यक्तिगत सामान बस गाडीत जागा उपलब्ध असेल तरच योग्य ते भाडे देऊन वाहून नेता येईल.

कमाल आकार : ६० X ५७ X ३७ से.मी.

सामानावर आकारण्यांत येणारे भाडे (लगेज) तद्नुरुप प्रौढ भाड्याशी तुल्य (सममूल्य) असेल, मात्र किमान भाडे रु. ४/- व कमाल भाडे रु. १५/- असेल.

तरी वरील प्रमाणे परिवहन सेवेवरील भाडे आकारणी (सारणी) निश्चितीबाबत मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. नितीन ठाकुर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(६८)

## मा. महासभा दि. २३/०८/२००५

**प्रकरण क्र. ३९ :-** **परिवहन विभागाकरिता कर्मचारी पद मंजूरीचा प्रस्ताव पाठविणे.**

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम नव्याने सुरु झालेली असून तिचे प्रत्यक्ष कामकाज सुरु झालेले आहे. सदर उपक्रमाचे कामकाज व्यवस्थित व तिच्या कामकाजात गति येण्यासाठी खालीलप्रमाणे अधिकारी, कर्मचारी ह्यांचा पदनिर्मिती प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | वाहतूक अधिकारी | ०१ | ५०००-१५०-८००० |
| २ | सहाय्यक वाहतुक अधिकारी | ३ | ४०००-१००-६००० |
| ३ | मुख्य लेखाधिकारी | ०१ | ५५००-१७५-९००० |
| ४ | तिकिट व रोख सहाय्यक | ०१ | ५०००-१५०-८००० |
| ५ | वाहतुक निरिक्षक | ०८ | ४०००-१००-६००० |
| ६ | प्रवर्तक (कंट्रोलर) | ०६ | ४०००-१००-६००० |
| ७ | कनिष्ठ लिपिक | ७ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ८ | वाहक | १५० | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९ | वाहन चालक | ३ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १० | शिपाई | ०३ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ११ | स्वच्छता कामगार | ०२ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |

शासनाच्या धोरणाप्रमाणे संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. असे ज्ञान अप्राप्त असल्यास रुजू झाल्यापासून ६ महिन्याच्या आत ते प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहिल.

सदर उपक्रमाचे कामकाज चालविण्याकरिता अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण १८५ पदांची परिवहन सेवेकामी पदनिर्मिती करण्यांत येत आहे. सदर पदे ही परिवहन उपक्रम कार्यरत असेपर्यंत अस्तित्वात राहतील.

वरिल पदांना मंजुरी देणेकामी व शासन मंजुरीकरिता मान्यतेसाठी पाठविणेस आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक : श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.** **अनुमोदन : श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका



## मा. महासभा दि. २३/०८/२००५

**प्रकरण क्र. ३९ :-** **परिवहन विभागाकरिता कर्मचारी पद मंजूरीचा प्रस्ताव पाठविणे.**

**ठराव क्र.३९ अ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम नव्याने सुरु झालेली असून तिचे प्रत्यक्ष कामकाज सुरु झालेले आहे. सदर उपक्रमाचे कामकाज व्यवस्थित व तिच्या कामकाजात गति येण्यासाठी खालीलप्रमाणे सेवानियम तयार करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदनाम व वेतन श्रेणी | पद संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| १ | वाहतूक अधिकारी<br>५०००-१५०-८००० | ०१ | १) मान्यता प्राप्त विदयापिठाचा पदवीधर<br>२) सहाय्यक वाहतूक अधिक्षक व तत्सम पदावरील सार्वजनिक सेवेतील ७ वर्षांचा अनूभव असल्यास प्राधान्य<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| २ | सहाय्यक वाहतुक अधिकारी<br>४०००-१००-६००० | ३ | १) मान्यता प्राप्त विदयापिठाचा पदवीधर<br>२) सहाय्यक वाहतूक निरिक्षक व तत्सम पदावरील सार्वजनिक सेवेतील अनूभव असल्यास प्राधान्य<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| ३ | मुख्य लेखाधिकारी<br>५५००-१७५-९००० | ०१ | १) वाणीज्य शाखे मधील पदवी धारक<br>२) शासकिय खात्यातील किंवा खाजगी संस्थेतील ५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधाण्य<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| ४ | तिकिट व रोख सहाय्यक<br>५०००-१५०-८००० | ०१ | १) मान्यता प्राप्त विदयापिठाचा पदविधर वाणिज्य शाखेतील पदवीधारक प्राधाण्य<br>२) सहाय्यक तिकिट व रोख अधिक्षक वा तत्सम पदावरील सार्वजनिक सेवेतील ५ वर्षांचा अनूभव असल्यास प्राधान्य<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| ५ | वाहतुक निरिक्षक<br>४०००-१००-६००० | ०८ | १) मान्यवर विदयापिठाचा पदवीधर<br>२) मार्ग परिवहन संस्थेतील सहाय्यक वाहतूक निरिक्षक या पदावरील अनूभव असल्यास प्राधान्य<br>३) मुंबई मोटार वाहन अधिनियम १९३९ मधील तरतुदीची माहिती असल्यास प्राध्यान्य |

| अ.क्र. | पदनाम व वेतन श्रेणी | पद संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| | | | ४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>५) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| ६ | प्रवर्तक (कंट्रोलर)<br>४०००-१००-६००० | ०६ | १) मान्यता प्राप्त विद्यापिठाचा पदवीधर<br>२) वाहन व्यवस्था व वेळापत्रक या संबंधीची माहिती असल्यास प्राधान्य.<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागसवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक. |
| ७ | कनिष्ठ लिपिक<br>३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ७ | १) किमान एच. एस. सी. उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता असल्यास त्यास प्राधान्य.<br>२) शासकिय/ निमशासकिय अथवा सार्वजनिक संस्थेचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>३) टंकलेखन व संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम) |
| ८ | वाहक<br>३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १५० | १) १० वी पास<br>२) वाहकाचा नुतनीकरण केलेल्या आर.टी.ओ. परवाना व बॅज आवश्यक<br>३) उंची १५४ से.मी. ते १८० से. मी.<br>४) वय २१ ते ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>५) संगणकाचे ज्ञान अवगत असणाऱ्यास प्राधान्य. |
| ९ | वाहन चालक<br>३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३ | १) १० पास.<br>२) नुतनीकरण केलेला हलकी / जड वाहन चालविण्याचा आर.टी.ओ. परवाना आवश्यक. वाहन चालविण्याचा अनुभव.<br>३) उंची १५८ से.मी. ते १८० से.मी.<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागसवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम) |
| १० | शिपाई<br>२५५०-५५-२६६०-६०-३२०० | ०३ | १) ७ वी पास<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>३) शारिरिक दृष्ट्या सृदृढ<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम) |
| ११ | स्वच्छता कामगार<br>२५५०-५५-२६६०-६०-३२०० | ०२ | १) ५ वी पास<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>३) शारिरिक दृष्ट्या सृदृढ<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम) |

शासनाच्या धोरणाप्रमाणे संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. असे ज्ञान अप्राप्त असल्यास रुजू झाल्यापासून ६ महिन्याच्या आत ते प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहिल.

सदर उपक्रमाचे कामकाज चालविण्याकरिता अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण १८५ पदांची परिवहन सेवेकामी पदनिर्मिती करण्यांत येत आहे. सदर पदे ही परिवहन उपक्रम कार्यरत असेपर्यंत अस्तित्वात राहतील.

वरिल पदांना मंजुरी देणेकामी व शासन मंजुरीकरिता मान्यतेसाठी पाठविणेस आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक : श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.** **अनुमोदन : श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

अभिनंदन ! अभिनंदन !

ठराव क्र. ४०

दिनांक **17/9/2005** रोजी मिरा भाईन्दर महापालिका हद्दीतील गणेश विसर्जन घाटावर गणपती विसर्जन सुरळीत व शांततेत पार पडले त्यात विशेष म्हणजे जेसलपार्क चौपाटीवरील गणपती विसर्जन हे मुंबईतीलच नाही तर अनेक महापालिका हद्दीत असणा-या सुविधां व व्यवस्थेपेक्षा वेगळी व्यवस्था करून शांततेत पार पडले याबाबत महापालिका हद्दीतील नागरिकांना अभिमान आहे.

महापालिकेच्या वतीने समुद्रात केलेली दिवाबत्तीची सोय,धक्क्यावर केलेली दिवाबत्तीची सोय, धक्कयावर ठेवलेल्या **10** बोटी,धक्कयाचे रूंदीकरण,चौपाटीची प्रशस्त मोकळी जागा,मंडप डेकोरेटर्स तर्फे करण्यात आलेली रेलिंग व बॅरकेट,अग्निशामक दलाची मेहनत,तसेच शंकर नारायण महाविद्यालयातील व अभिनव विद्या मंदीरातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग,विविध सामाजिक संस्थाचा उत्स्फुर्त सहभाग,त्यांच्यातर्फे करण्यात आलेली खाण्याची व पाण्याची सोय,सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सुप्रिम कोर्टाच्या आदेशाचे केलेले पालन, पोलिसांचे जातीने सहकार्य , डी.आय.जी.,एस.पी व डी.वाय.एस.पी. यांची उपस्थिती,त्याचबरोबर महापालिकेचे आयुक्त व सर्व अधिकारी यांची जातीने उपस्थिती,महापौर तसेच पदाधिकारी व नगरसेवक यांची उपस्थिती यामुळे मिरा भाईन्दर महापालिकेतील गणेश विसर्जनाचा दैदिप्यमान सोहळां कोणताही कायदा व सुव्यवस्था न बिघडता शांततेत पार पडला यावेळी चौपाटीवर काही त्रुटी दिसून आल्या त्याबाबत प्रशासन पुढील गणेश विसर्जना पूर्वी सुधारणां करेल अशी आशा व्यक्त करून ही महासभा महापालिका आयुक्तांचे व महापौरांचे अभिनंदन करत आहे असा ठराव आम्ही मांडत आहोत.

सूचक :– श्री. रोहिदास पाटील

अनुमोदक :– श्री. मदन सिंह

प्रकरण क्र. १० मागील सभावृत्तांताचे वाचन करून ते वृत्तांत कायम करणे

ठराव क्र. १०अ

आपल्या मनपा च्या मागील २ सभांचे म्हणजे दि २१/९/२००५ व दि २०/७/२००५ चे जे दोन सभावृत्तांत आता वाचण्यात आले त्यांत उपस्थित सभासदांनी सूचविलेल्या दुरुस्त्यासह हे वृत्तांत कायम करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक - (स्वाक्षरी) श्री. हॅरल्ड बोर्जीस

अनुमोदक - (स्वाक्षरी) श्री. प्रेमनाथ पाटील

(स्वाक्षरी)

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००५

**प्रकरण क्र. ४१ :-** **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करण्याबाबत.**

**ठराव क्र. ४१ :-**

आपल्या महानगरपलिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर महापालिका पातळीवर (१) स्थायी समिती व (२) महिला व बालकल्याण समिती व परिवहन समिती ह्या तीन समित्या कार्यरत होत्या / आहेत. तथापी महापालिकेच्या कामाचे स्वरुप पाहाता जशा इतर महापलिकामध्ये अनेक प्रकारच्या समित्या कार्यरत आहेत. तशाच प्रकारच्या समित्या आपल्याही महानगरपलिकेत असाव्यात अशी ह्या सभागृहाची भावना व धारणा आहे. म्हणून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये पुढील प्रमाणे समित्या स्थापन करण्यांत याव्यात. अशा प्रत्येक समितीची सदस्य संख्या १३ असावी. समितीस १ सभापती व उपसभापती असावा. त्यांची निवड साध्या मतदानाने करण्यात यावी. हल्ली आपल्या मनपाच्या उपविधी मंजूरीचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे सदर समित्या त्याच उपविधीत अंतर्भूत कराव्यात व सदर प्रस्तावाचे जोडपत्र तयार करुन शासन मंजूरीसाठी तातडीने पाठविण्यात यावे. सदर समित्यांचे कार्यक्षेप व अधिकार पुढील प्रमाणे असावेत.

| अ.क्र. | ज्या विशेष समितीला अधिकार दिलेले आहेत ती समिती | कार्यक्षेत्र | कलम | अधिकार किंवा काम | अधिकारदानाच्या मर्यादे बाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक समिती | स्टेडीयम मैदाने इ. बाबतचे सर्व प्रश्न.<br>१. भारतीय व पदरेशी खेळांचा प्रसार व प्रचार<br>२. भारतीय व परदेशी खेळांच्या स्पर्धांचे आयोजन<br>३. क्रिडामंडळे व सामाजिक सांस्कृतिक संस्था क्रिडा स्पर्धाचे संयोजन यासाठी संस्थांना द्यावयाच्या अनुदानाबाबत स्थायी समितीस शिफारस<br>४. व्यायामशाळा, क्रिडांगणे व स्टेडीयम यांची देखभाल व व्यवस्थापन, माध्यमिक व तांत्रिक शाळेसंबंधी सर्व प्रश्न<br>भारतीय व परेदशी खेळांना या तत्संबंधीच्या इतर कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासंबंधीचे सर्व प्रश्न व सर्व राष्ट्रीय सण, उत्सव साजरे करणे, समाजकल्याण आणि सांस्कृतिक व करमणुकीचे कार्यक्रमासंबंधीचे सर्व प्रश्न<br>५. सार्वजनिक गणपती उत्सव, नवरात्रौ व सर्व धर्मियांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी महापलिका प्रशासन व आयोजकात समन्वय साधने व त्यांना मदत करणे. | ६६ | महापालिकेच्या स्वेच्छा निर्णयानुसार तरतदु करता येईल अशा बाबी. | रु. ३.०० लाखापर्यंत |
| २. | माध्यमिक व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती | १) प्रशासनाने नेमलेल्या अधिकारांमार्फत प्रशासकीय प्रस्ताव करुन माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे, पालकांचे प्रश्न वगैरे बाबत. | | | रु. ३.०० लाखापर्यंत |
| ३. | आरोग्य परिरक्षण | | | आरोग्य विषसंबंधित बाबी, दवाखाने, प्रस्तावित प्रसुतीगृहे निगडीत असलेल्या बाबी. | रु. ३.०० लाखापर्यंत |
| ४. | गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती | गलिच्छ वस्ती सुधारण निर्मुलन घरबांधणी व समाजकल्याण संबंधीचे सर्व प्रश्न तसेच मागासवर्गीय सुधारणा संबंधीचे सर्व प्रश्न | २०८ (१) | काही विशिष्ट प्रकारच्या रहदारी करीता सार्व. पथाच्या वापराला बंदी करण्याकरिता मान्यता देण्याचा अधिकार | रु. ३.०० लाखापर्यंत |

| अ.क्र. | ज्या विशेष समितीला अधिकार दिलेले आहेत ती समिती | कार्यक्षेत्र | कलम | अधिकार किंवा काम | अधिकारदानाच्या मर्यादे बाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | २०९ (१) | पथाच्या प्रमाणित रेषेच्या बाहेरील जागा संपादन करण्यांत मान्यता देण्याचा अधिकार | |
| | | | २७० (१) | महापालिका आयुक्त यांनी काढलेल्या अधिसूचनेला (नोटिफिकेशन पसंती देण्याचा अधिकार) | |
| | | | २७० (३) | सुधारणा योजनेत (इम्युव्हमेंट स्कीम समाविष्ट झालेल्या आणि त्या बाहेरील क्षेत्रातील मोजणी महापालिका आयुक्त यांनी करावी अशी पसंती देण्याचा अधिकार | |
| | | | २७८(२) | सुधारणा योजनेत फेर करण्याचा अधिकार | |
| | | | ६६ | या कलमान्वये महापालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतूद करता येईल अशा बाबी (या समितीच्या संबंधित बाबी) | |

सोबत प्रमाणे वरील सर्व समित्या गठीत करण्यात ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सभापतीं करिता दालने तयार करणे कामी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सूचक :- श्री. आसिफ गुलाब शेख.** **अनुमोदन :- श्री. मिलन गोविंदराव पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मा. महासभा दि. २०/९/२००५

**प्रकरण क्रंमांक :- ४२** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा इमारती, समाजमंदीर सुट्टीच्या वेळेत भाडयाने देणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्रं. :-** ४२.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी शाळा इमारती, समाजमंदीरे, बालवाडया, व्यायाम शाळा, वाचनालय, मैदाने आहेत. सदर मालमत्ता विविध कार्यक्रमाकरीता खाजगी संस्था/ नागरीकांकडून भाडयाने वापरण्याकरीता मागणी करण्यात करण्यात येतात. मा. स्थायी समिती सभा दि. ८/११/२००४ ठराव क्रं. ११७ नुसार सदर मालमत्ता भाडयाने देणबाबत दर ठरविण्यात आलेले आहेत, तसेच स्थायी समिती सभा दि. ३०/७/०५ ठराव क्रं. ९३ व स्थायी समिती सभा दि. ३१/८/०५ ठराव क्रं. ११५ अन्वये खालील मालमत्ता भाडयाने देणेबाबत महासभेपुढे शिफारस केलेली आहे.

| अं.क्रं. | ठिकाण | भाडयाने घेणा-या संस्थेचे नाव | भाडे | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १) | नवघर प्राथमिक शाळेतील वर्ग | सिनियर सिटीझन | रु. १/-प्रतिमहिना | ३ वर्ष |
| २) | मिरा रोड व्यायाम शाळा | शिवसमर्थ क्रीडा मंडळ | रु. १/-प्रतिमहिना | ३ वर्ष |
| ३) | घोडबंदर जुनी शाळा इमारती मधील दोन वर्ग | शिक्षण उत्तेजक मंडळ | रु. २५१/- प्रतिमहिना/ वर्ग | ३ वर्ष |
| ४) | भाईंदर (प.) शाळा क्रं. १६,१७,१८ मधील दोन वर्ग व हॉल | भाईंदर सेकंडरी शाळा | रु. २५१/- प्रति वर्ष / फक्त दोन तासाकरीता | ३ वर्ष |

वरील दरानूसार करारनामा करुन ३ वर्षाकरीता भाडयाने मालमत्ता देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर मालमंत्ताची देखभाल, दुरुस्ती संस्थेने स्वखर्चाने करावी. तसेच विदयुत बिल, पाणी बिल सुध्दा संस्थेकडून घेण्यात यावे. इतर संस्थामार्फत मालमत्ता भाडयाने मागणीबाबत अर्ज आल्यास मा. स्थायी समितीने ठरविलेल्या दरानूसार व मुदतीनूसार करारनामे करुन भाडयाने देण्यात यावेत. तसेच मुदत संपल्यावर सुध्दा आवश्यक असल्यास मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढी देण्यात याव्यात.

**सुचक :-** श्री. मिलन पाटील

**अनुमोदक :-** सौ. अनिता पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**पिठासन अधिकारी**

आमसभा दि. २०.०९.२००५



प्रकरण क्र. ४३

विषय :- सुभाष चंद्र बोस मैदाना समोरील रोड मधील विस्थापितांना वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेत समाविष्ट करणे बाबत.

ठराव :-४३ आपल्या महापालिका हद्दीत सुभाषचंद्र बोस मैदाना जवळचा परिसर विकसीत करते वेळी त्या ठिकाणच्या एकूण ४१६ झोपडया हटविण्यात आल्या होत्या व संबधितांचे अन्यंत्र योग्य / सरकारी जमिनीवर पुनर्वसन करावयाचे महापालिकेने तत्वतः मान्य केले होते. त्याप्रमाणे अशा पुनर्वसनासाठी स. नं. २३३ (भाईंदर पूर्व) मधील जागा महापालिकेने मा. जिल्हाधिकाऱ्याकडे मागितली आहे. अशाप्रकारे झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करावयाचे आहे. त्याकामी जागा ताब्यात मिळताच महापालिकेने आपल्या स्वनिधीतून / किंवा दुर्बळ घटकांच्या माहे डिसेंबर २००५ अखेरच्या अखर्चित निधीतून वरील पुनर्वसन कामासाठी खर्च करावा व याकामी मिळणारे अनुदानातून / व स्वतः प्रकल्पग्रस्थाच्या वर्गणीतून ही कामे करून घ्यावीत त्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक - श्री. महेंद्र सिंह चौहान

अनुमोदक - श्री. ध्रुवकिशोर पाटील

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.२०/०९/२००५

**विषय क्र. ४४**

ठराव क्र. ४४

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि.१४/०५/९७ रोजी भागशः व दि.२५/०८/२००० रोजी पुर्णता शासनाने मंजूर केलेली आहे.

मौजे - भाईंदर येथील मांडली तलाव (क्षेत्र ३७६९ चौ.मी.) ही जागा नगरपरिषद स्थापन झाल्यापासून नगरपरिषदेच्या ताब्यात असून तेथे नगर भवनाची इमारत बांधण्यात आलेली आहे. सदर जागा मंजूर विकास योजनेमध्ये सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविण्यात आलेली असून भविष्यात त्या ठिकाणी करावयाच्या सार्वजनिक कामासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार विकास योजनेत सदर फेरबदल दर्शवून जागा आरक्षित दर्शवून जागेचे नामाभिदान 'नगर भवन' असे करण्यास ही सभा मंजूरी देणेत येत आहे.

सुचक
श्री. प्रेमनाथ पाटील

अनुमोदक
श्री. ध्रुवकिशोर पाटील

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

(७)

## मा. महासभा दि. २०/०९/२००५

## ।। ठराव ।।

**प्रकरण क्र. ४५ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील ५० दलली पाणी पुरवठा योजनेतील प्रलंबित कामे निधी उपलब्ध करुन पुर्ण करुन घेणेबाबत**

ठराव क्र. ४५ .

मिरा-भाईंदर शहरासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अतिरीक्त ५० दलली पाणी पुरवठा योजना राबविणेत येत असून सदर योजनेला शासनाने क्र. पापुयो/१०९८/प्र. क्र. ०३/पापु-१८/दि. ३१/०३/१९९७ रोजी रु. ११०६४.४० लक्ष ठोक रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे. मंजूर योजनेचा वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| मंजूर आकृतीबंध | मंजूर निधी | प्राप्तनिधी | शेरा |
|---|---|---|---|
| शासकीय अनुदान | रु. ४७.८३ कोटी (४३.२३%) | रु. ४५.९६ कोटी | मंजूर झालेल्या कर्जापैकी शासकीय अनुदानापोटी रुपये २.१४ कोटी व **MMRDA** कडून रु. ९.३० कोटी कर्जनिधी येणे बाकी आहे. |
| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या वित्तिय संस्थेमार्फत उभारावयाचे कर्ज | रु. ६२.८१ कोटी (५६.७७%) | रु. ५३.५१ कोटी | |
| **एकूण रु.** | **रु. ११०.६४ कोटी** | **रु. ९९.२० कोटी** | |

सदर योजनेसाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाकडून आतापर्यंत रु. ५३.५१ कोटी कर्जरुपाने निधी प्राप्त झाला असून कामाच्या प्रगतीनुसार अजुन अनुज्ञेय शासकीय अनुदान प्राप्त झाले असून कामाच्या प्रगतीनूसार मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून रु. २.८० कोटी एवढा कर्ज निधी तातडीने मिळणे आवश्यक असताना मार्च २००२ पासून निधी प्राप्त झाला नसल्याने ५० दलली पाणी पुरवठा योजनेतील उपांगाची कामे सद्यस्थितीत बंद आहेत. याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेबरोबर वेळोवेळी बैठका झाल्या असून त्यांनी उपस्थित केलेल्या शे-यांची पुर्तता वेळोवेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करणेत आली आहे, तरी देखील निधी प्राप्त न झाल्याने अतिरिक्त ५० दलली पाणी पुरवठा योजनेच्या प्रगतीवर परिणाम झाला आहे. शहराची वाढती पाण्याची गरज, पाणीपुरवठा योजनेची सक्षमता, पाणी साठवण क्षमता व वितरण व्यवस्था या बाबी विचारात घेतल्या तर बंद असलेली उपांगे तातडीने पुर्ण होऊन

कार्यान्वित होणे अत्यंत आवश्यक आहे. वारंवार पाठपुरावा करुनही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कर्जनिधी प्राप्त होत नसल्याने योजना बंद ठेवणे संयुक्तिक नसून शहरवासियांना पाणी पुरवठ्यासाठी अत्यावश्यक सेवा उपलब्ध करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला योजना पुर्ण करणेसाठी उर्वरीत आवश्यक निधी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कळविल्यानुसार झालेल्या कामाची प्रलंबित देयके अदा करणे आवश्यक आहे. करीता सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात तरतूद केलेली नसल्याने पुनर्विलोकन करुन अथवा राखीव निधीतून अथवा अन्य उपलब्ध तरतूदीतून रु. २.८० कोटी निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यास व कामाच्या प्रगतीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उर्वरीत योजना पुर्ण करुन कार्यान्वित करणेसाठी अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करुन निधी अदा करणेस ही महासभा मंजूरी देत आहे.

सुचक श्री. हॅरल कोर्जीस ,                                   अनुमोदक श्री. आसिफ शेख.

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(2)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००५

प्रकरण क्र. ४६ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्राकरिता कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४९ :-**

आपल्या महापालिकेची वैद्यकिय सेवेतंर्गत जी एकूण ०८ आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत त्यांचा फायदा शहरातील गरीब व मध्यमवर्गीय माणसांना चांगला होत आला असून सदरची केंद्रे पूर्ववत चालू ठेवावीत अशी ह्या सभागृहाची भावना आहे. तथापी सदर केंद्रावरील सर्व डॉक्टर्स, परिचारीका, फार्मासिस्ट, प्रसाविका ह्यांच्या ठेकेदारावरील कामाच्या मुदती संपत असल्याने टिपणीत दर्शविलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या पुढील ५ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यांत यावी.

(ब) तसेच संबंधित कर्मचारी वर्गास खालीलप्रमाणे वेतन अदा करणेंत यावे.

| | | |
|---|---|---|
| १) | वैद्यकिय अधिकारी | रु. १०,०००/- |
| २) | परिचारिका (एन.एम.) | रु. ४,५००/- |
| ३) | फार्मासिस्ट कम लिपीक | रु. ३,५००/- |
| ४) | प्रसाविका (ए.एन.एम.) | रु. ३,०००/- |

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(८९)

# मा. महासभा दि. २०/९/२००५

**प्रकरण क्रंमांक :- ४७** महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर स्वागत कमानी उभारणे बाबत विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्रंमाक :-** ४७.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे ७९०४० चौ. कि.मी एवढे असुन शहर उत्तन ते काजूपाडा व दहिसर चेकनाका ते वर्सोवा ब्रीज असे पसरलेले आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रं. ८ वर दहिसर चेकनाका ते वर्सोवा ब्रीज तसेच ठाणे-घोडबंदर रस्त्यावर काजूपाडा इथून प्रवेश होतो. महाराष्ट्रातील इतर महापालिकेत अशा प्रकारे प्रवेशद्वारावर स्वागत कमानी उभारल्या आहेत. अशा कमानी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर उभारल्यास महापालिकेच्या शोभेत भर पडणार आहे. प्रशासनाने स्वागत कमानी बांधण्यास सक्षम विभागाच्या परवानग्या घेण्यात याव्यात. तसेच अर्थसंकल्पात या करीता पुरेशी तरतुद करण्यात यावी. प्रस्तावित तीन ठिकाणी स्वागत कमानी उभारण्यास तांत्रीक सल्लागाराची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत नकाशे, डीझाईन व अंदाजपत्रक तयार करून घेण्यास येणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :-** श्री. मिलन पाटील

**अनुमोदक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**पिठासन अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०९/२००५

**प्रकरण क्र. ४८ :-** **सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंह चौहान यांचे दिनांक १३/०९/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.**
**मिरा भाईंदर परिसरातील तळमजला व चाळींमध्ये राहणाऱ्यांच्या घरामध्ये २६ व २७ तारखेस अतिवृष्टीचे पाणी घुसल्याने झालेल्या नुकसानापोटी १ वर्षाचा घरपट्टी कर माफ करणेबाबत.**

**ठराव क्र. ४८ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(८६)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००५

अभिनंदन ठराव क्र. ४९ :-

काँग्रेस जिल्हा अध्यक्ष श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे यांची स्थायी समिती सभापती पदी निवड झाल्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करत आहे.

सुचक :- श्रीम. मुक्ता रांजणकर. अनुमोदन :- श्री. मोहन पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००५

अभिनंदन ठराव क्र. ५० :-

सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जिस यांची सभागृह नेते या पदावर नियुक्ती झालेली आहे. तत्पुर्वी सन्मा. सभागृह नेते. लिओ कोलासोजी ह्यांनी आपल्या ह्या सभागृहामध्ये ज्या पद्धतीने सभा कामकाजामध्ये सहभागी होऊन सर्व पक्षाच्या नगरसेवकांना त्यांचे प्रस्ताव व प्रस्तावाचे सुचना या चर्चेस सहभागी होऊन जो सलोखा सभागृहाचा त्यांनी राखला आणि सभागृहामध्ये चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन आणि सभा कामकाजामध्ये जी सभा घेतात त्याबद्दल मी माझ्या पक्षाच्या वतीने सभागृह नेते लिओ कोलासोजी यांचे ह्या ठिकाणी हार्दिक आभार व्यक्त करतो. त्याचप्रमाणे नव निर्वाचित सभागृह नेते हॅरल बोर्जिसजी हे ह्या सदनापुढे सभागृहामध्ये सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचना आणि सर्वांना एकत्र घेऊन कामकाजात सहभाग घेतील आणि एक चांगला सभागृह नेता या नात्याने एक चांगले नांव राखुन ठेवतील अशी आशा मी व्यक्त करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो आणि हॅरल बोर्जिस यांचे सभागृह नेता झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदनाचा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

त्याचप्रमाणे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे हंसुकुमार पांडे यांची गटनेते पदी निवड झाल्यामुळे त्यांचा मी अभिनंदन ठराव मांडत आहे.

| ~~15~~ | ~~गावंड आत्माराम बाळाराम~~ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 16 | सुर्यकांत अनंतराव भोईर | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 17 | रविंद्र भिमदेव माळी | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 18 | केशव रामभाऊ घरत | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| ~~19~~ | ~~परशुराम पद्माकर म्हात्रे~~ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 20 | अनिता जयवंत पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 21 | सौ. उर्मिला कोमल भामरे | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 22 | निर्मला बाबुराव सावळे | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 23 | जिवी हिरा वाडे | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 24 | भोईर जयाबाई यशवंत | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 25 | ज्योत्स्ना जालींदर हसनाळे उर्फ पुजा प्रताप शिंदे | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 26 | पाटील मिलन गोविंदराव | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 27 | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 28 | ठाकूर नितीन गोपीनाथ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 29 | पाटील चिंतामण कमलाकर | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |
| 30 | गावंड हरेश लक्ष्मण | राष्ट्रवादी कॉंग्रेस | | | |

२५ + ०५ / ३० विरोधात   ५५ बाजूने   तटस्थ.

मा. महासभा दि.    /   /

प्रकरण क्र.    करिता मतदान घेण्यांत आले असता ठरावाच्या बाजुने / विरोधात / तटस्थ सदस्यांची नांवे

| अ. क्र. | नगरसेवकांचे नाव | पक्ष | ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैती चंद्रकांत सिताराम | कॉंग्रेस (आय) | | | |
| 2 | परशुराम दामोदर पाटील | कॉंग्रेस (आय) | | | |
| 3 | जयंत महादेव पाटील | कॉंग्रेस (आय) | | | |
| 4 | नरेंद्र मेहता | कॉंग्रेस (आय) | | | |
| 5 | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | कॉंग्रेस (आय) | | | |
| 6 | गोहिल शानु | कॉंग्रेस (आय) | | | |
| 7 | जैन गिता भरत | कॉंग्रेस (आय) | | | |
| 8 | शाह रिटा सुभाष | कॉंग्रेस (आय) | | | |
| 9 | पाटील प्रभात प्रकाश | कॉंग्रेस (आय) | | | |
| 10 | सुरेखा यशवंत गायकवाड | कॉंग्रेस (आय) | | | |
| 11 | उमा विश्वनाथ सपार | कॉंग्रेस (आय) | | | |
| 12 | संगिता कैलाश पाटील | कॉंग्रेस (आय) | | | |
| 13 | सय्यद नुरजहॉं नझरहुसेन | कॉंग्रेस (आय) | | | |
| 14 | रांजणकर मुक्ता प्रविण | कॉंग्रेस (आय) | | | |
| 15 | चंद्रकांत भिकालाल मोदी | कॉंग्रेस (आय) | | | |
| 16 | प्रेमनाथ गजानन पाटील | कॉंग्रेस (आय) | | | |
| 17 | शहा शशिकांत रतिलाल | कॉंग्रेस (आय) | | | |
| 18 | डि. डि. नलावडे | कॉंग्रेस (आय) | | | |
| 19 | तुळशीदास दत्तु म्हात्रे | कॉंग्रेस (आय) | | | |
| 20 | हंसु कमलकुमार पांडे | कॉंग्रेस (आय) | | | |
| 21 | शफीक अहमद खान | कॉंग्रेस (आय) | | | |

तटस्थ (7)

तटस्थ (17)

१६

१४ कॉंग्रेस

+ २५ राष्ट्रवादी

मा. महासभा दि.    /   /

प्रकरण क्र.       करिता मतदान घेण्यांत आले असता ठरावाच्या बाजुने / विरोधात / तटस्थ सदस्यांची नांवे

| अ.क्र. | नगरसेवकांचे नाव | पक्ष | ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पाटील रोहिदास शंकर | भाजपा | | | ✓ |
| 2 | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | भाजपा | | | ✓ |
| 3 | ~~अग्रवाल धनराज नंदलाल~~ | भाजपा | | | ~~✓~~ |
| 4 | भोईर गजानन लक्ष्मण | भाजपा | | | ✓ |
| 5 | शरद केशव पाटील | भाजपा | | | ✓ |
| 6 | सिंग मदन उदितनारायण | भाजपा | | | ✓ |
| 7 | कोलासो जेम्स इजिदोर | भाजपा | | | ✓ |
| 8 | जैन रमेश धरमचंद | भाजपा | | | ✓ |
| 9 | गोन्सालविस जोजम जॉन | भाजपा | | | ✓ |
| 10 | जानी कैलासबेन दिनेशचंद्र | भाजपा | | | ✓ |
| 11 | शाह रक्षा एस. | भाजपा | | | ✓ |
| 12 | ~~नरावत भवरीकुवर चेनसिंह~~ | भाजपा | | | |
| 13 | भानु भगवान पाटील | भाजपा | | | ✓ |
| 14 | ~~पाटील अशोक पांडुरंग~~ | भाजपा | | | |
| 15 | भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | भाजपा | | | ✓ |

१२

१२ भाजपा

~~१ ३ शिवसेना~~

~~१ २ काँग्रेस~~

१७.

मा. महासभा दि.     /   /

प्रकरण क्र.          करिता मतदान घेण्यांत आले असता ठरावाच्या बाजुने / विरोधात  / तटस्थ सदस्यांची नांवे

| अ.क्र. | नगरसेवकांचे नाव | पक्ष | ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पाटील प्रफुल्ल काशिनाथ | आघाडी | | | |
| 2 | भोईर शशीकांत जगन्नाथ | आघाडी | | | |
| ~~3~~ | ~~अशोक पाटील~~ | आघाडी | | | |
| 4 | पाटील लिला गुरूनाथ | आघाडी | | | |
| 5 | गोयंका सुधा लक्ष्मीकांत | आघाडी | | | |
| ~~6~~ | ~~संगीता विजय म्हात्रे~~ | आघाडी | | | |

जनता दल.

मा. महासभा दि.   /   /

प्रकरण क्र.      करिता मतदान घेण्यांत आले असता ठरावाच्या बाजुने / विरोधात / तटस्थ सदस्यांची नांवे

| अ.क्र. | नगरसेवकांचे नाव | पक्ष | ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 1 | रतन कृष्णा पाटील | शिवसेना | | | |
| 2 | पाटील अनंत रामचंद्र | शिवसेना | | | |
| 3 | शुभांगी सिताराम नाईक | शिवसेना | | | |
| 4 | ~~कंरबेळे प्रियांका प्रकाश~~ | ~~शिवसेना~~ | | | |

~~4~~
3

मा. महासभा दि.    /   /

प्रकरण क्र.     करिता मतदान घेण्यांत आले असता ठरावाच्या बाजुने / विरोधात / तटस्थ सदस्यांची नांवे

| अ.क्र. | नगरसेवकांचे नाव | पक्ष | ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मिलन म्हात्रे | जनतादल (सेक्यूलर) | | | |
| 2 | ~~तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर~~ | ~~जनतादल (सेक्यूलर)~~ | | | |
| 3 | म्हात्रे नयना गजानन | जनतादल (सेक्यूलर) | | | |

२

२

२५
१६
१२
५
३
२
६३

९०६

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००५

प्रकरण क्रमांक :- ५६ :- मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिकांना कायमस्वरूपी नेमण्याकरीता पद निर्मिती बाबत.

ठराव क्रमांक :- ५४ (४)

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या एकूण २८ बालवाडया असून सदर बालवाडयात शिकविणा-या १३ शिक्षिका सन १९८९ मध्ये तत्कालिन नगरपालिकेकडे वर्ग झालेल्या आहेत, तर यु.बी.एस.पी.सु.ज.यो. अंतर्गत १५ बालवाडी शिक्षिका सन १९९३ मध्ये नियुक्त करण्यात आलेल्या आहेत. सदर बालवाडी शिक्षिकाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | ठिकाण | नेमणूकीचा दिनांक | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | माधवी विनायक राउत | मोर्वा | २५/८/८३ | २२ |
| २ | फातिमा शेंदुर्ले | काशिमिरा | २५/८/८३ | २२ |
| ३ | पारूलबेन दर्जी | बंदरवाडी शाळा क्र.७ | २/८/८९ | १७ |
| ४ | रंजना हेमंत पाटील | गोडदेव शाळा क्र.८ | १/७/९१ | १५ |
| ५ | अनिता अरूण धुरी | बंदरवाडी शाळा क्र.१५ | १/७/९१ | १८ |
| ६ | सुहासिनी सुभाष नाईक | उत्तन | १/७/९१ | १५ |
| ७ | शैला पाटील | घोडबंदर | १/७/९१ | १५ |
| ८ | मंदाकिनी प्रकाश रूपवते | मिरा गांव | १/७/९१ | १५ |
| ९ | वर्षा सतिश तांबे | जय अंबे नगर | ३०/९/९३ | १२ |
| १० | सुवर्णा वसंत महागांवकर | जय अंबे नगर | १६/३/९४ | ११ |
| ११ | ग्लोरीया मनवेल घोन्सालवीस | शास्त्री नगर, धावणी | ६/७/९१ | ११ |
| १२ | कुंदा जयकुमार पाटील | आॅ. इंदिरा नगर | १५/५/९५ | १० |
| १३ | संगिता श्रीरंग पाठक | मनपा शाळा क्र.१८ | १/७/९५ | १० |
| १४ | कृपा कलेंद्र आचार्य | माश्याचा पाडा | २/७/९५ | १० |
| १५ | आकांशा सावे | काशिमिरा | ६/६/९५ | १० |
| १६ | सुनिता सुहास लोकेगांवकर | अण्णा नगर | २८/३/९५ | १० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | अलका वासुदेव पाटील | चेना | ६/६/९६ | ९ |
| १८ | अलका मदन पाटील | घोडबंदर | ६/६/९७ | ८ |
| १९ | चारूलता महेश किणी | मनपा शाळा क्र.१६ | ११/८/९७ | ८ |
| २० | रविंद्र कौर बिरदी | मनपा शाळा क्र.१८ | २२/७/९८ | ७ |
| २१ | पुनम रामकिशन माळी | आंबेडकर नगर | १/७/९८ | ७ |
| २२ | भारती अशोक हिंगू | मनपा शाळा क्र.१७ | २२/१२/२००० | ५ |
| २३ | रेखा हेमराज पाटील | गणेश देवल नगर | २१/१२/२००२ | ३ |
| २४ | चंचला कैलाश रोहने | घोडबंदर | ६/६/२००२ | ३ |
| २५ | वनिता मनोहर सिंह | नाझरेथ आगर | २१/१२/२००२ | ३ |
| २६ | कुसुम श्याम बारंगुळे | कोटार | ६/६/९८ | ७ |
| २७ | ज्योत्स्ना माछी | राई | ६/६/९५ | १० |

वरील सर्व बालवाडी शिक्षिकांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पद मंजूरीच्या अधिन राहून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार कायम स्वरूपी नेमणूक करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री हॅरल बोर्जिस

अनुमोदन :- श्री परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

पिठासन अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

१०८

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००५

प्रकरण क्र. :- ५६ :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिकांना कायमस्वरूपी नेमण्याकरीता पद निर्मिती बाबत.

ठराव क्रमांक :- ५४ (३१)

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण २८ बालवाडया असून सदर बालवाडया महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येत आहेत. सदर बालवाडया मध्ये असणा-या शिक्षिका बालवाडया वर्गा व्यतिरीक्त वर्षभर विविध अन्य स्वरूपाची कामे करीत असतात. सदर कामामध्ये पल्स पोलिओ मोहिमेत काम करणे, घरोघरी जाऊन मुलांना डोस पाजणे तसेच इतर शासकीय योजनेची कामे वर्षभर करीत असतात. तसेच नागरी मुलभूत सेवा प्रशिक्षण योजनेची कामे, शाळेच्या गोडीबाबत नागरीकाना महत्व पटवून देणे, निवडणूक प्रक्रियेची सर्व कामे, आर्थिक गणना, जन्ममृत्यू नोंदणी, दारिद्रय रेषेखालील कुटूंबाचा सर्व्हे हया कामाचा अंतर्भाव आहे. ठाणे व भिवंडी निझामपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर बालवाडी शिक्षिकांची कायमस्वरूपी पदे असून कायम स्वरूपी बालवाडी शिक्षिका कार्यरत आहेत. त्याच प्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर बालवाडी शिक्षिकांची २८ पदे कायमस्वरूपी मंजूर करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) अन्वये मंजूरी देण्यात येत आहे. सदर पदाची वेतनश्रेणी ३०५०-४५९० व शैक्षणिक पात्रता ८ वी ते १० वी पास व ३ महिन्याचा बालवाडी कोर्स पूर्ण अशी ठेवण्यात यावी. सदर बालवाडी शिक्षिकांना प्रशासनाने पूर्ण आठ तासाचे काम देण्यात यावे असा मी ठराव मांडतो.

सुचक :- श्री हॅरल बोर्जिस [signature]

अनुमोदन :- श्री परशुराम पाटील [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर

[signature]

पिठासन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(१०८)

## मा. महासभा दि. १९/१०/२००५

**प्रकरण क्र. ५७ :-** **महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळीकरीता सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

ठराव क्र. :- ५५

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचारी कामगार संघटनांनी कर्मचाऱ्यांना दिवाळीपुर्वी बोनस व सानुग्रह अनुदान देणेबाबत विनंती केलेली आहे. परंतु, मागील चार वर्षापासून शासनाने कर्मचाऱ्यांना बोनस देण्याचे बंद केलेले असून महानगरपालिका कर्मचारी बोनस ॲक्टनुसार बोनस मिळण्यास पात्र नाहीत. त्यामुळे महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस शासनाचे निर्णयाशिवाय देता येत नाही. मात्र या संदर्भात नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र. २६७/नवि-२४, दि. २७/११/२००२ च्या अनुषंगाने दि. ३१/१०/२००२ रोजी श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व इतर यांच्या मागण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीतील कार्यवृत्तामध्ये नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिका स्तरावर आर्थिक परिस्थितीनुसार सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबत निर्णय घेण्यात यावा. मात्र राज्य शासन महानगरपालिका कर्मचाऱ्यांना वेतनासाठी कोणत्याही प्रकारचे अनुदान देत नसल्यामुळे सानुग्रह अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्य शासनाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. सन २००४ चे वर्षासाठी महानगरपालिकेच्या महासभेत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना फक्त सानुग्रह अनुदान देण्याबाबत ठराव पारित करण्यात येऊन वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना रु. ४,०००/- प्रदान करण्यास तसेच रोजंदारी कर्मचारी यांना प्रत्येकी रु. २,०००/-, बालवाडी शिक्षीका यांना रु. ७००/- तसेच महानगरपालिका शिक्षकांना रु. २,२००/- सानुग्रह अनुदान मंजूर करण्यास मंजूरी दिली होती. दिवाळी निमित्त या वर्षी सन २००५ मध्ये कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळणेबाबत कामगार संघटनांनी मागणी केलेली आहे.

सन २००५-०६ या वर्षाच्या अंदाजपत्रकात लेखाशिर्ष "फ" संकिर्ण मध्ये एकूण रु. ७० लाख इतकी सानुग्रह अनुदानासाठी तरतुद केलेली आहे. सदर तरतुदीपैकी वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ यांना रु. ४,५००/-, रोजंदारी व सुवर्ण जयंती कर्मचाऱ्यांना (तसेच ठोक वेतन व मानधनावरील कर्मचारी) २,५००/-, महानगरपालिका शिक्षकांना रु. २,७००/- व बालवाडी शिक्षिकांना रु. १,०००/- दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेस मा. महासभेची मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.

अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १८/१०/२००५ (११०)

# मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये गठीत करायच्या विशेष समित्या

## सुचवावयाच्या नावांची यादी

ठराव क्र. ५६

समिती क्र. १ | समितीचे नांव :- क्रिंडा समाजकल्याण व सांस्कृतिक समिती

| अ. क्र. | प्रस्तावित सदस्य | अ. क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|---|---|
| | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | | ~~राष्ट्रीय काँग्रेस~~ |
| १. | सौ. ज्यूडी डिसोजा | १०. | |
| २. | सौ. ग्रेटा फॅरो | ११. | |
| ३. | सौ. अनिता पाटील | १२. | श्री. चंद्रकांत तरे |
| ४. | श्री. टेरी परेरा | १३. | श्री. वसंत पाटील |
| ५. | श्री. नितीन ठाकूर | १४. | |
| ६. | श्री. ॲड. एस. ए. खान | १५. | |
| ७. | श्री. प्रेमनाथ पाटील | १६. | |
| ८. | सौ. रिटा शाह | १७. | |
| ९. | सौ. सुनिता पाटील | १८. | |
| असदस्य | १) | असदस्य | १) |
| | २) | | २) |

### विरोधी पक्षाकडून

| | | |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

# मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये गठीत करायच्या विशेष समित्या

## सुचवावयाच्या नावांची यादी

समिती क्र. २ — समितीचे नांव :- माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती

| अ. क्र. | प्रस्तावित सदस्य | अ. क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|---|---|
| | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | | ~~राष्ट्रीय काँग्रेस~~ |
| १. | सौ. जेन्वी आल्मेडा | १०. | |
| २. | श्री. प्रकाश दुबोले | ११. | |
| ३. | सौ. हेलन गोंविद | १२. | श्री. भानुदास भोईर |
| ४. | श्री. परशुराम म्हात्रे | १३. | श्री. जयवंत जनार्दन वैती |
| ५. | श्री. मिलन पाटील | १४. | |
| ६. | सौ. प्रभात पाटील | १५. | |
| ७. | सौ. मुक्ता रांजणकर | १६. | |
| ८. | सौ. नुरजहाँ हुसेन | १७. | |
| ९. | श्री. शशिकांत शहा | १८. | |
| असदस्य | १) | असदस्य | १) |
| | २) | | २) |

विरोधी पक्षाकडून

| | | |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

# मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये गठीत करायच्या विशेष समित्या

## सुचवावयाच्या नावांची यादी

समिती क्र. ३ | समितीचे नांव :- आरोग्य परिरक्षण समिती

| अ. क्र. | प्रस्तावित सदस्य | अ. क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|---|---|
| | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | | ~~राष्ट्रीय काँग्रेस~~ |
| १. | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | १०. | |
| २. | श्री. सुर्यकांत भोईर | ११. | |
| ३. | श्री. महेंद्र सिंग चौव्हाण | १२. | श्री. भगवती शर्मा |
| ४. | श्री. ध्रुव किशोर पाटील | १३. | श्री. अविनाश गुरव |
| ५. | ~~श्री. परशुराम [illegible]~~ सौ. मयाबाई भोईर. | १४. | |
| ६. | श्री. हंसु कुमारे पांडे | १५. | |
| ७. | सौ. गीता जैन | १६. | |
| ८. | सौ. उमा सपार | १७. | |
| ९. | श्री. मॉरीस रॉड्रीक्स | १८. | |
| असदस्य | १) | असदस्य | १) |
| | २) | | २) |

### विरोधी पक्षाकडून

| | | |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

# मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये गठीत करायच्या विशेष समित्या

## सुचवावयाच्या नावांची यादी

समिती क्र. ४ — समितीचे नांव :- गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

| अ. क्र. | प्रस्तावित सदस्य | अ. क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|---|---|
| | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | | ~~राष्ट्रीय काँग्रेस~~ |
| १. | श्री. रविंद्र माळी | १०. | |
| २. | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | ११. | |
| ३. | सौ. जिवी हिरा वाडे | १२. | (शेख) श्री. शफीक अहमद (सुलतान पूरी) शेख |
| ४. | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | १३. | श्री. प्रमोद कांबले |
| ५. | श्री. हरेश गावंड | १४. | |
| ६. | श्री. दिनेश नलावडे | १५. | |
| ७. | श्री. चंद्रकांत मोदी | १६. | |
| ८. | श्री. नरेंद्र मेहता | १७. | |
| ९. | सौ. सुरेशा गायकवाड | १८. | |
| असदस्य | १) | असदस्य | १) |
| | २) | | २) |

**विरोधी पक्षाकडून**

| | | |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

ठराव सर्वानुमते मंजुर

सुचक - हेरल बोर्जीस [signature]

अनुमोदन - परशुराम पाटील [signature]

# मिरा भाईदर महानगरपालिका,

मा. स्थायी समिती सभा दि. १९/१०/२००५

(११४)

**प्रकरण क्रमांक ५९ :- मिरा भाईदर महानगरपालिका सर्व साधारण सभा दि.१९/१०/२००५.**

**ठराव क्रमांक :-** ५८

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत काही इमारतीमधील सदनिका/दुकाने यांना वेगवेगळया दराने कर आकारणी झालेली आहे. वास्तविक एकाच इमारतीमध्ये सर्व सदनिका/दुकाने यांना एकाच दराने कर आकारणी होणे क्रमप्राप्त आहे. या कर आकारणीमध्ये सुसत्रता येण्याकरिता मा.स्थायी समिती सभा दि. ०६/११/२००३ रोजी ठराव क्रमांक १३७ अ ने नगरपालिका/महानगरपालिका यांनी ज्या इमारतीना प्रथम कर ज्या भाडेमुल्य दराने लावलेला आहे त्या भाडे मुल्य दराने त्याच इमारतीमधील इतर सदनिकांना कराची आकारणी व्हावी असा ठराव मंजूर केलेला होता. या ठरावाची अंमलबजावणी पालिका प्रशासनाकडून काही प्रकरणात करण्यांत आलेली होती. त्यानंतर सदर कार्यवाही थांबवण्यात आली तरी नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेऊन व त्याच्यावर होणारा अन्याय लक्षात घेता महानगरपालिकेकडे असलेल्या प्रलंबित अर्जावर मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १३७ अ प्रमाणे घेतलेल्या निर्णया प्रमाणे महानगरपालिका स्थापनेपुर्वी महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या इमारतीमधील सदनिकांना वेगवेगळया दराने कर आकारणी करण्यात आलेली आहे त्या बाबत महानगरपालिका मा. स्थायी समिती, ठराव क्रमांक १३७ अ, दि.०६/११/२००३ प्रमाणे [illegible] सदरची कार्यवाही **"मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९"** मधील **"अधिनियम व नियमातील"** तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. असा मी ठराव मांडत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सूचक:- हॅरल बोर्जीस

अनुमोदक:- परशुराम पाटील

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

१९५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा दि. १९/१०/२००५.**

**प्रकरण क्र. ६० :-**

दि. २६,२७ जुलै २००५ रोजी नैसर्गिक आपत्तीमध्ये मृतांच्या नातेवाईकांना तसेच आजारी पडलेल्या रुग्णांना आर्थिक मदत करणेबाबत.

**ठराव क्र. :-** ५८

दि. २६,२७ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीने महानगरपालिकेच्या अनेक विभागात पाणी साचलेले होते. अतिवृष्टीमुळे पिण्याचे पाणी दुषित होउन हगवण, अतिसार, उल्टी जुलाब, काविळ, विषमज्वर इ. आजार पसरण्याची शक्यता होती. अतिवृष्टीमुळे साचलेल्या पाण्यातुन महानगरपालिका क्षेत्रातील कित्येक नागरिक मुंबईहून पायी चालत आलेले होते साचलेल्या पाण्यात उंदीर, कुत्रा, मांजर इ. घरगुती प्राण्यांचे मलमुत्र मिसळले व त्यामुळे लेप्टोस्पायरससारखा आजार पसरण्याची भीती असते. तसेच याकाळात डेंग्यु, मलेरियासारखे आजार बळावण्याची शक्यता असते. वरील बाब विचारात घेउन महानगरपालिकेने महापालिकेचे सर्व पदाधिकारी, सन्मा. नगरसेवक, राजकिय पक्ष व नागरिक यांच्या सहकार्याने तातडीने आवश्यक ती उपाययोजना सुरु केलेली होती त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील परिस्थिती वेळेत नियंत्रीत करता आली दि. २०/९/२००५ रोजी झालेल्या मा. महासभेच्या बैठकीत मा. महापौरांनी अतिवृष्टीच्या काळात पुरामुळे मृत पावलेल्या व्यक्ती व संशयीत लेप्टोस्पायरस, डेंग्यु, गॅस्ट्रो, सर्पदंशामुळे मृत पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाइकांस रु. २५,०००/- व ज्यांना वरील आजार झाला अशा व्यक्तींना रु. १०,०००/- मदत करण्याचे अशी घोषणा केलेली आहे. त्यास ही महासभा मंजुरी देत आहे. सदरची मदत पावसाळा सुरु झालेपासून डिसेंबर अखेर पर्यंतच्या कालावधीत लागू करावी तसेच सदरचा खर्च २००५, २००६ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकात लस टोचणी या प्रदान शिर्षा अंतर्गत अ. क्रं. १ आकस्मिक खर्च या दुय्यम लेखा शिर्षाखाली मंजूर असलेल्या रु. ५ लाखामधून करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे. सदरबाबत आरोग्य विभागाने तांतडीने कार्यवाही करुन पात्र रुग्णांची माहिती मा. आयुक्तांकडे सादर करावी व आर्थिक मदत देणेची कार्यवाही तांतडीने करण्यांत यावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सूचक :- हॅरल्ड बोर्जीस.** **अनुमोदन :- परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००५

**प्रकरण क्र. ६१ :-** **सन्मा. सदस्य श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर यांचे दिनांक <u>१४/१०/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.</u>**
**भाईंदर (पुर्व) येथिल ना फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीवाल्यांना मनाई करणेबाबत व त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत.**

**ठराव क्र. ५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) विभागातील बी. पी. रोड, गोडदेव नाका ते नवघर नाका, नवघर नाका ते बंदरवाडी नाका, बंदरवाडी नाका ते हॉटेल प्रशांत (रेल्वे समांतर रस्ता), साईबाबा मंदिर ते (गोडदेव फाटक रोड) गोडदेव नाका, बंदरवाडी नाका ते जेसल पार्क जैन मंदिर, भाईंदर (पूर्व) फाटक चर्च ते केबिन रोड, केबिन रोड नाका ते नर्मदा नगर मधुन एम.आय. उद्योग पासुन अभिनव स्कुल पर्यंत जाणारा रस्ता, नवघर क्रॉस रोड (एस्. व्ही. रोड) भाईंदर (पूर्व) विजय पंजाब ते खारीगांव सत्यनारायण मंदिर ते रामगोपाल सदन केबिन रोड पर्यंत.

वरिल ठिकाणी ना फेरीवाला क्षेत्र असुन फेरीवाले सदर ठिकाणी व्यवसाय करुन वाहतुकीची कोंडी करतात. ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना चालण्यास अडथळा निर्माण करत असतात. तसेच शिल्लक राहिलेला भाजीपाला, फळे, प्लास्टीक पिशव्या, रिकामे खोखे इत्यादी वस्तु रस्त्यावर टाकुन कचरा करीत असतात. भाजीपाला, फळे इत्यादी कुजून दुर्गंधी पसरते. त्यामुळे जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होता.

तरी ना फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीवाल्यांना बसण्यास मनाई करुन त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८४ व ३८५ प्रमाणे करावी असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत ज. भोईर.** **अनुमोदन :- श्रीम. लिला गुरुनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

११८

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/११/२००५

**अभिनंदन ठराव क्र. ६० :-**

सन्मा. सदस्य स्टिवन जॉन मेन्डोंसा यांचा आज दि. १८/११/२००५ रोजी वाढदिवस आहे. त्यांच्या आजच्या वाढदिवशी त्यांना सभागृहातर्फे हार्दिक शुभेच्छा तसेच त्यांना चांगले आरोग्य लाभो आणि त्यांच्याकडुन या शहराची चांगली उत्तरोत्तर सेवा घडो अशी शुभेच्छा.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(११८)

मा. महासभा दि. १८/११/२००५.

प्रकरण क्र. ६१ :- दि. १२/०८/२००५ (तहकुब), दि. १७/०८/२००५ (दि. १२/०८/२००५ रोजीची तहकुब सभा) व दि. २३/०८/२००५ (दि. १७/०८/२००५ रोजीची तहकुब सभा) रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ६९ :-

दि. १२/०८/२००५ (तहकुब), दि. १७/०८/२००५ (दि. १२/०८/२००५ रोजीची तहकुब सभा) व दि. २३/०८/२००५ (दि. १७/०८/२००५ रोजीची तहकुब सभा) रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या पानानुक्रमे सुधारणा दुरुस्ती विचारात घेऊन वरील सर्व इतिवृत्तांत कायम करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. हॅरल्प बोर्जीस, सभागृहनेता

अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील, विरोधीपक्षनेता

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/११/२००५

प्रकरण क्र. ६२ :- परिवहन समिती सदस्यांना मानधन देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ६२ :-

परिवहन सेवेच्या मागणीप्रमाणे आणि त्यांनी दिलेल्या नोटप्रमाणे त्यांना मासिक रुपये २,०००/- पर्यंत मानधन देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. लिओ कोलासो. अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१२०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/११/२००५

**प्रकरण क्र. ६३ :-** **मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५, ठराव क्र. ९७ बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६३ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १८/११/२००५

**प्रकरण क्र. ६४ :- मिरा भाईंदर परिसरामध्ये २६ व २७ जुलै रोजीच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना एक वर्षाकरिता कर माफी देणेबाबत.**

ठराव क्र. ६४ :-

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जनतेला टॅक्समध्ये माफी या विषयासंबंधी मा आयुक्त साहेबांनी सखोल माहिती मिळवून त्यांनी त्यांच्या अधिकाराखाली निर्णय घेणेंस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/११/२००५

**प्रकरण क्र. ६५ :- माध्यमिक व पुर्व प्राथमिक वर्ग शासनाची मंजूरी घेऊन सुरु करणेबाबत.**

**ठराव क्र. ६५ :-**

प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. त्याप्रमाणे महानगरपालिका इ. १ली ते ७वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण देत आहे आणि त्यापुढील इ. ८वी पासून पुढील शिक्षण घेण्याकरिता मिरा भाईंदर मधील गरीब विद्यार्थ्यांना खाजगी शाळेत प्रवेश मिळत नसल्याने तसेच त्यांची शैक्षणिक फी भरण्याची ऐपत नसल्याने त्यांना पुढील शिक्षणापासून वंचित राहावे लागते त्याकरिता महानगरपालिकेने माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षणाचे वर्ग सुरु करण्यासाठी ही महासभा मंजुरी देत आहे व ह्याकामी लागणारी शासनाची परवानगी प्रशासनाने घ्यावी असे ठरवित आहे. तसेच, सद्या काशिमिरा, भाईंदर (पूर्व) आणि भाईंदर (पश्चिम) या ठिकाणी माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षणाचे वर्ग सुरु करण्यासाठी ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/११/२००५

823

**प्रकरण क्र. ६६** - विकास आराखड्यामध्ये नाले दर्शविणे बाबत.

**ठराव क्र.** ६६

मिरा भाईंदर शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये दिनांक १४ मे १९९७ रोजी मंजुर झाली असून दि. १५ जुलै १९९७ पासुन अंमलात आली आहे. वगळेलेल्या भागाची विकास योजना दि.२५ ऑगस्ट २००० रोजी मंजूर झालेली असुन दि.१५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आलेली आहे.

उक्त विकास योजनेत शहरातील विद्यमान नाले दर्शविण्यात आलेले नाहीत. सबब महानगरपालिकेने मे. नियष यांना विद्यमान नाल्याचे सर्वेक्षण करण्यास ठेका देण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी विद्यमान नाल्याचे सर्वेक्षणाचे काम पुर्ण केले आहे. त्यानुसार शहरामध्ये एकूण विद्यमान २९ नाले अस्तित्वात आहेत. हे नाले विकास योजनेत दर्शविण्यात आलेले नाहीत. सबब उक्त नाले विकास योजनेत दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. जेणे करुन अतिवृष्टीमुळे निर्माण होणा-या परिस्थितीवर भविष्यात मात करता येईल.

महापालिका हद्दीतील विद्यमान नाल्याची माहिती व सरासरी रुंदी तसेच प्रस्तावित रुंदी खालील प्रमाणे आहे.

**भाईंदर (पश्चिम) मधिल नाले -**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १ | मुर्धा ब्रीजच्या बाजूचा नाला | २०.०० | २०.०० |
| २ | जाफरी खाडीकडे जाणारा रेल्वे समांतर नाला, भाईंदर (प.). | ५.०० | ८.०० |
| ३ | गणेश देवल ते क्रांतीनगर नाला | ४.०० | ४.०० |
| ४ | भाईंदर जयअंबे झोपडपट्टी क्र. १ कडून खाडीकडे जाणारा नाला | ४.०० | ७.०० |
| ५ | भाईंदर (प.) बाबू मेस्त्री चाळ ते जनता नगर झोपडपट्टी (स्मशानभूमी मागील नाला) | ३.०० | ३.०० |

**भाईंदर (पुर्व) मधिल नाले -**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| ६ | किरण नगर मधील खाडीकडे जाणारा नाला | ३.०० | ७.०० |
| ७ | आर.एन.ए. पार्क मधील खाडीकडे जाणारा नाला | ३.०० | ६.०० |
| ८ | केबिन रोड नर्मदा कुंज, गोडदेव नाका, शिर्डीनगर, नवघर नाका, इंदिरानगर खाडीकडे जाणारा नाला | ३.५० | ५.५० |
| ९ | गोडदेव स्मशानभूमी कडून खाडीकडे जाणारा नाला | ४.०० | ६.०० |
| १० | उड्डाणपूल सर्कल ते गोल्डन नेस्ट ३०.०० मी. रस्ता लगत नाला | ३.०० | ६.०० |
| ११ | दिपक हॉस्पीटल शेजारील नाला | १.५० | ४.०० |

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १२ | कनकिया रोड लगतचा नाला | ३.०० | ३.०० |
| १३ | एस.के. स्टोन समोरील नाला | २.०० | ६.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | महेश इंडस्ट्रीयल इस्टेट मागील नाला | २.०० | ६.०० |
| १५ | हटकेश उद्योगनगर ग्रीन कोर्ट क्लब समोरील नाला | २.५० | ४.५० |
| १६ | शिवार गार्डन शेजारील सरदार पटेल शाळा समोरील नाला | ३.०० | ३.०० |
| १७ | क्विन पार्ककडे जाणारा नाला | १.५० | १.५० |
| १८ | हटकेश उद्योगनगर पाईप लाईन रस्त्याकडील नाला | २.०० | २.०० |

**राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील नाले -**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १९ | घोडबंदर सगनादेवी ते बसस्टॉप रस्त्यालगतचा नाला | १.५० | १.५० |
| २० | माशाचा पाडा, लक्ष्मी बाग वेस्टन हॉटेल, विठ्ठल मंदिर कडून वाहत जाणारा नाला | ११.०० | १५.०० |
| २१ | होली क्रॉस शाळा जनता नगर ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ उघाडी पर्यंतचा नाला | ८.०० | ८.०० |
| २२ | महाजन वाडी, महाविष्णू मंदिर, दिल्ली दरबार, पंजाब फॉन्ड्री घोडबंदर खाडीकडे जाणारा नाला | ४, ७, १०, १५, ३० | ४, ७, १०, १५, ३० |
| २३ | पेणकरपाडा, खोडीयार नगर स्मशानभूमी समोरील नाला | ३.०० | ४.०० |
| २४ | मिराधाम ते पंजाब फॉन्ड्रीकडे जाणारा नाला | ३.०० | ३.०० |
| २५ | अरविनो हॉटेल जवळील नाला | ३.०० | ३.०० |
| २६ | लिबर्टी कम्पाऊंड ते दिव्या पॅलेस हॉटल पर्यंतचा नाला | ८.०० | ८.०० |
| २७ | कमलेश नगर बाबळीची भाट समोरील नाला | ३.०० | ३.०० |
| २८ | माशाचा पाडा गौरशहानगर मागील नाला-भटाचा पाडा-मिनाक्षी नगर वेस्टर्न पार्क ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पर्यंतचा नाला | ८.०० | ८.०० |
| २९ | पेणकर पाडा राजू इंड. इस्टेट नाला | ४.०० | ५.०० |

**मिरा रोड मधील नाले -**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| २५ | मिरा रोड ते भाईंदर (पु.) रेल्वे समांतर नाला | ३.०० | ३.०० |
| २६ | शांतीनगर मधील नाला | २.०० | ५.०० |
| २७ | शांतीनगर सर्कल ते स्टेशनकडे जाणारा रस्त्यालगत नाला | २.०० | २.०० |
| २८ | शगुन हॉटेल ते जाफरी ब्रीज पर्यंतचा नाला | १०.०० | १०.०० |
| २९ | गोकूळ विलेज, विजय पार्क, शगुन हॉटेल पर्यंतचा नाला | २.०० | २.०० |
| ३० | मिरा रोड स्मशानभूमी मागील नाला | ६.०० | ८.०० |

तरी वरील प्रमाणे नाले प्रस्तावित रुंदीसह विकास योजनेत दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच यापुढे नविन इमारत प्रस्तावाना परवानगी देताना वरील प्रमाणे नाले विचारात घेऊन नाल्यापासून नियमानुसार अंतर सोडूनच परवानगी देण्यात यावी.

**सुचक** - श्री टेरल बोर्जिस

**अनुमोदक** - श्री परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

**पिठासन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१२५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/११/२००५

प्रकरण क्र. ६७ :- सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १४/११/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

---

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुरु असलेल्या बांधकामाच्या दर्शनी भागात विकासकर्ते यांनी सदर बांधकामाचे परवानगीचे दस्तऐवजेचे फलक लावणेबाबत.

ठराव क्र. ६७ :-

सदर प्रस्तावाचे प्रश्नकर्ते सभेमध्ये उपस्थित नसल्यामुळे मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१२८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/११/२००५

प्रकरण क्र. ६८ :- सन्मा. सदस्य श्री. लिओ इजिदोर कोलासो यांचे दिनांक १४/११/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

---

प्राथमिक आरोग्य केंद्र महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेण्याकामी झालेल्या दिरंगाईमुळे कृतिगट गठित करण्याकामी.

ठराव क्र. ६८ :-

सदर प्रस्तावाचे प्रश्नकर्ते सभेमध्ये उपस्थित नसल्यामुळे मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१२८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/११/२००५

**दुःखवटा ठराव क्र. ६९ व ७० :-**

सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर यांच्या मातोश्री यशोदा अनंतराव भोईर यांचे अल्पशा आजाराने निधन झालेले आहे. तसेच मिरा-भाईंदर महापालिकेचे कर्मचारी श्री. राम पाटील यांच्या पत्नी कै. विजया पाटील यांचेसुद्धा निधन झालेले आहे. मिरा-भाईंदरचे उद्योजक श्री. गाडोदिया यांचे चिरंजीव कै. कपिल गाडोदिया हे तरूण वयात अॅटकने निधन पावलेले आहेत. माजी राष्ट्रपती के. आर. नारायण तसेच या शहराचे काँग्रेसचे उपाध्यक्ष अबु मौला शेख यांचे सुद्धा निधन झालेले आहे. या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ पटेल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१२६)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/१२/२००५

**अभिनंदन ठराव क्र. ७१ :-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राजकीय अध्यक्ष श्री. शरदचंद्रजी पवार साहेब तसेच, भारतीय जनता पार्टीचे श्री. गोपीनाथ मुंडे साहेब, काँग्रेस आय पक्षाच्या अध्यक्षा श्रीम. सोनीयाजी गांधी ह्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री सुदामरावजी गायकवाड साहेब ह्यांचा सुद्धा दि. १६/१२/२००५ रोजी वाढदिवस होता. ह्या सगळ्यांचे अभिष्टचिंतन, तसेच त्यांना दिर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१२८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/१२/२००५

**अभिनंदन ठराव क्र. ७२ :-**

माजी उपनगराध्यक्ष श्री. अशोक पाटील आणि सन्मा. सदस्या श्रीम. संगिता म्हात्रे यांचा काँग्रेस पक्षामध्ये समावेश झाल्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. हंसुकुमार पांडे.** **अनुमोदन :- श्रीम. मुक्ता रांजणकर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१३०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १७/१२/२००५.

प्रकरण क्र. ६९ :- दि. २३/०८/२००५ रोजीचे मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ७३ :-

दि. २३/०८/२००५ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री हॅरल्ड बोर्जीस
सभागृहनेता

अनुमोदन :- श्री परशुराम पाटील
विरोधीपक्ष नेता

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा दि. १७/१२/२००५

(939)

**प्रकरण क्र. ( ७० )** : छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर मध्यभागी रस्ता दुभाजकातील अनावश्यक प्रवेश बंद करणे बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. :-** ७४

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा रस्ता महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेला असून सदर रस्त्यावर क्रॉस रस्त्यांना जास्त प्रमाणावर प्रवेश एंट्र्या असल्याने वाहनांना मुख्य रस्त्यावरून वेगाने येणाऱ्या वाहनामुळे क्रॉस रस्त्यातून येणाऱ्या वाहनांना अपघात होऊन जिवित व मालमत्तेची हानी नाकारता येत नसल्याने मा. पोलिस निरीक्षक, मिरारोड, पोलिस स्टेशन यांनी करावयाच्या उपाययोजनेचे एक रेखाचित्र तयार करून कारवाई करीता या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. सदर पत्रानुसार महानगरपालिकेने संयुक्त पाहणी करून परवानगी देण्याकरीता मा. पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, ठाणे (ग्रामिण) यांच्याकडे प्रस्ताव पाठविलेला होता. सदर प्रस्तावावर चर्चा करण्याकरीता स्थानिक पोलिस अधिकारी, वाहतूक शाखेचे अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत ठरवल्यानुसार सदर रस्त्यावरील, खालील प्रवेश / एंट्र्या सोडून इतर सर्व प्रवेश बंद करावयाचे आहेत.

१) शिवाजी महाराज पुतळया मागील पहिले दोन प्रवेश

२) सिल्व्हर पार्क जंक्शन (सिग्नलचे काम सुरू आहे)

३) एस.के. स्टोन पोलिस चौकी जंक्शन (सिग्नलचे काम सुरू आहे)

४) मिरारोड पोलिस स्टेशनकडे जाणारा जंक्शन

५) शिवार गार्डन जंक्शन (सिग्नलचे काम सुरू आहे)

वरील ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकातील प्रवेश / एंट्री सोडून इतर सर्व ठिकाणचे प्रवेश मध्यभागी डीव्हायडर बांधून बंद करणे आवश्यक आहे असे मत मा. स्थायी समितीने व्यक्त करून एकमताने ठराव पारीत केलेला आहे. तरी मा. स्थायी समितीच्या ठरावानुसार सदर रस्त्यावरील ठरावात नमूद १ ते ५ ठिकाणचे प्रवेश एन्ट्र्या सोडून इतर सर्व प्रवेश तात्काळ बंद करण्यास तसेच येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस डीव्हायडर मध्ये लोखंडी रेलिंग बसविण्यास येणाऱ्या खर्चास सुध्दा ही सभा मंजुरी देत आहे. सदर रेलिंग वर खाजगी प्रायोजकाकडून वृत्तपत्रात जाहीरातीद्वारे ऑफर्स मागवाव्यात. तसेच मध्यभागातील लॅंडस्केपिंग व हीरवळ महानगरपालिकेने स्वतः देखभाल, निगा राखण्यात यावी.

**सुचक** :- श्री. हॅरल बोर्जिस

**अनुमोदन** :- श्री. परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

**पिठासन अधिकारी**

~~स्थायी समिती~~

SSS/DK/M/2

# मा. महासभा दि. १७/१२/२००५

१३२

**प्रकरण क्रमांक :-** ( ७१ ) राष्ट्रीय महामार्ग क्रं. ८ दहिसर चेक नाका ते वर्सोवा ब्रीज पर्यत (CH ४३९.०० km ते CH ५०२km) रस्त्यालगत दोन्ही बाजूतील सर्व्हीस रोड महानगरपालिकेच्या ताब्यात हस्तांतर करून घेणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्रं. :-** ( ७५ )

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रं. ८ वरील दहिसर चेक नाका ते काशिमिरा नाका व पुढे वर्सोवा नाक्या पर्यत मुख्य रस्ता व दोन्ही बाजूतील सर्व्हीस रोड भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या ताब्यात आहे. सदर मुख्य रस्त्यालगत असलेले सर्व्हीस रोड महानगरपालिकेकडे हस्तांतर करून घेउन विकसित करण्याकरीता लोकप्रतिनिधी कडून मागणी होत आहे. प्रशासनामार्फत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतराबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे रस्ते हस्तांतर न करता सर्व्हीस रोड देखभाल दुरुस्ती तसेच पूर्व परवानगी घेउन सुशोभित व विकसित करण्याकरीता करारनामा करून देण्याबाबत पत्र देउन तयारी दर्शविलेली आहे. सदर रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात हस्तांतर केल्यास मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर.सी.सी. नाले फुटपाथ बांधून सुशोभिकरण करणे तसेच सर्व्हीस रोड चे मजबूतीकरण डांबरीकरण करणे ही कामे महानगरपालिकेस पुढील अर्थसंकल्पात तरतुद करून हाती घेता येतील.

वरील प्रस्ताव पाहता सदर सर्व्हीस रोड भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याशी करारनामा करून अटीशर्तीवर विकसित करणे कामास मान्यता देण्यात येत आहे. ठाणे, नाशिक, मुंबई महानगरपालिकांनी अशाप्रकारे सर्व्हीस रोड स्वतः तयार केलेले आहेत. आयुक्त यांनी सदर प्राधिकरणाशी पत्रव्यवहार करुन महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या अटीशर्ती ठेवून करारनामा करण्यात यावा असा ठराव मांडीत आहे.

सुचक :- श्री. हॅरल्ड बोर्जीस, सभागृहनेता

अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील, विरोधी पक्षनेता

ठराव सर्वानुमते मंजूर

पिठासन अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

SSP/DK/MS/6

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १७/१२/२००५

**दुःखवटा ठराव क्र. ७६ :-**

माजी अर्थमंत्री व नियोजन समितीचे उपाध्यक्ष व राजकीय कामकाजाशी संबंधित व्यक्ती मधु दंडवते त्याचप्रमाणे अभिनय क्षेत्रातील सुधीर जोशी ह्यांचे निधन झाले आहे. तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्रीम. नयना म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(38)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

**अभिनंदन ठराव क्र. ७५. :-**

महाराष्ट्राचे कवी श्री. विं. दा. करंदीकर ह्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०/०१/२००६

प्रकरण क्र. ७३ :- दि. २०/०९/२००५ व दि. १९/१०/२००५ रोजीचे मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. :- ७८

दि. २०/०९/२००५ व दि. १९/१०/२००५ रोजीचे मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हॅरल्ड बोर्जीस
समागृहनेता

अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील
विरोधी पक्ष नेता

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा सभा दि. २०/०१/२००६



**प्रकरण :- (७४)** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास कामांची भुमीपुजन, उद्‌घाटन, समारंभाचे नामफलक, निमंत्रण पत्रिकेबाबत धोरण निश्चित करणे.

**ठराव क्र. :-** ७९

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामे पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पार पाडण्यात येतात.

सदर विकास कामांची उद्‌घाटने, भूमीपुजन, समारंभावेळी निमंत्रण पत्रिका व नामकरण फलकावर कोणकोणत्या पदाधिकारी यांची नावे असावित याबाबत वेळोवेळी वाद उत्पन्न होत असतात. मा. स्थायी समिती सभा, दि. २२/०१/२००४, ठराव क्र. १९२ व मा. स्थायी समिती सभा, दि. २४/०६/२००४, ठराव क्र. ४९ अन्वये पारीत झालेले आहे.

वरील प्रमाणे मा. स्थायी समितीचे ठराव रद्द करण्यात येत आहेत. यापुढे महानगरपालिकेचा कोणत्याही भूमीपुजन, उद्‌घाटन कार्यक्रम आयोजित करताना निमंत्रण पत्रिका व नामकरणाची पाटी यावर खालील मान्यवरांची नावे ठेवण्यात यावी.

१) मा. महापौर

२) मा. उपमहापौर

३) मा. आयुक्त

४) सभापती, स्थायी समिती

५) सभागृह नेता

६) विरोधी पक्ष नेता

७) प्रभागातील तीन / चार ही नगरसेवकांची नावे

८) संबंधित प्रभागातील प्रभाग समिती अध्यक्ष

तसेच आमदार / खासदार निधीतून केलेल्या कामाच्या उद्‌घाटन फलकावर संबंधित आमदार / खासदार यांची नावे लिहिण्यात यावी रू. १.०० कोटी रकमेच्या वरील कामांच्या उद्‌घाटन फलकावर सर्व नगरसेवंकांची नावे लिहिण्यात यावी. आमदार / खासदार निधीतील कामांच्या निमंत्रण पत्रिका व उद्‌घाटक फलकावर त्यांनी सुचविलेल्या दोन पाहुण्यांची नावे लिहावित. नगरसेवक निधीतील कामाच्या निमंत्रण पत्रिका व नामफलकावर सुध्दा संबंधित नगरसेवकांनी सुचविल्यास दोन पाहुण्यांची नावे लिहिण्यात यावी.

प्रत्येक कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी मा. महापौर राहतील. कार्यक्रमाकरीता प्रमुख पाहुणे मा. महापौरांच्या सुचनेनुसार बोलविण्यात यावे.

वरील पदाधिकारी व अधिकारी यांची नावे प्रत्येक विकास कामाच्या / नगरसेवक निधीच्या निमंत्रण पत्रिका व नामकरण फलकावर लिहिण्यात यावीत. प्रशासनाने याबाबत दक्षता घ्यावी असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**सुचक** :- श्री. हॅरल बोर्जिस **अनुमोदन** :- श्री. परशुराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर**

ठराव वाचून कायम करण्यात आला

**पिठासन अधिकारी**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २०/०१/२००६**

936

**प्रकरण क्र. ७५ :- प्रवासी तिकीट दर तसेच प्रवाश्याजवळील सामानाच्या आकाराबाबत परिवहन समिती ठराव क्र. ६४ दि. २९/११/२००५ च्या अनुषंगाने चर्चा करुन निर्णय घेणे.** (मा. परिवहन समिती सभा ठराव क्र. ०४ दि. ०४/०१/२००६ अन्वये मा. महासभेस शिफारस केलेले प्रकरण.)

**ठराव क्र. :** ८०

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन समितीने दि. २/८/२००५ प्रकरण क्र. २०, ठराव क्र. २१ अन्वये परिवहन उपक्रमाच्या बस सेवेसाठी भाडेसारणी निश्चित केली आहे. सदर भाडेसारणी मा. महासभा ठराव क्र. ३८ दि. २३/८/२००५ अन्वये भाडेसारणीस मान्यता दिलेली आहे. तसेच प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, ठाणे यांनी त्या भाडेसारणीस मंजूरी दिलेली आहे.

सदर भाडेदराबाबत स्थानिक प्रवासी आणि निरनिराळे राजकिय पक्ष प्रतिनिधींनी वेळोवेळी प्रवासी भाड्याचे दर कमी करण्यासाठी पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. MVA – 06/1328 प्र.क्र. ७५ / परिवहन - २ दि. २०/१२/२००५ अन्वये सुधारीत अधिसुचनेत नमुद केल्याप्रमाणे किमान व कमाल दराच्या मर्यादेत खालिलप्रमाणे भाडेसारणी निश्चित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अंतर कि.मी. | साधी सेवा | | मर्यादित सेवा | | जलदसेवा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | प्रौढभाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | सवलतीचे भाडे रुपये ०.१५ पैसे पोषण अधिभारासहित | |
| १ | ०-३ | ४ | २ | ४.५० | २ | ५ | ३ | |
| २ | ३.१-५ | ४.५० | २ | ५ | ३ | ६ | ३ | |
| ३ | ५.१-७ | ५ | ३ | ६ | ३ | ७ | ३ | |
| ४ | ७.१-९ | ६ | ३ | ७ | ४ | ९ | ४ | |
| ५ | ९.१-११ | ७ | ३ | ८ | ४ | १० | ५ | |
| ६ | ११.१-१३ | ८ | ४ | १० | ५ | १२ | ६ | |
| ७ | १३.१-१५ | ९ | ५ | १० | ५ | १३ | ६ | |
| ८ | १५.१-२० | ११ | ५ | १२ | ६ | १६ | ८ | |
| ९ | २०.१-२५ | १३ | ६ | १५ | ७ | १९ | ९ | |
| १० | २५.१-३० | १४ | ७ | १६ | ८ | २१ | १० | |
| ११ | ३०.१-३५ | १५ | ७ कमाल | १८ | ९ कमाल | २२ | ११ कमाल | |
| १२ | ३५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरासाठी प्रौढ भाड्यासाठी प्रत्येक अतिरिक्त ५ कि.मी. किंवा त्याच्या अंश भागाकरीता २ रुपये जादा भाडे आकारण्यात येईल. | | | | | | | |

टप्पा वाहनात चढण्याचे ठिकाण किंवा टप्पा वाहनातून उतरण्याचे ठिकाण हे संबधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिलेले टप्पा ठिकाण नसेल त्याबाबतीत भाडे आकारण्याच्या प्रयोजनासाठी, प्रवास केलेले अंतर अशा मान्यता दिलेल्या लगतपुर्वीच्या टप्पा ठिकाणापासून किंवा यथास्थिती अशा मान्यता दिलेल्या लगतनंतरच्या टप्पा ठिकाणापासून परिगणित करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाकडून आकारण्यात येणारा पोषण अधिभार रु.२/- किंमतीच्या तिकिटापर्यंत १० पैसे व रु.२/- पेक्षा अधिक किंमतीच्या तिकिटावर १५ पैसे यात समाविष्ट आहे.

मा. परिवहन समिती सभा ठराव क्र. २१ दि.२/८/२००५ व मा. महासभा ठराव क्र.३८ दि. २३/८/२००५ अन्वये देण्यात आलेल्या सवलतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही.

❖ **पास योजना**

शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्याकडून तसेच नियमीतपणे नोकरीवर जाणाऱ्या प्रवाश्याकडून मासिक पास, द्वैमासिक पास, त्रैमासिक पास, योजना सुरु करणेबाबतची मागणी होत आहे.

यास्तव परिवहन सेवेने विद्यार्थ्यांच्या व प्रवाश्यांच्या सोयीसाठी मासिक पासाकरीता २६ दिवसाचे दुहेरी प्रवास भाडे आकारुन ३० दिवस प्रवास व द्वैमासिक पासाकरीता ५२ दिवसांचे भाडे आकारुन ६० दिवसाचा प्रवास व त्रैमासिक पासाकरीता ७८ दिवसाचे भाडे आकारुन ९० दिवस प्रवासासाठी अशाप्रकारे सवलत पास योजना सुरु करण्यात येईल. त्याकरीता प्रवाश्यांना आगाऊ रक्कम भरुन पासेस देण्यात येतील.

❖ **सामान (लगेज)**

अ) हातात धरण्यासारख्या (४० X २५ X १५ से. मी. पर्यंतच्या आकाराच्या) सामानाखेरीज अन्य आकाराचे अथवा प्रकारचे सामान की, ज्यामुळे इतर प्रवाशांना अडचण, उपद्रव किंवा गैरसोय होण्याची शक्यता आहे, अशा प्रकारचे सामान उपक्रमाच्या कोणत्याही वाहनामध्ये कोणाही व्यक्तीने आणू नये.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोणाही व्यक्तीने, वाहकांने विनंती केल्यास वाहन सोडले पाहिजे आणि कोणत्याही व्यक्तीने अशा प्रकारची विनंती तात्काळ मान्य न केल्यास, त्यास वाहक अथवा चालकाकडून बसगाडी भाडे बळजबरीने वसूल करण्यात येईल आणि त्या व्यक्तीवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

ब) प्रवाशांना स्वतःच्या जबाबदारीवर पुढील आकारमानाचे केवळ व्यक्तिगत सामन बसगाडीत जागा उपलब्ध असेल तरच योग्य ते भाडे देऊन वाहून नेता येईल.

कमाल आकार :- ६० X ५७ X ३७ से. मी.

सामानावर आकारण्यात येणारे भाडे (लगेज) तद्नुरुप प्रौढ भाड्याशी तुल्य (सममूल्य) असेल, मात्र किमान भाडे रु. ४/- व कमाल भाडे साधी सेवा रु.५/-, मर्यादित सेवा रु.७/-, जलद सेवा रु. ९/- याप्रमाणे असेल.

तसेच महानगरपालिका क्षेत्रातील शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, धर्मदाय संस्था, फिल्म शुटींग व सहलीकरीता प्रासंगिक करार या करीता पूर्ण दिवसासाठी किंवा अर्ध्यादिवसासाठी तसेच किलोमीटर बेसिसवर बसची मागणी होत आहे. याकरीता उपलब्ध असलेल्या अतिरिक्त बस वापरुन खालिलप्रमाणे भाडे आकारण्यात येईल.

### ❖ सर्वसाधारण आरक्षण कि.मी. प्रमाणे

| | |
|---|---|
| १) प्रासंगिक करार | प्रति कि. मी. रु ३०/- किंवा किमान रु.६०००/-प्रति दिन |
| २) शैक्षणिक व धर्मदाय संस्था | प्रति कि. मी. रु २८/- किंवा किमान रु.५०००/-प्रति दिन |
| ३) फिल्म शुटींगकरीता | प्रति तास रु ४०००/- |
| ४) सरसकट दराने आरक्षण (रिझर्व्हेशन ऑन फ्लॅट बेसिस) | पूर्ण दिवस रु ८०००/- किंवा अर्धा दिवस ४५००/- |

टिप :-

१) पुर्ण दिवस म्हणजे रात्री ००.०० वाजता सुरु होतो आणि २४.०० वाजता संपतो. (२४ तास) अर्धा दिवस म्हणजे १२ तास, सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही गर्दीच्या वेळेस गाडी बुक केल्यास पूर्ण दिवसाचे भाडे आकारण्यात येईल. जर गाड्या १२ तासापेक्षा जास्त म्हणजे २४ तासापर्यंत आरक्षित केल्यास पूर्ण दिवसाचे भाडे द्यावे लागेल.

२) सदरची सेवा ही महानगरपालिका क्षेत्र आणि महानगरपालिका क्षेत्राबाहेरील २० कि.मी. किंवा बसमार्ग जिथपर्यंत चालतो त्यामधील कमीत कमी अंतरापर्यंत सेवा उपलब्ध राहील.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन समिती सभा दि. ०४/०१/२००६ रोजीच्या ठराव क्र. ४ अनुसार मा. महासभेस शिफारस केलेल्या भाडे आकारणी (सारणी), सुधारीत टप्पा, पास योजना, सुधारीत सामान (लगेज) दर, प्रासंगिक कराराचे दर इ. बाबत सविस्तर चर्चा करुन सदरचे प्रकरण शासनाकडील प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कोकण विभाग यांच्या मान्यतेसाठी पाठविणे कामी आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

सूचक : श्री हेरल बोर्जीस

अनुमोदन : श्री. मिलन पारीख

ठराव सर्वानुमते मंजूर

मा. महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

प्रकरण क्र. ७६ :- IHS इंडीया यांनी आयोजित केलेल्या परदेश दौऱ्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. :- ८९

IHS India (Institute of Housing and Urban Development Studies of India) यांचेकडील दि. ४ जानेवारी २००६ च्या पत्रान्वये दि. ११ मार्च २००६ ते दि. १९ मार्च २००६ या कालावधीमध्ये चीन व थायलंड या देशामध्ये Economic Liberalisation and Poverty Alleviation या विषयावर अभ्यास दौरा आयोजित केलेबाबत कळविले असून या अभ्यास दौऱ्याकरिता महानगरपालिकेतर्फे (१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे (सौ. निर्मला विष्णु कांबळे), मा. महापौर, (२) श्री. चंद्रकांत सिताराम वैती, मा. उपमहापौर व (३) श्री. सुदामराव गायकवाड, मा. आयुक्त यांना या अभ्यास दौऱ्यावर जाण्याकरिता आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच या व्यतिरिक्त जे नगरसेवक स्वखर्चाने वरील अभ्यास दौऱ्यासाठी जाण्यास इच्छुक आहेत त्यांनादेखील ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.२०/१/२००६

(१५७)

**प्रकरण क्र.७७ :- अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, बेळगाव यांचेकडील "डिप्लोमा इन लोकल गव्हर्नमेंट फायनाशियल मॅनेजमेंट" (DLGFM) हा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ लागू करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** :- ८२

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई / बेळगांव यांचे मार्फत DLGFM (डिप्लोमा इन लोकल गव्हर्नमेंट फायनाशियल मॅनेजमेंट) हा बहिःशाल पदविका अभ्यासक्रम नव्याने सुरु केला आहे. सदर अभ्यासक्रम हा महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजाचे दृष्टीने उपयुक्त आहे. जसे नविन द्वीनोंद, लेखा पद्धती, लेखा संहिता तयार करणे, ताळेबंद वगैरे योग्य त्या कार्यालयीन प्रक्रिये बाबत संपूर्ण ज्ञान या अभ्यासक्रमाद्वारे कर्मचाऱ्यांना अवगत होणार असून त्याच दृष्टीने सदर अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. अभ्यासक्रम बहिःशाल पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावयाचा असल्याने सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यामुळे दैनंदिन कामात व्यत्यय / अडथळा येणार नाही. तसेच अधिकारी यांना सदर पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा उपयोग महानगरपालिकेचे कार्यालयीन कामकाजात होणार असून महानगरपालिका कामात पारदर्शकता येवून कामात गती प्राप्त होऊ शकते.

तरी DLGFM या पदविका अभ्यासक्रमास महानगरपालिका अधिकारी यांनी यशस्वीरित्या पूर्ण केल्यास शासन निर्णय क्र. जी.ई.एन./१००३/८८९/प्र.क्र.९८/२००३/नवि-१४ दि.३/११/२००३ अंतर्गत तरतुदीनुसार त्यांना एक वेतनवाढ देण्याबाबतचा विचार महानगरपालिका स्वतंत्रपणे करु शकते असे नमुद करुन त्याप्रमाणे मा. उपसंचालक (प्रशिक्षण) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सदर पदविका परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या अधिकारी यांना एक वेतनवाढ देण्याबाबत निर्णय घेण्याची विनंती केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील अकरा महानगरपालिकांनी सदर पदविका अभ्यासक्रम यशस्वी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.

त्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील जे अधिकारी व कर्मचारी DLGFM पदविका अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करतील त्यांना एक अतिरीक्त वेतनवाढ पुढील नियमीत वार्षिक वेतनवाढीवर परिणाम न होता, अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यापासून देण्यास मंजूरी देण्यात येते.

**सुचक** :- श्री. लॅरन्स बोर्जीस   **अनुमोदक** :- श्री परशुराम पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

ठराव वाचून कायम करण्यात आला.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१४२)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

प्रकरण क्र. ७८ :- मिरा भाईंदर महानगरपलिका सदस्य व पदाधिकारी ह्यांना द्यावयाचे मानधन फी व अन्य भत्ते नियम २००६ बाबत.

ठराव क्र. :- ८३

मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा अधिनियम क्र. ५९) अन्वये कलम १९अ व ४५४ अन्वये महापलिका सदस्य व पदाधिकाऱ्यांना द्यावयाचे मानधन, फी व भत्ते या संबंधी केलेले नियम मा. महासभेस मान्यतेसाठी सादर केले आहेत.

अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उक्त नियमांना पूर्व प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. या नियमांना आक्षेप घेण्यासाठी तसेच सुचना करण्यासाठी सर्व संबंधितांना एक महिन्याची मुदत दिली जाईल. सर्व आक्षेप व सुचनांवर मा. महासभा पुन्हा एकवार विचार करुन नियमांना अंतिम स्वरुप देऊ शकेल. मा. महासभेने यानंतर अंतिम केलेल्या नियमांना राज्य शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असल्यामुळे मा. महासभेच्या ठरावासह नियम राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर केले जातील.

तरी प्रस्तुत प्रारुप नियमांचा तयार केलेला मसुदा ही मा. महासभा मान्य करीत असुन त्यावी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- हेरल्ड बोर्जीस

अनुमोदन :- परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(९८३)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/१/२००६

प्रकरण क्र. :- ७९

ठराव क्र :- ८४

**विषय :- महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करारपध्दतीने नेमण्यात आलेल्या कर्मचारी वर्गास मुदत वाढ देणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरीकांना प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविण्या करीता दि. १९/४/२००३ रोजीच्या मा. महासभने ठराव क्र. ०५ अन्वये मनपाच्या खालील विभागात आरोग्य केंद्र सुरु करण्यास मान्यता दिली होती तसेच सदर केंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, प्रसविका, फार्मासिस्ट तथा लिपिक यांची करारपध्दतीने नेमणुकीस मंजूरी दिली होती.

| | |
|---|---|
| भाईंदर पूर्व | २ आरोग्य केंद्र (नवघर/ बंदरवाडी) |
| भाईदर पश्चिम | २ आरोग्य केंद्र (जुने मनपा कार्यालय व गणेश देवलनगर) |
| उत्तन | १ आरोग्य केंद्र |
| मिरारोड | १ आरोग्य केंद्र (नयानगर,) |
| काशी मिरा | १ आरोग्य केंद्र (पेणकरपाडा) |

एक फिरता दवाखाना (काशिगाव)

वरील आरोग्य केंद्राकरीता वैद्यकिय अधिकारी - ८, परिचारीका (एन.एम.) - ८, प्रसविका (ए.एन.एम.) - २१, फार्मासिस्ट कम लिपिक - ८ या पदास करारपध्दतीने मंजूरी देण्यात आली होती. त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये मा. स्थायी समितीने दि. २०/९/२००५ रोजी ठराव क्र. ४६ अन्वये पाच महिन्यासाठी नेमणुकीस मंजूरी घेण्यात आलेली होती. सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना मुदत वाढ देणे आवश्यक आहे.

तसेच महानगरपालिका क्षेत्रात नव्याने ५ आरोग्य उपकेंद्र सुरु करणे बाबत दि. ३०/७/२००५ रोजीच्या मा. स्थायी समितीने ठराव क्र. ८८ अन्वये आरोग्य केंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी ५, परिचारीका ५, प्रसविका ५, फार्मासिस्ट तथा लिपिक ५ करारपध्दतीने नेमणुक करण्यास मान्यता दिली होती. त्यापैकी आरोग्य केंद्राकरीता वैद्यकीय अधिकारी १, परिचारीका ३, प्रसविका १, फार्मासिस्ट तथा लिपिक ३ करारपध्दतीने रुजू झाले आहेत. उर्वरीत कर्मचारी प्रतिक्षा यादीतून घ्यावी लागणार आहे. प्रतिक्षा यादीत उपलब्ध न झाल्यास नव्याने जाहिरात देउन मुलाखतीद्वारे वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांची नेमणुक करावी लागणार आहे.

वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दि. २०/९/२००५ रोजीच्या मा. महासभेच्या ठराव क्र. ४६ अन्वये एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन पुढील ५ महिन्याची मुदत वाढ देण्यात आली होती. प्रेत्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना दर ५ महिन्या नंतर तांत्रिक खंड देउन एक वर्षाची मुदत वाढ देणेस हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. हॅरल्प बोर्डीस          अनुमोदक :- श्री. परशुराम पटिल

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि. २०/०१/२००६

(९४४)

प्रकरण क्र. (८१) केंद्र शासनाच्या Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस निधी प्राप्त करून घेणे करिता प्रकल्प अहवाल तयार करणे कामी कंन्सल्टंट नेमणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्रमांक :- ८५

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारत देशाची २७.८०% लोकसंख्या ही शहरी भागातील आहे. सदर शहरी भागातील लोकसंख्या सुमारे २८.५४ कोटी एवढा आहे. शहरी भागाची लोकसंख्या ही झपाटयाने वाढत असल्याने सदर भागात विविध सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission अंतर्गत एकुण १००० कोटी एवढा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर निधी संपुर्ण भारतातील निवडक शहराकरीता असून महाराष्ट्रातील १) बृहन्मुंबई २) नाशिक महानगरपालिका ३) पुणे महानगरपालिका ४) नागपूर महानगरपालिका व ५) नादेड महानगरपालिका सदर प्रकल्पात समावेश आहे. बृहन्मुंबई /एम.एम.आर.डी.ए. च्या भागात मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा समावेश असल्याने सदर प्राप्त होणारा निधी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त करून घेण्याकरीता या महानगरपालिकेचा प्रकल्प अहवाल शासनाकडे त्वरीत सादर करण्याबाबत मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सुचना दिल्या आहेत. त्यानुसार ज्या कामी निधीची आवश्यकता आहे, त्याचा प्रकल्प अहवाल (Project Report) तयार करावा लागणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस खालील प्रकल्पाकरीता निधीची आवश्यकता पडणार आहे.

१) भुयारी गटार योजना
२) १००.०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजना (मोरवे धरण)
३) विकास आराखडयातील आरक्षणे व डी.पी.रस्ते यांचा विकास करणे.
४) महानगरपालिकेत G.I.S. सर्व्हे करणे.
५) एकात्मिक नाला प्रकल्पातंर्गत नैसर्गिक नाल्याचे बांधकाम करणे.
६) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प
७) परीवहन व्यवस्था

वरील सर्व कामांचा प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे. त्याकरीता सर्व संबंधित विभागातून शासकीय विभागातून माहिती घ्यावी लागणार आहे. सन २०२५ पर्यत या सहरात होणारी एकुण लोकसंख्या हयांना करावी लागणारी पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था या बाबत माहिती गोळा करणे, महानगरपालिकेच्या कर्मचारी/अधिकारी यांच्यावर २०२५ पर्यत होणारा खर्च, तद्नंतर २०२५ पर्यत किती व कोणते रस्ते, आरक्षणे विकसित करणे या सर्व कामांचा अभ्यास करून माहिती घेऊन शासनास प्रस्ताव सादर करावयाचा आहे. शासन स्तराव विविध बैठका, सभांना सदर प्रकल्प अहवालानुसार माहिती (Presentation) सादर करावी लागते. ठाणे, नाशिक, पुणे व इतर महानगरपालिकांनी देखील अशा प्रकारे महानगरपालिकांचे प्रकल्प अहवाल तयार केलेले आहेत. सदर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी अनुभवी कंन्सल्टंटची नेमणूक केल्यास त्यांच्यामार्फत वरील नमूद सर्व कामे पाठपुरावा करून त्वरीत करून घेता येतात. प्रशासनाने दिलेला वरील प्रस्ताव पाहता, शासनाकडे वरील योजनेत मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा समावेश करण्याकरीता विनंती करण्यात यावी तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे करीता अनुभवी कंन्सल्टंट नेमण्यास व येणा-या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री हेरल बोर्जिस

अनुमोदन :- श्री परशुराम पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

ठराव वाचून कायम करण्यात आला.

पिठासन अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

(९८५)

**प्रकरण क्र ८९ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेची GIS ( Geographical Information System ) प्रणाली विकसीत करणे व संगणकीकरणासाठी आवश्यक ती सर्व कामे करणे बाबत.**

**ठराव क्र.८६ :-**

मिरा भाईंदर महागनरपालिकेने कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेकडून मालमत्ता कर विभाग, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, पाणी पुरवठा विभाग , परवाना विभाग, लेखा विभाग, सी. एफ, सी. इत्यादी सॉफ्टवेअर खरेदी केलेली आहेत. तसेच सध्या महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे नेटवर्किंग (LAN) करणे , प्रभाग कार्यालये Redio Frequency (RF) द्वारे मुख्यकार्यालयाशी कनेक्ट (Connect) करणे , महानगरपालिकेचे स्वतंत्र संकेतस्थळ ( Website) तयार करणे, आदी कामे प्रस्तावित असून त्याबाबत कार्यवाही चालू आहे. त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिकेची GIS ( Geographical Information System ) प्रणाली विकसीत करणे आवश्यक असून सदर प्रणालीमध्ये प्रामुख्याने खालील महत्त्वाच्या बाबींचा समावेश आहे.

१) शहरातील मुलभूत सुविधा उदा. रस्ते, गटारे, इमारती, स्ट्रीट लाईट, पाईप लाईन आदीची भौगोलिक माहिती संगणकीय करणे.
२) विकास आराखड्याची व शहराच्या सद्यस्थितीचा तुलनात्मक आराखडा तयार करणे.
३) जमीन वापरातील बदलाची माहिती घेऊन आराखडा तयार करणे.
४) भविष्यातील विकास कामांचा आराखडा तयार करणे.
५) GIS आधारीत निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली मार्गदर्शक पद्धती विकसीत करणे.
६) मालमत्ता कराची आकारणी न झालेली इमारतींचा शोंध घेणे.

वरील बाबी असलेली GIS प्रणाली विकसीत केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. तसेच भविष्यांत करावयाची विकास कामे नियोजीतपणे करण्यासही त्यांची मदत होईल.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेची GIS प्रणाली विकसीत करणे तसेच महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली संकेत स्थळ (Website) तयार करणे, Networking (Lan, Wan) करणे, आवश्यक हार्डवेअर साहित्य, कंज्युमेबल साहित्य, कॉम्प्युटर स्टेशनरी, लायसन्स सॉफ्टवेअर खरेदी करणे, ऑपरेटर नेमणे व त्याअनुषंगिक कामे करणेस व येणा-या खर्चास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच याकरीता आवश्यक असलेली तरतूद सुधारीत व सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात करण्यात यावी.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सुचक श्री हेरल बोर्जीस    अनुमोदक ~~ॲड. एस. ए. खान~~ श्री परशुराम पाटील

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका.

**मा. महासभा दि. १९/१०/२००५**

**प्रकरण क्रमांक ८३ :- मिरा भाईदर महानगरपालिकेला प्राप्त होणा-या रक्कमा बॅकेमार्फत स्विकारणे बाबत.**

**ठराव क्रमांक ८७ :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेचे मुख्य उत्पन्नाचे स्त्रोत्र जकात कर, मालमत्ता कर, पाणीपट्टी व इतर कर हे आहेत. यामध्ये जकात कर वसुलीचे काम महानगरपालिका ठेका पध्दतीने करीत आहे. घरपट्टी, पाणीपट्टी कराची वसुली महानगरपालिका कर्मचा-याकडून करीत आहे. घरपट्टी, पाणीपट्टी कर वसुली कामी महानगरपालिकेने भाईदर (पुर्व), भाईदर (पश्चिम), मिरारोड, मिरा, काशी, घोडबंदर, उत्तन या विभागामध्ये महानगरपालिकेची प्रभाग कार्यालये असून त्या विभागातील कर्मचारी घरपट्टी, पाणीपट्टी वसुलीचे कामकाज पहात आहेत.

महानगरपालिकेने घरपट्टी, पाणीपट्टी कराच्या बिलांचे वाटप केल्यानंतर नागरिक सदर बिल आपल्या विभागातील प्रभाग कार्यालयांत जाऊन रोखीने व धनादेशाव्दारे कराचा भरणा करीत असतात. कराचा भरणा करणेकरिता प्रत्यक्ष नागरिकांना संबंधित कार्यालयामध्ये जावे लागत आहे. नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने व कर वसुली कामामध्ये विलंब टाळण्यासाठी व सुसत्रता येणेकरिता घरपट्टी, पाणीपट्टी कराचा व इतर कराचा भरणा राष्ट्रीयकृत बॅकेमार्फत स्विकारणे योग्य राहील, यामुळे नागरिकांना प्रभाग कार्यालयांत येण्याची गरज भासणार नाही व नागरिकांचा वेळ वाचणार आहे, तरी प्रस्तावित केलेल्या कार्य प्रणालीस मान्यता देण्यात येत आहे. सदरची कार्यप्रणाली प्रभावीपणे राबविणेसाठी संबंधित बॅकाशी विचार विनिमय करुन करारनामा करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेस ही सभा मंजुरी देत येत आहे. यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सूचकः-** हेरल बोर्जीस

**अनुमोदकः-** ॲड. एस. ए. खान

महापौर,
मिरा भाईदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

**प्रकरण क्र. ८४ :-** **महापौर आपतकालीन निधी उभारणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ८८ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१४८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

**प्रकरण क्र. ८५ :- मिरा भाईंदर महानगरपालिका जकात नियम २००६.**

**ठराव क्र. ८९ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/१/२००६.

(१४९)

**प्रकरण क्र. :-** ८६

**ठराव क्र. :-** ९०

**विषय :-** **एकात्मीक डास नियंत्रण करण्याकामी उपाययोजना करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे भौगोलिकदृष्ट्या मुंबई महानगरपालिकेच्या लगत आहे. अनेक एकात्मीक कारणांमुळे मिरा भाईंदर शहर झपाट्याने विकसीत होत असलेले शहर आहे. मनपा क्षेत्रामध्ये राहणा-या नागरीकांना मनपा मार्फत अनेक मुलभूत सेवा पुरविल्या जातात. त्यापैकी आरोग्य विभागामार्फत नागरीकांच्या आरोग्य विषयक समस्यांचे निराकरण केले जाते. मनपा क्षेत्रातील आरोग्य विषयक समस्यांचा विचार करता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विषयक समस्यांपैकी प्रमुख समस्या म्हणजे मोठ्याप्रमाणावरील डासांची उत्पत्ती ही आहे. त्यास मुख्यत्वे खालीलप्रमाणे भौगोलिक परिस्थिती जबाबदार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा विस्तार हा ७९ चौ.कि.मी. एवढा असून मनपा खाडीलगत असल्याने पाणथळ जागेमध्ये भराव टाकून मोठ मोठे गृह निर्माण, संकुले व नागरी वसाहती निर्माण करण्यात आल्या असून मनपा क्षेत्रामध्ये अंदाजे सुमारे ७ ते ७.३० लाख नागरीक राहत आहेत. सदर नागरी परिसराकरीता मोठ मोठे रस्ते व गटारे बांधले आहेत. मनपा क्षेत्रात अद्याप फार मोठे क्षेत्र विकसित होणे बाकी असल्याने ओपन प्लॉटच्या स्वरुपामध्ये मोकळे पडले आहे. सदर मोकळ्या प्लॉटची संख्या फार मोठी असून त्याचा विस्तार फार मोठा आहे. मनपा क्षेत्र हे खाडी लगत असल्याने सदर ओपन प्लॉट पाणथळ अवस्थेमध्ये आहे. मनपा क्षेत्रामध्ये बहुतांश परिसरात इमारतीचे सेफ्टी टँक पध्दतीचे शौचालय आहे. सदर शौचालयांच्या सुमारे ७०,००० सेफ्टी टँक असून सदर सेफ्टी टँकमधील सांडपाणी मनपाच्या उघड्या स्वरुपाच्या गटारात सोडले जाते. तसेच मनपा क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर बांधकामे सुरु असून त्या कामी मोठ्या प्रमाणावर पाण्याच्या उघड्या टाक्या बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे डासाची उत्पत्ती होत.

सध्या मनपा क्षेत्रातील डास नियंत्रणकरीता आवश्यक किटक नाशके खरेदी करून मनपा कर्मचा-यामार्फत संपूर्ण प्रभागामध्ये किटक नाशक व धुर नाशक फवारणी दैनंदिन कार्यक्रमानुसार करण्यता येते. मात्र डास नियंत्रण प्रभावीपणे व यशस्वीरित्या करणेकरीता पुढीलप्रमाणे मुख्यत्वे अडथळे येत आहेत.

५) मनपा क्षेत्रातील डासांचे वाढीचे क्षेत्र, गटाराची व नाल्याची पाणथळ जागेचे क्षेत्रफळ व संख्या तसेच सेफ्टी टँक संख्या पाहता, सध्या असलेली ७० कर्मचारी, व धुर फवारणी २५ मशिन अपु-या आहेत.

६) मनपाकडील किटक नाशक फवारणी कामी असलेले मजूर पुरेशे प्रशिक्षित नाहीत. त्यामुळे त्यांना किटक नाशक नियंत्रणा विषयी आवश्यक माहिती देणे शक्य होत नाही.

७) सदर किटक नाशक कामावर संपुर्ण देखरेख करणे करीता आवश्यक डास नियंत्रणाबाबत सखोल माहिती असलेले मुकादम उपलब्ध नाहीत.

९५०

८) मनपा क्षेत्रातील असलेला ओपन प्लॉटचा विस्तार फार मोठा असल्याने त्यामध्ये शेवटपर्यंत मनपा कर्मचारी पोहोचू शकत नाहीत. तेवढी तांत्रिक सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे संपुर्ण ओपन प्लॉटमध्ये किटक नाशक परिणामकारकरित्या फवारणी करणे शक्य होत नाही.

सध्या महानगरपालिकेकडे प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग तसेच पुरेशे साधनसामुग्री उपलब्ध नसल्याने महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत ठरवून देण्यात आलेल्या डास नियंत्रण कामाच्या पध्दतीनुसार खालीलप्रमाणे एकात्मीक डास नियंत्रण करणे कामी उपाययोजना करीता शास्त्रौक्त पध्दतीने राबविणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरालिका क्षेत्रात जुंतूनाशके / धूरफवारणी कामी प्रशिक्षीत कामगार तसेच जंतुनाशक/किटनिाशके, डिझेल, पेट्रोल, साधन सामुग्री तसेच राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत ठरवून देण्यात आलेल्या नागरी नियंत्रण कामाच्या पध्दतीनुसार आवश्यक कर्मचारी व साधन सामुग्री व किटक नाशक/ अळी नाशक पुरविणे आदी संपूर्ण जबाबदारी ठेकापध्दतीने दिल्यास सदर यंत्रणावर खालीलप्रमाणे अंदाजे मासिक खर्च होणार आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फवारणी कर्मचारी | - | १२४ | | |
| पर्यवेक्षक | - | २१ | | |
| फवारणी निरिक्षक / कंन्सलटंटसह | - | १० | = | ६,२०,०००/- |
| किटक नाशके, अळी नाशके, डिझेल, पेट्रोल व इ. उपकरण वरील खर्च | - | | = | १३,६५,०००/- |
| (मनपाचे स्प्रे पंप व फॉग मशिन कामासाठी उपलब्ध करावे लागेल) | | | | |
| एकुण (अंदाजीत मासिक खर्च) | - | | = | १९,८५,०००/- |

वरीलप्रमाणे सध्या महानगरपालिकेचा किटक नाशक, धुर फवारणी व कर्मचारी कामी होत असलेला खर्च व फवारणी साठी असलेले अपुरे कर्मचारी या सर्वबाबींची तुलना करता मनपा क्षेत्रातील राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार महापालिका क्षेत्रातील एकात्मीक डास नियंत्रण करणे कामाची संपुर्ण जवाबदारी शास्त्रौक्त पध्दतीने करण्यासाठी कंत्राटीपध्दतीने गोषवा-या मध्ये नमुद केल्याप्रमाणे डास नियंत्रण उपाययोजना करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :-** श्री. हॅरल्ड बोर्जीस **अनुमोदक :-** ॲड. एस. ए. खान

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१५१

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

प्रकरण क्र. ८७ :- सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १३/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

अंध व अपंगासाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि.क्रमांक-मि.भा.पा. २००४/१४४/ प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी / शर्ती च्या अधिन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन न करता देण्यात बूथ (जागा) आलेल्या संबंधीत अधिकाऱ्यावर कारवाई करणे व भविष्यकाळात शासन नियमप्रमाणे कारवाई होणेबाबत.

ठराव क्र. ९१ :-

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

१५२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

प्रकरण क्र. ८८ :- सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १३/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.
महानगरपालिका हद्दीतील भाईंदर पश्चिम राव तलाव, मांडली तलाव व त्याच्या आजुबाजूच्या विहिरी पावसाळ्या अगोदर साफसफाई करुन घेणेबाबत.

ठराव क्र. ९१ :-

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(९५३)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

प्रकरण क्र. ८९ :- सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचे दिनांक १७/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरामध्ये तलाठी सजा भाईंदर यांच्या हद्दीतील जुना सर्व्हे नं. ६९० व नवीन सर्व्हे नं. २८ क्षेत्र .८४ आर .९८ या लोकल बोर्ड दवाखाना (जिल्हा परिषद) व शव विच्छेदन गृह (पोस्टमार्टम रुम) व वातानुकुलीत शवागर बाबत.

ठराव क्र. ९१ :-

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१५४)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

**प्रकरण क्र. ९० :-** **सन्मा. सदस्य श्री. केशव रामभाऊ घरत यांचे दिनांक १७/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.**
**महानगरपालिका क्षेत्रातील दस्ताऐवज होऊ न शकणाऱ्या मालमत्ता हस्तांतरणाबाबत.**

**ठराव क्र. ९१ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१५५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

**प्रकरण क्र. ९१ :-** सन्मा. सदस्य श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस यांचे दिनांक <u>१७/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.</u>
महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५ रोजीचा ठराव क्र. ९४)

**ठराव क्र. ९१ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१५६

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०१/२००६

**दुःखवटा ठराव क्र. ९२ :-**

राई गावातील रमाबाई अनंत म्हात्रे ह्यांचे दुःखद निधन झाले आहे. तसेच, सन्मा. सदस्या जेन्वी आल्मेडा ह्यांचे बंधु व शिक्षण अधिकारी ह्यांच्या मातोश्रीचे निधन झाले आहे. तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**सुचक :- श्री. अनंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१५८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२००६

**अभिनंदन ठराव क्र. ९२(अ) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बजेट चांगल्या पध्दतीने मा. महासभेसमोर मा. स्थायी समिती सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे ह्यांनी सादर केले. त्याकरीता मा. स्थायी समिती सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे ह्यांचे ही मा. महासभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

९५८

मा. महासभा दि. २०/३/२००६

प्रकरण क्र...१००... मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००५/२००६ चे मुळ सुधारीत व सन २००६/२००७ चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**महासभा ठराव क्र.......... दि. ............**

सुचक- अनुमोदक-

## ठराव क्र. ..९३..

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००५/२००६ सुधारित व सन २००६/२००७ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. २१७ दि. १/३/२००६ विचारात घेवून व शासनाचे नियमानुसार जकातीची रक्कम कायम करुन मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००५/०६ चे सुधारीत व सन २००६/०७ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**२००६/२००७**

| उत्पन्न | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| | "अ"अंदाजपत्रक | 28660.23 | | "अ"अंदाजपत्रक | 27210.28 |
| | "ब"अंदाजपत्रक | 978.40 | | "ब"अंदाजपत्रक | 1178.40 |
| | "क"अंदाजपत्रक | 6321.45 | | "क"अंदाजपत्रक | 7536.23 |
| | वृक्षप्राधिकरण | 163.30 | | वृक्षप्राधिकरण | 195.00 |
| | एकूण | 36123.38 | | एकूण | ~~35924.91~~ 36119.91 |

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

सुचक-
अनुमोदक-

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२०/०३/२००६**

(१५८)

**प्रकरण क्र. १०० –**

**विषय – विकास आकाराचे दर व भोगवटा दाखला प्राप्त न करता रहिवास व्याप्त इमारतीसाठी दंडनिय शुल्क निश्चित करणेबाबत.**

**ठराव क्र. -** ९४

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ प्रमाणे विकास आकार रक्कम वसूल करणेबाबत अधिनियमातील तरतूद दि.१०/०८/९२ पासून लागु झालेली आहे. तत्कालीन नगरपरिषद कालावधीत ठराव क्र. ७४ दि.०५/०८/९२ च्या विशेष सभेद्वारे ठरविलेल्या दरानुसार विकास आकाराची रक्कम तीन टप्प्यात वसूल करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

४) बांधकाम नकाशे मंजूर करतेवेळी - २५%
५) बांधकाम प्रारंभपत्र देते वेळी - २५%
६) भोगवटा दाखला देते वेळी - ५०%

तद्नंतर सदर ठरावात बदल करुन सर्वसाधारण सभा दि.०९/११/९३ ठराव क्र. २९२ अन्वये विकास आकार रक्कम वसुली बाबत सुधारीत धोरण ठरविण्यात आले. सदरच्या धोरणानुसार विकास आकार रक्कम ही तीन टप्प्या मध्येच वसूल करावयाची आहे.

१) बांधकाम नकाशे मंजूर करते वेळी - जमिनीचा पुर्ण विकास आकार तसेच बांधकाम क्षेत्राचा ५०% देय विकास आकार.
२) बांधकाम प्रारंभपत्र देते वेळी - बांधकाम क्षेत्राच्या ५०% रक्कम.
३) जोत्याचे प्रमाणपत्र - उल्लेख केलेला नाही.

तद्नंतर नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. १०६(अ) दि.३०/०३/९८ नुसार विकास आकाराचे सुधारीत दर निश्चित करण्यात आले ते खालील प्रमाणे आहेत.

१) जमिनीचा विकास - रु.३०/- प्रती चौ.मी.
२) निवासी बांधकाम क्षेत्र - रु. ६०/- प्रती चौ.मी.
३) औद्योगिक बांधकाम क्षेत्र - रु. ९०/- प्रती चौ.मी.
४) वाणिज्य बांधकाम क्षेत्र - रु. १२०/- प्रती चौ.मी.

सदर दर हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ 'अ' ते 'ल' प्रमाणे कमाल दर आहेत. या सुधारीत दरास शासनाने पत्र क्र. टीपीएस/१२९८/७५६/प्र.क्र.१६० /९८/नवि-१२, दि.२७/१०/९८ अन्वये मंजूरी प्राप्त असून दराची अंमलबजावणी १ नोव्हेंबर १९९८ पासून अंमलात आलेल आहे.

तत्कालीन नगरपरिषद कालावधीत वास्तुविशारद मे. गुप्ते वढावकर असो. यांनी दि.२७/०४/९८ रोजी मा. शासनाकडे निवेदन सादर करुन बांधकाम नकाशे मंजूर करताना विकास आकाराची रक्कमं नगरपरिषदेकडून वसुल करण्याचा आग्रह करण्यात येत आहे. याबाबत हरकत उपस्थित केली होती. सदर निवेदन वजा तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने पत्र क्र. टीपीएस/१२९८/७७७/नवि-१२, दि.०२/०६/९८ अन्वये विकास आकाराची रक्कम बांधकाम प्रारंभपत्र देण्याच्या वेळीच आकारण्यात यावी तसेच बांधकाम नकाशा मंजूर करतेवेळी विकास आकाराच्या वसुली बाबतीत तक्रारी येणार नाहीत याची दक्षता घ्यावयासाठी कळविण्यात आले होते. त्यामुळे विकास आकाराची रक्कम ही बांधकाम प्रारंभपत्राच्यावेळीच वसुल करणे क्रमप्राप्त ठरले व त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

शासनाच्या आदेशाप्रमाणेच्या विकास आकार वसूलीबाबतच्या धोरणामुळे नगरपरिषद / महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नावरही परिणाम होत आहे. म्हणून प्रशासकिय ठराव क्र. १६५, दि.०९/०७/२००२ अन्वये विकास आकार रक्कम वसूली बांधकाम नकाशे मंजूर करताना एकरक्कमी वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सद्यस्थितीत याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. सन २००२-०३ पासूनचा विकास आकार रक्कम वसुलीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | जमा विकास आकार (रु. कोटी) |
|---|---|---|
| १ | २००२-०३ | ४.१० |
| २ | २००३-०४ | ६.०० |
| ३ | २००४-०५ | ४.५८ |

सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात विकास आकार रक्कम वसूली या शिर्षा खाली रु. १२ कोटी वसुल करणे प्रस्तावित आहे. प्रशासनाने मा.स्थायी समितीस रु. ७ कोटी तरतुद ठेवण्याचे प्रस्तावित केले होते. सद्यस्थितीत माहे फेब्रुवारी २००६ अखेर रु. ६.६ कोटी इतकी रक्कम वसूल झालेली आहे.

याबाबत खालील प्रमाणे मंजूरी मिळाल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ अपेक्षित आहे.

१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम - १२४ 'अ' ते 'ल' च्या तरतूदीप्रमाणे विकास शुल्क आकारणीची तरतूद शासनाने दि.१०/०८/१९९२ पासून अंमलात आणलेली आहे. त्यामध्ये विकास शुल्काचे दर मुंबई महानगरपालिका वगळता उर्वरीत महानगरपालिकेसाठी खालील प्रमाणे आकारावयाचे आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | नियमाप्रमाणे दर रुपये प्रती चौ.मी. | | महानगरपालिकेने लागू केलेले दर रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | |
| १ | जमीन विकास शुल्क | २० | ६० | ३० |
| २ | रहिवासी बांधकाम | ४० | ६० | ६० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | ६० | ९० | ९० |
| ४ | वाणिज्य बांधकाम | ८० | १२० | १२० |

मा. आयुक्त सो. यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेची हद्द मुंबई शहरालगत असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये मुंबई महानगरपालिकासाठीचे विकास आकाराबाबतचे दर मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी प्रस्तावित करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ 'अ' ते 'ल' च्या तरतुदीप्रमाणे विकास शुल्क आकारणीची तरतुद शासनाने दि.१०/०८/९२ पासून अंमलात आलेली आहे. त्यामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या अभिकारितेतील क्षेत्रासाठीचे विकास शुल्काचे दर खालील प्रमाणे आकारायचे आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | नियमाप्रमाणे दर रुपये प्रती चौ.मी. | | मिरा भाईंदर महानगरपालिकेने लागू केलेले दर रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | |
| १ | जमीन विकास शुल्क | ४० | १०० | ३० |
| २ | रहिवासी बांधकाम | १०० | २५० | ६० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | १५० | ३७५ | ९० |
| ४ | वाणिज्य बांधकाम | २०० | ५०० | १२० |

वरिल प्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या अभिकारितेतील क्षेत्रासाठीच्या विकास आकाराच्या दराचा व मिरा भाईंदर महानगरपालिकेने लागू केलेल्या विकास आकाराच्या दराचा विचार करता खालील प्रमाणे विकास आकाराचे दर निश्चित करणे आवश्यक वाटते.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी प्रस्तावित दर रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|
| १ | जमीन विकास शुल्क | १०० |
| २ | रहिवासी बांधकाम | १५० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | २२५ |
| ४ | वाणिज्य बांधकाम | ३०० |

२) मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीचे बांधकाम पुर्ण केल्यानंतर भोगवटा दाखला घेणे आवश्यक असून भोगवटा दाखल्याशिवाय इमारती रहिवास व्याप्त करता येत नसतानाही बरेच विकासक / वास्तुविशारद भोगवटा दाखला घेत नाहीत तसेच भोगवटा दाखल्यापुर्वी इमारती रहिवास व्याप्त करतात. भोगवटा दाखल्यापुर्वी इमारत रहिवास व्याप्त केल्यास त्यासाठी दंडात्मक कारवाई करणेबाबत धोरण निश्चित करणे उचित वाटते. आर्थिक दंड म्हणून विकास आकाराप्रमाणे प्रती चौरस मीटर रु.६०/- रहिवास वापरासाठी, रु.१२०/- प्रती चौरस मीटर वाणिज्य वापरासाठी व रु.९०/- प्रती चौरस मीटर औद्योगिक वापरासाठी अशाप्रमाणे दंडाची आकारणी निश्चित करणे आवश्यक आहे.

३) तसेच सन २००६-०७ च्या आर्थिक वर्षासाठी विकास आकाराच्या रक्कमेत वाढ अपेक्षित आहे. त्यासाठी यापुर्वीच्या तात्कालीन नगरपरिषदेच्या सर्व साधारण सभेतील ठराव क्र. ७५, दि.०५/०८/९२ प्रमाणे बंदिस्त बाल्कनीसाठी शुल्क दंडणिय शुल्क म्हणून रु.५००/- प्रती बाल्कनी निश्चित केलेली आहे. यामध्ये सुधारणा करुन जमिनीच्या बाजारी दराप्रमाणे प्रिमियम रक्कम (प्रती चौ.मी.) आकारुन बंदिस्त बाल्कनी साठी शुल्क आकारणे योग्य होईल.

वरील प्रमाणेचे बदल करण्यास व विकास आकाराबाबत मा. शासनाकडे मंजूरीसाठी शिफारस करण्यासाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक -** [signature] **अनुमोदक –** [signature]

**ठराव सर्वानुमते मंजूर**

[signature]

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०/३/२००६

प्रकरण क्र...९०९... मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००५/२००६ चे मुळ सुधारीत व सन २००६/२००७ चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**महासभा ठराव क्र.......... दि. ............**

सुचक- अनुमोदक-

## ठराव क्र. ...९५.......

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे प्रथम सन २००५/२००६ सुधारित व सन २००६/२००७ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. २१८ दि. १/३/२००६ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००५/०६ चे सुधारीत व सन २००६/०७ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**२००६/२००७**

| उत्पन्न | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| | "ब"अंदाजपत्रक | 979.44 | | "ब"अंदाजपत्रक | 1178.40 |
| | 'अ' अदाजपत्रकातून हस्तांतरण | 200.00 | | अखेरची शिल्लक | 1.04 |
| | एकूण | 1179.44 | | एकूण | 1179.44 |

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

सुचक- [signature]
अनुमोदक- [signature]

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २०/३/२००६

प्रकरण क्र..१०२... मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००५/२००६ चे मुळ सुधारीत व सन २००६/२००७ चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**महासभा ठराव क्र........... दि. .............**

सुचक-                                                                 अनुमोदक-

## ठराव क्र. ..९९.......

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००५/२००६ सुधारित व सन २००६/२००७ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. २१९ दि. १/३/२००६ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००५/०६ चे सुधारीत व सन २००६/०७ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**२००६/२००७**

| उत्पन्न | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| | वृक्षप्राधिकरण | 163.30 | | वृक्षप्राधिकरण | 195.00 |
| | 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 31.70 | | | – |
| | एकूण | 195.00 | | एकूण | 195.00 |

ठराव सर्वानुमते मंजूर

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सुचक-** [signature]
**अनुमोदक-** [signature]

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(९६४)

**मा. महासभा दि. २०/०३/२००६**

प्रकरण क्र. :- ९०३

संदर्भ :- **मा. स्थायी समिती ठराव क्र. २२० अन्वये शिफारस केलेल्या मार्गस्थ दाखला फी आकारणी बाबत.**

ठराव क्र :- ९७

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १४७ नुसार त्वरीत निर्यात करावयाचा जकातपात्र माल महानगरपालिका क्षेत्रातून प्रवेश नाक्यवरुन निर्गमन नाक्यावर जाताना लेखी परवानगी नि पारगमन पास प्रदान करुन संबंधिकाकडून मार्गस्थ दाखला फी ( एस्कॉर्ट) आकारणी बाबतची तरतुद समाविष्ट आहे. तद्नुरुप मिरा भाईंदर महानगरपालिकेने प्रारुप जकात नियमावलीत नियम क्र. १७ (२) अन्वये मार्गस्थ दाखला फी आकारणी करणेची तरतुद प्रस्थावित केलेली आहे. उक्त जकातीचे प्रारुप नियम मा. महासभेच्या मंजुरीकरीता सादर केलेले आहेत.

प्रारुप जकात नियमावलीबाबत मा. महासभेच्या मंजुरीस अधीन राहून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून जकात पात्र माल घेऊन त्वरीत निर्गत होणा-या वाहनांवर खालील प्रमाणे मार्गस्थ दाखला फी (एस्कॉर्ट) आकारणी करणे बाबत ही सभा मंजुरी देत आहे.

| वाहनाचा प्रकार | तीन चाकी टेंपो | चार चाकी टेंपो | लॉरी | कंटेनर |
|---|---|---|---|---|
| आकारण्यांत येणारे दर | १० रु. प्रति वाहन | २५ रु. प्रति वाहन | ८० रु. प्रति वाहन | १०० रु. प्रती वाहन |

सुचक :- [signature]

अनुमोदन:- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

१६५

# मिरा भाईदर महानगरपालिका,

**मा. महासभा दिनांक २०/०३/२००६**

**प्रकरण क्रमांक :-** १०४

**संदर्भ** :- **मा. स्थायी समिती सभा दिनांक ०१/०३/२००६ चा ठराव क्रमांक अन्वये**

**ठराव कमांक** :- २२१ ९८

मिरा भाईदर महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्रमांक २९, दि.०३/०५/२००२ प्रमाणे मालमत्ता हस्तांतरण करणे करिता निवासी रु.५००/- बिगर निवासी रु.१,०००/- विशेष हस्तांतरण फी आकारण्यांस मंजुरी देण्यात आलेली होती. दि.०१/०४/२००६ पासून निवासी रु.१,०००/- बिगर निवासी रु.१,५००/- अशी विशेष हस्तांतरण फी मध्ये वाढ देण्यांस मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६ ठराव क्रमांक 229 ने शिफारस केलेली आहे.

मा. स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे यापुढे दि.०१/०४/२००६ पासून निवासी रु.१,०००/- बिगर निवासी रु.१,५००/- अशी विशेष हस्तांतरण फी मध्ये वाढ देण्यांस सभा मंजुरी देत आहे. तसेच वारसा हक्काने नावांत बदल होणा-या मालमत्तांना हस्तांतरण फी आकारु नये.

ठराव सर्वानुमते मंजुर

सूचकः- श्री. अनुमोदकः- श्री.

सभापती
मा. स्थायी समिती
मिरा भाईदर महानगरपालिका

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२००६

प्रकरण क्रमांक : १०५

ठराव क्रमांक : ९९

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. ७४, दि. १८/०२/२००५ प्रमाणे सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यांस मंजूरी देण्यात आलेली होती. यापुढे दि. ०१/०४/२००६ पासुन सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे कॅपीटेशन फी मध्ये वाढ देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

ठराव सर्वांनुमते मंजूर

सुचक : श्री.

अनुमोदन : श्री.

महापौर
मा. महासभा
मिरा भाईंदर महानगरपालिका

| जुनादर | मा. महासभा ठराव क्र. ७४ दि. १८/०२/२००५ | नवीनदर | मा. महासभा ठराव क्र.        दि. |
| --- | --- | --- | --- |
| महसुलीचा प्रकार | तपशील | महसुलीचा प्रकार | तपशील |
| कॅपीटेशन फी | अ) १. १६ मिटर ते २४ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. ५/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. ५०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>२. १६ मिटर ते २४ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. १०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>३. शैक्षणिक, समाज मंदीर व दवाखाने इत्यादी इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी रु. ५/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. ५०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>४. लॉजिंग बोर्डीग, हॉटेल इत्यादी इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी रु १०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | कॅपीटेशन फी | अ) १. १६ मिटर ते २४ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. १०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १००००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>२. १६ मिटर ते २४ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. २०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. २०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>३. शैक्षणिक, समाज मंदीर व दवाखाने इत्यादी इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी रु. १०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १००००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>४. लॉजिंग बोर्डीग, हॉटेल इत्यादी इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी रु २०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. २०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) १. २४ मी. ते ४५ मी. उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. २०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. २००००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>२. २४ मी. ते ४५ मी. उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. ५०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी.<br>३. ४५ मी. पेक्षा उंच निवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. ५०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. ५००००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>४. ४५ मी. उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. १००/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १,००,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | ब) १. २४ मी. ते ४५ मी. उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. ४०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. ४०,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>२. २४ मी. ते ४५ मी. उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी.<br>क्षेत्रफळासाठी रु. १००/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी<br>३. ४५ मी. पेक्षा उंच निवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. १००/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. १,००,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी.<br>४. ४५ मी. उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. २००/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. २,००,०००/- कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | क) कारखाने, गोडाऊन, वेअरहाऊस, सिनेमागृह, नाटयगृह व पेट्रोल पंप इत्यादी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी मंजुर रु २५/- प्रमाणे कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | क) कारखाने, गोडाऊन, वेअरहाऊस, सिनेमागृह, नाटयगृह व पेट्रोल पंप इत्यादी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी मंजुर रु ५०/- प्रमाणे कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |

सुचकः- श्री.

अनुमोदनः- श्री.

<u>ठराव सर्वानुमते मंजूर</u>

**महापौर**

**मा. महासभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१६४)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२००६

**दुःखवटा ठराव क्र. १०० :-**

शिक्षण क्षेत्रातील श्यामराव मोरेश्वर पाटील ह्यांना देवाज्ञा झालेली आहे. मच्छीमार कृती समितीचे आणि अखिल महाराष्ट्राच्या मच्छीमारांचे झुंझार नेते भाई बंदरकर (माजी आमदार) ह्यांचे दुःखद निधन झाले. त्याचप्रमाणे आपल्या महापालिका सेवेतील सन्मा. सहाय्यक संचालक, नगररचनाकार श्री. दिलिप घेवारे ह्यांचे बंधूसुध्दा दोन आठवड्यापूर्वी स्वर्गवासी झाले. मिरा रोडमधले कॉंग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ता श्री. ऑस्टीन ह्यांचे वडील शुक्रवारी मरण पावले. प्रभाग क्र. ०८ चे कॉंग्रेसचे अध्यक्ष भिकाजी तुकाराम लाड ह्यांचेदेखील हृदयविकाराच्या आजाराने दुःखद निधन झाले. तसेच मोहन नारायण भोईर ह्यांचे गुरुवार दि. ०८/३/२००६ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झालेले आहे. तसेच, यशवंत जनार्दन पाटील (काका) राई ह्यांचेदेखील हृदयविकाराने दि. २२/०२/२००६ रोजी दुःखद निधन झाले. त्याचप्रमाणे स्थायी समितीचे माजी सभापती मॉरस रॉड्रीक्स ह्यांच्या सासु ज्युली ॲन्थोनी गोम्स ह्यांचे दुःखद निधन झाले. त्याबद्दल ही सभा शोकप्रस्ताव मांडत आहे. त्या सर्वांच्या कुटूबीयांच्या दुःखात ही सभा सहभागी असून त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

१८०

## मा. महासभा दि. ३१/०३/२००६

**प्रकरण क्र. १०६ :- सन २००५-०६ या आर्थिक वर्षात संस्थांना शैक्षणिक अनुदान देणेबाबत.**

ठराव क्र. १०७ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक संस्था कार्यरत आहेत. सदर संस्था मार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, क्रिडा इ. विविध उपक्रमाद्वारे समाजास सेवा सातत्याने देऊन समाजउपयोगी कार्यक्रम राबवीत आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००५-०६ या वर्षाचे अंदाज पत्रकामध्ये लेखाशिर्ष इ. अंशदाने या लेखाशिर्षानुसार रक्कम रु. १,००,००,०००/- अनुदानाची तरतूद करणेत आलेली आहे.

मिरा भाईंदर क्षेत्रातील संस्थांना त्यांनी दिलेल्या सेवेबाबत प्रोत्साहन देण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत सानुग्रह अनुदान देणेकरिता खालीलप्रमाणे धोरण ठरविण्यांत येत आहे.

१) सदर संस्था मिरा भाईंदर मधील असावी.

२) संस्थेने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व करांचा भरणा केला असला पाहिजे.

३) मिरा भाईंदर महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कारवाई केली नसली पाहिजे.

४) संस्थेस किमान ३ वर्षांचे ऑडीट रिपोर्ट सादर केले पाहिजे.

५) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमधून इयत्ता ७वी नंतर ८वीच्या वर्गासाठी विनामुल्य प्रवेश संबंधित संस्थांनी महापालिकेच्या विद्यार्थांयाना द्यावा व तसे लेखी हमीपत्र अनुदान घेणाऱ्या संस्थांकडून घ्यावे.

६) अनुदान घेणाऱ्या संस्थेमध्ये मिरा भईंदर महानगरपालिकेचा स्वतंत्र कोटा (Reserve Seats) असावा.

याप्रमाणे धोरण ठरवून खालील संस्थांना अनुदान देण्यांत येत आहे.

महानगरपालिका शिक्षणमंडळ मिरा भाईंदर जि. ठाणे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव | देय अनुदान |
|---|---|---|---|
| १ | अमरदिप शिक्षण संस्था भाईंदर (पश्चिम) | ललित विद्या निकेतन | २,७५,०००/- |
| २ | एस. व्ही. पांडे एज्युकेशन ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | अवर लेडी ऑफ सरस्वती स्कूल गुजराती माध्यम | ५०,०००/- |
| ३ | एस. व्ही. पांडे एज्युकेशन ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | अवर लेडी ऑफ सरस्वती स्कूल इंग्रजी माध्यम | ५०,०००/- |
| ४ | मयेकर जनकल्याण ट्रस्ट भाईंदर (पूर्व) | मयेकर कॉन्वेन्ट स्कूल | २,००,०००/- |
| ५ | आमचं घर ट्रस्ट उत्तन भाईंदर (पश्चिम) | आमचं घर आश्रम, उत्तन | १,५०,०००/- |
| ६ | आमचं घर ट्रस्ट उत्तन भाईंदर (पश्चिम) | आमचं घर शाळा, उत्तन | २,००,०००/- |
| ७ | बॉम्बे मल्याळी समाज काशिमिरा | बी. एम. एस. स्कूल काशिमिरा | १,००,०००/- |
| ८ | भाईंदर शेतकरी शिक्षण मंडळ, भाईंदर (पश्चिम) | भाईंदर सेकंडरी स्कूल | ५,००,०००/- |
| ९ | श्री. केलवाणी मंडळ, भाईंदर (पश्चिम) | जे. एच. पोद्दार स्कूल | ४,००,०००/- |

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव | देय अनुदान |
|---|---|---|---|
| १० | मिरा भाईंदर शिक्षण, क्रिडा आणि सांस्कृतिक संकूल (रजि.) | सुबोध विद्यालय | १,००,०००/- |
| ११ | शिक्षण उत्तेजक मंडळ, घोडबंदर | राजा शिवाजी हायस्कूल, घोडबंदर | ३,००,०००/- |
| १२ | अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ | आदर्श विद्यामंदिर | ३,००,०००/- |
| १३ | नित्यानंद ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर | नित्यानंद ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर | ३,००,०००/- |
| १४ | आवर लेडी ऑफ वेलंकणी एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्ट | अवर लेडी ऑफ वेलंकणी | १,००,०००/- |
| १५ | अमित एज्युकेशन सोसायटी | लोकमान्य विद्यालय | २,००,०००/- |
| १६ | गंगासहाय रामप्रसाद त्रिवेदी एज्युकेशन ट्रस्ट | शारदा विद्यालय | ४,००,०००/- |
| १७ | सरीता एज्युकेशन ट्रस्ट | दि डिवाईन इमेज स्कूल | १,००,०००/- |
| १८ | संकल्प प्रतिष्ठान भाईंदर | | ५०,०००/- |
| १९ | अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ | अभिनव विद्यालय | ७,००,०००/- |
| २० | सरदार वल्लभभाई पटेल एज्युकेशन ट्रस्ट | सरदार वल्लभभाई पटेल विद्यालय | १,००,०००/- |
| २१ | श्री. सिद्धेश्वर सेवा संस्था | | २०,०००/- |
| २२ | बेलेन माऊली शाळा | | २,७५,०००/- |
| २३ | गितानगर सार्वजनिक मित्र मंडळ | | ५०,०००/- |
| २४ | सेन्ड ज्युडस एज्युकेशन ट्रस्ट | | ३,५०,०००/- |
| २५ | कल्पना चावला ट्रस्ट | | १०,०००/- |
| २६ | सदिच्छा ट्रस्ट | | १०,०००/- |
| २७ | मिरा भाईंदर वार्ताहर संघ | | ७५,०००/- |
| २८ | अवर लेडी ऑफ नाझरेथ हायस्कूल | | ६,००,०००/- |
| २९ | सेंट जोसफ हायस्कूल उत्तन | | ५,००,०००/- |
| ३० | सरस्वती हायस्कूल | | २,००,०००/- |
| ३१ | श्री सत्यनारायण मंदिर विश्वस्त मंडळ खारीगांव | | २,००,०००/- |
| ३२ | नवघर ग्रामस्थ पंच मंडळ, नवघर | | १,५०,०००/- |
| ३३ | विठोबा ट्रस्ट, गोडदेव | | २,००,०००/- |
| ३४ | सेंट थॉमस हायस्कूल (मिरारोड) | | ५०,०००/- |
| ३५ | गुलामरसूल एज्यू. ट्रस्ट (इंडियन हायस्कूल) | | २,७५,०००/- |
| ३६ | अग्रवाल सेवा समिती, भाईंदर | | ५०,०००/- |
| ३७ | सु. लादुराम गाडोदीया ट्रस्ट | | २०,०००/- |
| ३८ | मिरा भाईंदर कला क्रिडा महोत्सव समिती | | १,५०,०००/- |
| ३९ | आदर्श नागरिक सेवा समिती | डिवाईन हिम स्कूल | ७५,०००/- |
| ४० | श्री अंबिका एज्युकेशन सोसायटी | डिवाईन हिम ज्युनि.कॉलेज | १,००,०००/- |
| ४१ | एन.एच.इंग्लिश ॲकेडमी, मिरा रोड पूर्व | एन.एच.इंग्लिश ॲकेडमी | २,००,०००/- |
| ४२ | प्रजापती ब्रम्हकुमारी | | २,००,०००/- |
| ४३ | जय अंबे सेवा समिती | | २,००,०००/- |
| ४४ | प्रबुद्ध विचार मंच | | २५,०००/- |
| ४५ | धारावी मंदिर ट्रस्ट | | २,००,०००/- |
| ४६ | एन. जे. स्कुल | | ५०,०००/- |
| ४७ | सिनिअर सिटीझन, भाईंदर | | ५०,०००/- |
| ४८ | ओम श्री हनुमान मंदिर ट्रस्ट | | १,००,०००/- |
| ४९ | मारुती देवस्थान ट्रस्ट, उत्तन | | २५,०००/- |
| ५० | अंजुमन हायस्कुल, मिरा रोड | | १,००,०००/- |
| ५१ | के. बी. नरावत हायस्कुल | | १,००,०००/- |
| ५२ | न्यु कॅंब्रिक हायस्कुल, कस्तुरी पार्क | | २,५०,०००/- |
| ५३ | हेमलता पाठक एज्युकेशन ट्रस्ट, नवघर | | २,५०,०००/- |

| अ.क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | शाळेचे नांव | देय अनुदान |
|---|---|---|---|
| ५४ | अवल लेडी ऑफ फातिमा | | २,००,०००/- |
| ५५ | जॉन लॉरेन्स द ट्वेन्टी थर्ड एज्युकेशन ट्रस्ट | भाईंदर | ५०,०००/- |
| ५६ | राय समिती एज्युकेशन ट्रस्ट | सेंट ॲग्नेस स्कुल | ६५,०००/- |

वरील उल्लेख केलेल्या संस्थांना अनुदान देण्याबाबतचे धोरण याद्वारे निश्चित केले असून वरील अनुदान देण्याचे मंजुर करीत आहे. तरी वरील बाबतीत प्रशासनाने सर्व कायदेशिर बाबींची पडताळणी करुन वरील संस्थांना अनुदान देण्यांत यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.

अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.

ठराव बहुमताने मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका